# शिक्षणाच्या मिती



डॉ. आशु आल्हाद भावसार

शिक्षणातील नवनवीन विचारप्रवाह व
संकल्पनांच्या माहितीस्तव उपयुक्त
संदर्भ ग्रंथ

# शिक्षणाच्या मिती

* लेखक *

डॉ. आशु आल्हाद भावसार (धारस्कर)

Ave Maria
PUBLICATIONS

अवेमारिया प्रकाशन, पुणे

ISBN No. 9788938781 6-05-3

शिक्षणाच्या मिती

© आल्हाद बाबुलाल भावसार - मो.नं. ९९२३७५७३६०

❖ प्रकाशक :

दिलीप लाठी

अवे मारिया पब्लिकेशन्स

१० मिताली, ४७/९८ भुसारी कॉलनी, पौड रोड, पुणे ४११ ०३८

---

१३८४ शुक्रवार पेठ, बदामी हौदा जवळ, पुणे ४११ ००२

दूरध्वनी : ०२०-२४४७३२२५, २४४५२५४०, मो. ९८९०६७४३२१

Email : avemariapublications@hotmail.com

❖ अक्षर जुळवणी व मुद्रण

स्कायलाईन कॉम्प्युटर्स

मुरलीधर टॉवर्स, रणपिसे नगर,

अकोला. मो. ९८९०६०६८६८

❖ मुखपृष्ठ डिझाईन

मिलिंद जोशी

मिलिंद ट्रेडर्स, मो. ९८९०२१३१३७

❖ प्रकाशन : २०१८

❖ मूल्य : ₹ ३००/-

❖ ISBN No. 97889387816-05-3

## ❁ अर्पण पत्रिका ❁



**(स्व. : श्री. मधुकरराव कृ. धारस्कर)**

आज यशस्वीतेच्या वाटेवर मार्गक्रमण
करीत असतांना
अजूनही गरज आहे
आपल्या निरंतर आशीर्वादाची !
म्हणूनच ......
प्रत्येक कार्यारंभी होणारी आपल्या
अस्तित्वाची जाणिव
पेटविते अंत:र्मनाला
आणि निर्माण करते
शरिरांतर्गत एक नवऊर्जा
संपूर्ण आभाळ पेलण्याची ......
स्फुर्ती मिळते आपल्या
आशीर्वादाने ......
आपलीच स्वप्न पूर्ण करण्याची !
आता या क्षणी
नतमस्तक होऊनी आपुल्या चरणावरी
वाहते ज्ञानरूपाने ही सुमनांजली !

**डॉ. आशू आल्हाद भावसार**

# अनुक्रमणिका


| प्र. क्र | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजींच्या शिक्षणविषयक नवकल्पना............ | १ |
| २ | मुल्यशिक्षणाचा प्रमुख स्त्रोत - अभ्यासक्रम ................ | १३ |
| ३ | मुल्य शिक्षणातून व्यक्तिमत्त्व विकास........................ | २६ |
| ४ | स्वामी विवेकानंदांचे शैक्षणिक चिंतन........................ | ३४ |
| ५ | स्त्रीशिक्षणात समाज परिवर्तकांची भूमिका.................. | ५२ |
| ६ | "सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक भूमिका." - एक चिकित्सक अभ्यास | ६१ |
| ७ | इतिहास विषयाचे व्यवस्थापन - एक नवा दृष्टिकोन............ | ७४ |
| ८ | अभ्यासक्रमांतर्गत भाषेचे स्थान................................. | ८३ |
| ९ | शिक्षक प्रशिक्षण गुणवत्ता विकाससंदर्भात चिकित्सक अध्ययन............................................................ | ९२ |
| १० | डिजिटल शिक्षण व पारंपारिक शिक्षण यांचा तुलनात्मक अभ्यास............................................................ | १०० |
| ११ | ज्ञानरचनावाद : अध्ययन, अध्यापन व शिक्षकाची भूमिका..... | १०९ |
| १२ | प.पू. स्वामी चिन्मयानंदांचा बालशिक्षण व बालकांप्रतीचा दृष्टिकोन......... | १२० |
| १३ | जागतिक तापमान वाढ व शिक्षण.............................. | १३० |
| १४ | मानवाधिकाराची अभिनव व अभिजात विचारधारा............ | १३८ |
| १५ | विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य................................... | १५२ |
| १७ | संदर्भ ग्रंथ सुची ................................................ | १६० |

# मनोगत

'शिक्षणाच्या मिती' हे माझे शैक्षणिक विषयावरील संशोधनपर लेखांचे पहिलेच पुस्तक! आज प्रकाशित होतांना खूप आनंद होत आहे.

शिक्षणाची संकल्पना संशोधनाच्या माध्यमातून अधिकाधिक समृध्द व विकसीत होत जाते. शिक्षणातील बदल, दृष्टिकोण आणि पध्दतीतील बदल विचारात घेऊन शिक्षणाची संकल्पना स्पष्ट होते.

९०च्या दशकापासून सुरू झालेला अध्ययन अध्यापनाचाहा प्रवास मजलदरमजल करत आज इथवर येवून पोहचलाय. मुळात शिक्षणाचे क्षेत्र हे निरामय आनंददायी क्षेत्र आहे,. अध्यापनाला अभ्यास, वाचन, मनन, चिंतनाची जोड लाभली की आपल्यातील सर्जनशीलतेला आपोआप पालवी फुटायला लागते असा अनुभव या अनुभवाने समृध्द होत जातांना विविध चर्चासत्र, परिसंवाद, कार्यक्रमांच्या निमित्ताने वेळोवेळी जाणीवपूर्वक लेखन होत गेले. या सर्व लिखाणांपैकी निवडक लेखांचा समावेश 'शिक्षणाच्या मिती' या पुस्तकात केलेला आहे, बदलत्या काळाचे स्पष्ट प्रतिबिंब शिक्षणाच्या क्षेत्रात दिसून येते. या बदलत्या काळाच्या संदर्भात आपल्या क्षेत्रातील ज्ञान आणि माहिती यांची उपयुक्तता तपासत राहणे, नवनवीन संदर्भात त्याचा अर्थ लावत राहणे आणि त्यासाठी स्वतःला अदययावत ठेवत राहणे अशा मोलाच्या गोष्टी या लेखनाने मला शिकवल्यात. अध्ययन अध्यापन करतांना स्वतःला अदययावत ठेवणे ही काळाची गरज आहे. स्वतःला अदययावत ठेवणे अनेक मार्गांनी शक्य आहे. वाचन मनन चिंतनातून हे सहज साध्य होते. अध्यापनाच्या क्षेत्रात आल्यानंतर वेगवेगळया निमित्ताने चौफेर वाचन करता आले. आणि या वाचनातून संशोधनपर लेख लिहिण्याची प्रेरणा मिळाली. या पुस्तकापासून सुरू झालेला हा लेखनप्रवास आधिक जबाबदारीने पुढील टप्पे गाठत

जाईल असा आत्मविश्वास या पुस्तकाने मला दिला आहे. या पुस्तकाचे संपूर्ण श्रेय आल्हाद आणि गार्गी आणि निर्मिक या दोन्ही माझ्या लाडक्या लेकींना आहे. नोकरी घरदार आणि लेकींचे संगोपन यातील जिवघेणा ताण सोसण्याचे बळ या तिघांनी मला दिले, माझा जगण्यातला उत्साह आणि आनंद टिकवत सतत माझ्या सर्जनशीलतेला धुगधुगत ठेवले म्हणूनच शिक्षणाच्या भीती आज प्रकाशित होत आहे.

आपल्या लेकींनी शिकून स्वत:च्या पायावर उभे राहिलेच पाहिजे अशा विचाराने ज्यांनी मला घडवले त्या माझ्या वडिलांची उणीव आज प्रकर्षाने जाणवतेय. आज या पुस्तक प्रकाशनाचा आणि आपल्या लेकीचा त्यांना नक्कीच अभिमान वाटला असता. त्यांच्या आशीर्वादाच्या बळावरच मी हे यश साध्य करू शकलले याची मला जाणीव आहे.

तसेच स्वत: निरक्षर असूनही माझी आई श्रीमती लिलाबाई मधुकरराव धारस्कर हिने माझ्यासाठी माझ्या शिक्षणासाठी, नोकरी व लेकींचे संगोपन, माझ्या या तारेवरच्या कसरतीत मला अमूल्य अशी साथ दिली व अजूनपावेतो देते आहे त्या माझ्या आईचे ऋण जन्मोजन्मी माझ्यासोबत राहील.

या सर्वांसोबतच माझे भासरे; आदर्श शिक्षक व साहित्यिक प्रभाकर भावसार आणि समस्त श्रावगे परिवाराच्या पितृतुल्य, मातृतुल्य मायेमुळे मी आयुष्यात खूप काही साध्य करू शकले आहे. या पुस्तकाचे श्रेयात त्यांचाही मोलाचा वाटा आहे.

आणि आजवर ज्यांनी मला निरपेक्ष मायेने सांभाळले आणि सदोदित माझ्या पाठीशी प्रत्येकवेळी पहाडासारखे उभे ठाकलेले माझे भाऊ, व माझ्या जिवलग बहिणी यांच्या माझ्या आयुष्यातील योगदानाच्या उल्लेखाशिवाय या पुस्तकाला पूर्णविराम लाभणे शक्यच नाही.

सोबतच मला पुस्तक लिखाणासाठी सतत प्रोत्साहीत करणारे माझे प्रेरणास्थान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य आदरणीय, गुरूवर्य डॉ. शांताराम बुटे तसेच महाविद्यालयातील ज्येष्ठ अनुभवी प्रा. डॉ. वसुधा देव यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन व त्यांनी प्रस्तुत पुस्तकास दिलेली अभ्यासपूर्ण प्रस्तावना याबद्दल त्यांचे जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच.

माझे हे पुस्तक आमचे स्नेही व अवेमारिया पब्लिकेशनचे या आंतरराष्ट्रीय प्रकाशनाचे सर्वेसर्वा श्री.दिलीप लाठी यांनी या पुस्तक प्रकाशनाचा उत्साह दाखवून आमचा आनंद व्दिगुणित केला त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार या पुस्तकाच आकर्षक व समर्पक मुखपृष्ठ तयार करणारे श्री मिलींद जोशी आणि अक्षरजुळणी व मांडणी करणारे स्कायलाईन कॉम्प्युटर (अकोला) चे संचालक श्री. आनंद जोशी यांचे बहुमोल सहकार्याशिवाय हे पुस्तक पूर्ण झालेच नसते. त्यांचेही मनापासून आभार.

शिक्षणक्षेत्रातील नवनवीन विचार प्रवाह, शिक्षण आणि आध्यात्मिक परंपरा, शिक्षण आणि सामाजिकता, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षण प्रशिक्षण, समकालीन संदर्भात भारतीय शिक्षण, ज्ञानरचनावाद, डिजिटल शिक्षण, पर्यावरण शिक्षण, मूल्यशिक्षण, मानवाधिकार यासारख्या महत्त्वपूर्ण विषयांचे यथाशक्ती आकलन या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षणात आमुलाग्र बदल घडवून आणणाऱ्या आणि अतिवेगाने बदलणाऱ्या या शैक्षणिक परिस्थितीस पकडण्याच्या प्रयत्न करणाऱ्या प्रत्येकास हया "शिक्षणाच्या मिती" निश्चीतच मार्गदर्शक ठरतील आणि आपल्या शैक्षणिक प्रगल्भतेला, विचारांना चालना देउन नवचैतन्य प्रज्वलीत करू शकेल असा मला सार्थ विश्वास आहे.

जाणकार, वाचक, अभ्यासक या पुस्तकाचे उत्साहाने स्वागत करतील, अशी आशा.

**डॉ. आशू आल्हाद भावसार**

# प्रास्ताविक

शिक्षणाच्या अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. शिक्षण ही संकल्पना पण खूप व्यापक आहे. या संकल्पनेत कितीतरी घटक अंतर्भूत आहेत. जीवनाचा प्रत्येक क्षण हा मानवाला काहीतरी शिकवून जातो आणि मानवाला प्रगल्भ बनवितो आणि ही प्रगल्भता जेव्हा समाजाभिमुख बनते तेव्हा मग एखादी शैक्षणिक अभिव्यक्ती जन्म घेते आणि मग ती समाजाला अत्यंत मार्गदर्शक ठरते.

आपल्या शिक्षक असण्याचा कार्याचा अनुभव हा असाच एक अस्वस्थ करणारा प्रवास असतो. अनेक अनुभव त्यात येतात पण त्या अनुभवाची शाब्दीक अभिव्यक्तीला समाजाला अर्पण करण्याची व त्याच्या माध्यमातुन विविध मौलीक विचार समाजाला प्रदान करणारी कलाकृती निर्माण करण्याची नुसती इच्छाजरी निर्माण होणे हे भाग्य फार थोडयांच्या नशीबी असते. मी हयाला भाग्य म्हणते कारण हा आकाशाला गवसणी घालण्याचा प्रकार आहे.

शिक्षणाच्या मिती हया विचारधनात हा अनुभव वाचकाला वारंवार येतो. शिक्षण संकल्पनेचे मापन करता येणार नाही त्याच्या मर्यादाही ठरवता येणार नाहीत कारण त्याची मर्यादा हीसुध्दा व्यापकतेने सांगावी लागते.

शिक्षण महाविद्यालयात आपली अनेक वर्ष सेवा देणाऱ्या हया पुस्तकाच्या लेखीकाम प्रा. डॉ. आशू हया विद्यार्थीप्रिय प्राध्यापक तर आहेच पण अत्यंत धडपडी व्यक्तिमत्व नवनविन आव्हाने पेलताना त्या आव्हानांनाच आपले जिवन बनविणारे हे व्यक्तिमत्व. विद्यार्थ्यांना नवनवीन संकल्पना सांगण्यासाठी सतत अग्रेसर असणाऱ्या त्यांच्या शिक्षण मिती हया ग्रंथाचे अवलोकन करतांना मला प्रकर्षाने जाणवलेली

बाब म्हणजे हयात केलेली लेखांची निवड आणि हयातूनच खऱ्या अर्थाने शिक्षण संकल्पनेची सर्वव्यापकता लक्षात येते. एकूण १५ लेखांच्या माध्यमातून लेखिका आपल्यासमोर विविध व्यापक विषयांच्या माध्यमातून अभिव्यक्त तर होतेच पण त्याला युगानुकुलताही प्रदान करते हे विशेष. शिक्षणाच्या हया सर्व मिती आपणास प्रारंभिक स्थूल वाटत असल्या तरीही त्या सूक्ष्म होत जाणाऱ्या आहेत. त्यात अभ्यासक्रमाचा अंतर्भाव आहे मग तो भाषा किंवा सामाजिक विज्ञानाचा असू देत. ही स्थूल संकलपना आणि मग शिक्षणाचा खरा अर्थ सांगायलासुध्दा लेखिका विसरल्या नाहीत. मूल्यशिक्षणाचा विषय अतिशय मौलीकतेने हाताळताना त्यात ज्यांचे मोलाचे योगदान लाभले त्या स्वामी विवेकानंद, स्वामी चिन्मयानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत उत्कृष्टपणे नमूद केलेले आहे. नविन विचारप्रवाहांचा विचारही लेखिकेने अत्यंत सक्षमपणे केलेला आहे. हया सर्व प्रक्रियेतील महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक. हया शिक्षकाचे प्रशिक्षणाचा अध्ययन अध्यापनाचा नवीन दृष्टिकोनाचा विचारही लेखिकेने अत्यंत उत्कृष्ट केलेला आहे.

हया पुस्तकाचे मुखपृष्ठ वाचकाचे लक्ष वेधून घेते. स्थूलकडून सूक्ष्मकडे जाणाऱ्या व अधिक व्यापक होणाऱ्या शुभ्र रंगातील हे पृष्ठ शिक्षणाच्या व्यापकतेची अनुभूती देतात.

डॉ. आशू हयांच्या शिक्षणाच्या मिती अभ्यासकांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्यास सहाय्यक ठरतील हे निर्विवाद. सर्वांगसुंदर असणाऱ्या हया ग्रंथाचा लाभ सर्वांनीच घ्यावा हे मी निश्चितपणे सांगू शकते. डॉ. आशू, प्रा. आल्हाद, गार्गी, निर्मिक सर्वांचे मी मनापासून हार्दिक अभिनंदन करते.

**- प्रा. डॉ. वसुधा विनोद देव**

**अकोला**

# १. महात्मा गांधीजींच्या शिक्षणविषयक नवकल्पना

'महात्मा गांधी' यांनी आपल्या स्वत:च्या जीवनाकडे एक प्रयोग म्हणून पाहिले होते. त्यांनी आपले जीवनचरित्र अत्यंत प्रामाणिकपणे लिहिले असून आपल्या या आत्मकथेला ते "सत्याचे प्रयोग" म्हणून संबोधतात. त्यांच्या आत्मकथेला जागतिक साहित्यात मानाचे स्थान आहे.

महात्मा गांधी यांच्यावर त्यांची आई पुतळाबाई व वडील करमचंद यांच्या वागण्याचा व संस्काराचा मोठा प्रभाव दिसून येतो. त्यांची ईश्वरनिष्ठा व अध्यात्मवादी विचारसरणी हा त्याचाच परिपाक होय, व्यवसायाने वकिली पेशा स्वीकारलेले महात्मा गांधी आस्तिक व परधर्मसहिष्णु व पापभीरु होते.

त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात मानवाविषयी प्रेम, अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह, आस्वाद, सर्वत्र भयवर्जनम्, सर्वधर्मी समानत्व व स्वदेशी स्पर्शभावना ही त्यांनी आचरणात आणलेली व्रतं होत.

सत्य व अहिंसा या तत्त्वांना मानवी जीवनात असलेल्या स्थानाबरोबरच इतरही तत्त्वांचा नम्रपणे मानवाने स्वत : च्या उध्दाराकरिता अंगीकार करावा व अशा या व्रतांचा सेवाभावी वृत्तीने व मानवी कल्याणाच्या दृष्टीने उपयोग करावा यावर त्यांचा दृढ विश्वास होता.

मानव हा कोणत्याही देशातील असो, कोणत्याही वर्णाचा असो, कोणत्याही जातीत जन्मलेला असो त्याला मानवासारखी वागणूक मिळाली पाहिजे हे मूलतत्त्व. दीन, दलित, दु:खी, दरिद्री, शोषित, पीडित जनतेची यथायोग्य सेवा हाच खरा मानवधर्म असून त्यातूनच व्यक्तीला मानवतावादी व्यापक दृष्टी प्राप्त होते असे त्यांचे मत होते व "To serve

humanity is to serve God" या पध्दतीने आपल्या जीवनाची कालक्रमणा करण्याचे व्रत त्यांनी आयुष्यभर पाळले.

महात्मा गांधीच्या अशा विचारसरणीचा राजकारण, समाजकारण व वाङ्मयावर प्रभाव पडत गेला. त्यातून गांधीवादी विचारधारा विकसित होऊ लागली. त्यांनी भारतीय जनतेची नाडी ओळखून त्यांचे हृदय जिंकले. भारत छोडो, परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाका, खादी वापरा, जंगलसत्याग्रह करा, मिठाचा सत्याग्रह करा अशा त्यांच्या ब्रिटिश शासनाला जेरीस आणणा-या क्लृप्त्यांना व्यापक, अनुकूल प्रतिसाद मिळाला.

सर्वसाधारण जनतेविषयी अपार प्रेम, भारताला स्वातंत्र्य प्राप्त व्हावे व त्याचा कायापालट व्हावा याबद्दलचा दुर्दम्य आशावाद, सत्य व अहिंसेच्या मार्गाचा अवलंब, धर्माविषयीचा सश्रध्द व व्यापक दृष्टिकोन हे त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे स्थायी भाव होत.

**शिक्षणाचा अर्थ :-**

शिक्षण म्हणजे मानवाच्या परिपूर्णतेकरिता असलेला सर्वांगीण व सुसंगत विकास होय. मनुष्य म्हणजे केवळ त्याचे शरीर, बुध्दी, हृदय किंवा आत्मा नव्हे, या सर्वांचा सुसंगत मेळ झाला पाहिजे. "Man is neither mere intellect, nor the gross animal body, nor the hearty or soul alone. A proper and harmonious combination of all the three is required for the making of the whole man and constitutes the true economics of education."

दिनांक ३१ जुलै १९३७ च्या "हरिजन" मध्ये शिक्षणाचा आपल्याला अभिप्रेत असलेला अर्थ स्पष्ट करतांना महात्मा गांधी म्हणतात. "By education I mean an all around drawing out of the best in child and man-body, mind and spirit. " व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या शारीरिक, मानसिक व आत्मिक शक्तीचे उन्नयन शिक्षणाद्वारे व्हावे असे त्यांना वाटत होते.

Literacy is not the end of education, nor even the begining. It is only one of the means whereby men and women can be educated. Literacy in itself is no education.

शिक्षणाद्वारे सत्याचे व पवित्र अंतःकरणाचे दर्शन घडावे. महात्मा गांधी म्हणतात, "Your education is absolutely worthless if it is not built on a solid foundation of truth and purity. " शिक्षणाद्वारेच चांगले काय व वाईट काय याचे ज्ञान आम्हाला होऊ शकते म्हणून जे शिक्षण आम्हाला असे ज्ञान प्राप्त करुन देऊ शकत नाही ते शिक्षण नव्हे. ती आत्मप्रतारणाच होय.

शिक्षणाने भारतीय जनजीवनाचा व आशा-आकांक्षाचा वर्तमानकाळ व भविष्यकाळ या दोन्ही दृष्टींनी विचार करावा व भारतीय सांस्कृतिक पार्श्वभूमी व अस्मिता विसरु नये असे गांधीजींना वाटत होते.

व्यक्तीला रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊ शकते, विविध स्वरुपाची व्यावसायिक क्षमता प्राप्त करुन देऊ शकते, ते शिक्षण.

**शील संवर्धन करणे :-**

शिक्षणाचा उद्देश केवळ माहिती कोंबून व्यक्तीला ज्ञानसंपन्न करणे नव्हे. ज्ञानसंपन्नतेबरोबर चारित्र्यसंपन्नता ही व्यक्तीच्या जीवनाला अतिआवश्यक बाब असून शिक्षणाद्वारे हे साध्य करता आले पाहिजे. "The

end of all knowledge must be building up character. " असे महात्मा गांधींनी म्हटले आहे.

**सर्वधर्मसहिष्णूता विकसित करणे :-**

शिक्षणाद्वारे व्यक्तीने धर्मातील संकुचिततेचा त्याग केला पाहिजे. इतर धर्माचा आदर करावयास शिकले पाहिजे व श्रदधापूर्ण अंतःकरणाने परमेश्वराचे अस्तित्व व ऋण मान्य करुन धार्मिक सहिष्णुता वाढविली पाहिजे. धर्माद्वारे श्रेष्ठतम सत्याचे दर्शन घडते व अहिंसेचा मार्ग मोकळा होतो. सत्यात अहिंसा समाविष्ट झाली पाहिजे. धार्मिक वागणूकीतून सद्‌गुणांची निर्मिती झाली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना धार्मिक सहिष्णुता शिकविली पाहिजे.

शिक्षणाने श्रमप्रतिष्ठा प्रस्थापित करणे आवश्यक आहे. जेणेकरुन व्यक्ती आत्मनिर्भर होऊन राष्ट्र बलवान बनेल.

**शिक्षणाचे माध्यम :-**

पाश्चिमात्य ज्ञान, विज्ञानापर्यंत भारतीय भाषेच्या माध्यमातून, पोहोचण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे त्यांना वाटत होते. महात्मा गांधीनी उच्च शिक्षण हे भारतीय भाषांतून देण्यात यावे व खरे शिक्षण हे मातृभाषेतूनच मिळू शकते अशा विचारांची पेरणी जनसामान्यात करण्याचा प्रयत्न केला.

कारण आपल्या मुलामुलींना अगदी प्राथमिक शिक्षणापासून इंग्रजी माध्यमातून शिकवणे ही सुशिक्षित समाजात एक फॅशन म्हणून रुढ होत होती. इंग्रजी भाषेचा माध्यम म्हणून पदवी व पदव्यूत्तर परीक्षांसाठी स्वीकार म्हणजे इंग्रजांचे श्रेष्ठत्व मान्य करुन वैचारिक गुलामगिरीच्या

आजही जाणवत होय. ही वैचारिक गुलामगिरी भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गातील मोठा अडथळा होय, असे गांधीजींना वाटत होते. इंग्रजी भाषेवर चांगले प्रभुत्व असलेल्या व My experiments with Truth असे आत्मचरित्र इंग्रजी भाषेतून लिहिणा-या महात्मा गांधींनी शिक्षणाच्या इंग्रजी माध्यमाला विरोध केला, यातील त्यांची राष्ट्रप्रेमाची वृत्ती लक्षात घेतली पाहिजे.

भारतीय भाषांना सक्षम करण्याची जबाबदारी भारतीयांचीच आहे व जोपर्यंत आपण हे काम स्वतः होऊ न आपल्या अंगावर घेत नाही, तोपर्यंत ब्रिटिश राजसत्तेच्या मगरमिठीतून भारतीयांची सुटका नाही हे महात्मा गांधींनी चांगल्या रितीने हेरले होते, म्हणूनच ते म्हणतात, "English, having been made the medium of instruction in all the higher branches of learning has created a permanent bar between the highly educated few and the uneducated many. It has prevented knowledge from percolating to the masses. The escessive importance given to English has cast upon the educated class a burden which has mainmed them mentally for life and made them strangers in their own land. "

मातृभाषेकडे दुर्लक्ष व परकीय भाषा इंग्रजीचा उदो उदो ही चिंतनीय बाब होय. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाकरता आम्ही खर्च करत असलेला वेळ व तरीही या विषयातील विद्यार्थ्यांची नापास होण्याची संख्या हे शिक्षणक्षेत्रातील उत्साहवर्धक चित्र नव्हे. आम्ही मातृभाषेतील उणिवा काढून टाकण्यासाठी पुढे यावयाला हवे असे महात्मा गांधींना वाटत होते.

**स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोन :-**

स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा आदर करणे हे शिक्षणक्षेत्रातील व सुशिक्षित व्यक्तीसमोरील आव्हान आहे. स्त्री ही त्यागाचे मूर्तिमंत प्रतीक

असून संस्कृतीसंवर्धनाची आधारशिला असल्यामुळे तिला शिक्षण देणे आवश्यक आहे. स्त्री शिक्षणाद्वारे कौटुंबिक संस्कार, मुलाबाळांची सुयोग्य जपणूक व संगोपन या गोष्टी साध्य झाल्या पाहिजेत. कुटुंबांतील प्रथम गुरु म्हणून स्त्रीचे महत्त्वाचे स्थान आहे, व स्त्री शिक्षणाद्वारे हे कार्य स्त्रियांना सक्षमपणे येणे आवश्यक आहे.

स्त्री शिक्षण व पुरुष शिक्षण यांतील एकसारखेपणा याला त्यांचा विरोध होता. त्यांच्या मते निसर्गानेच स्त्री व पुरुष हा भेद केला असल्यामुळे काही विशेष विषयांचा अंतर्भाव स्त्री - शिक्षणात असावा असे त्यांचे मत होते. महात्मा गांधी सहशिक्षणाचे पुरस्कर्ते होते पण **सहशिक्षणाची जबरदस्ती करण्यापेक्षा सहशिक्षणास आवश्यक असे पोषक वातावरण निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला.** उच्च नीतितत्वावर आधारित सहशिक्षण असावे असे त्यांचे प्रामाणिक मत होते.

**गांधीजींची मूलोद्योगी शिक्षण योजना (Basic Education)**

दि २३ ऑक्टोबर १९३७ मध्ये वर्धा (महाराष्ट्र) येथे भरलेल्या अखिल भारतीय परिषदेसमोर महात्मा गांधीनी या योजनेचे स्वरुप स्पष्ट केले होते, तसेच "हरिजन" या पत्रातून त्यांनी या योजनेबद्दल लिखाणही केलेले आहे. अखिल भारतीय राष्ट्रीय परिषदेने डॉ. झाकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली या शिक्षण योजनेचा अभ्यास निश्चित करणारी एक समिती नेमली व या समितीने २ डिसेंबर १९९३ रोजी आपला अहवाल सादर केला.

१) ७ ते १४ वर्षे वयापर्यंतच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे, सार्वत्रिक व मोफत असावे.

२) शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे.

३) शिक्षण कोणत्यातरी एका उत्पादक उद्योगाच्याद्वारा देण्यात यावे. (Craft Centered Education)

४) शिक्षण स्वाश्रयी असावे, म्हणजेच निवडलेल्या उत्पादक उद्योगातून शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न सुटावा.

भारतीय शिक्षणपध्दतीतील क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने महात्मा गांधीनी ही योजना मांडली होती. बहुसंख्य दरिद्री, ग्रामीण भारतीय जनता लक्षात घेऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आधारित अशी ही योजना बनविण्यात आली होती.

महात्मा गांधीच्या मूलोद्योगी शिक्षणाच्या योजनेतील जनतेला परवडणारे किमान सात वर्षांचे सार्वत्रिक सक्तीचे शिक्षण ही कल्पना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये ५ वर्षांचे प्राथमिक शिक्षण व ३ वर्षांचे उच्च प्राथमिक शिक्षण या स्वरुपात मांडली असून शिक्षणाचा आकृतिबंध ५+३+२+३ असा असावा असे म्हटले आहे. या आकृतिबंधाला अजून स्थैर्य प्राप्त झाले नाही.

**गांधीजींच्या शिक्षणविषयक नवकल्पना :-**

भारतात शिक्षण हे अधिक लोकाभिमुख होऊन त्याचा अधिक प्रसार व्हावा व शिक्षणाद्वारे व्यवसायाचे ज्ञान व्यक्तीला प्राप्त व्हावे या दृष्टीने महात्मा गांधीनी बरेच प्रयोग करुन पाहिले. मूलोद्योगी शिक्षण हा भारतातील शिक्षणक्षेत्रातील मुख्य प्रयोग होता. साबरमती आश्रम, सेवाग्राम आश्रम यामधून त्यांनी शिक्षण प्रयोग करुन पाहीले.

**१) टॉलस्टॉय फॉर्मची कल्पना.**

दक्षिण आफ्रिकेतील डर्बन पासून २१ मैल दूर असलेल्या टॉलस्टॉय फार्मची स्थापना महात्मा गांधी यांनी १९११ साली केली. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात शिक्षणविषयक प्रयोगांचा उल्लेख केला आहे.

टॉलस्टॉय फॉर्मवर हिंदू, मुसलमान. फारशी, ख्रिस्ती अशा विविध धर्मातील लोक होते. टॉलस्टॉय आश्रम हे कुटुंब होते.

येथील आश्रमवासियांना नोकरांच्या शिवाय बागकाम, शेतीकाम, संडाससफाई, व स्वयंपाकाची व्यवस्था ही स्वत : करावी लागत असे. अक्षरज्ञान वाचन व गणित या करता वर्ग सुरु करण्यात आले. कॅलन बॅग व प्रागजी देसाई यांची त्यांना वर्ग चालविण्याकरिता बरीच मदत झाली. स्वत:ची कामे स्वत:च करावी लागत असल्यामुळे आपोआप शारीरिक शिक्षण मिळत असे. कॅलन बॅंक यांना शेतीच्या कामाची, बागायतीची विशेष आवड होती. हे काम ते मुलांना शिकवित. त्यांना चपला बनविणे व सुतारकाम यांचे ज्ञान होते. त्यांच्यापासून आपणही स्वत : याबाबतीत ज्ञान प्राप्त करुन घेतले व ते इतरांना शिकवले. मुलामुलींना शिक्षणाची सक्ती करावी. शारीरिक दंड त्यांना द्यावा असे महात्मा गांधीना वाटत नव्हते.

पुस्तकी शिक्षणावर गांधीजींचा भर नव्हता. सकाळचा वेळ शेती व गृहोद्योग यासाठी, दुपारचा वेळ इतिहास, भूगोल व गणित या विषयांच्या अभ्यासासाठी दिला जात असे. हिंदी, तामिळ, संस्कृत, गुजराती व उर्दू या भाषा विषयांसोबत इंग्रजीही सर्वांना शिकविली जात असे.

मुले डोळयांनी ग्रहण करतात त्यापेक्षा कानांनी ऐकलेले कमी श्रमात अधिक ग्रहण करु शकतात.

**त्यांच्या शिक्षणाच्या कल्पनेत शारीरिक, मानसिक व बौध्दिक विकासाबरोबर त्यांनी आत्मिक विकासाला महत्त्व दिले आहे.** भजने व नीतीची पुस्तके यांची वाचन याचा समावेश त्यांच्या आत्मिक शिक्षणात होता. शारीरिक शिक्षण शरीराच्या कसरतेने देण्यात येते, बौध्दिक शिक्षण बुध्दीच्या कसरतीने देण्यात येते, आत्म्याची कसरत ही चारित्र्यसंपन्न शिक्षकांच्या वर्तनातूनच प्राप्त होते, असे महात्मा गांधी म्हणतात.

**भारतातील प्रयोग :-**

शिक्षणविषयक नवकल्पनांचा अनुभव घेऊन महात्मा गांधींनी १९१५ साली भारतात पदार्पण केले. महात्मा गांधीं शांतिनिकेतन येथे एक आठवडयापुरतेच राहिले. तेथील अल्प वास्तव्यात **त्यांनी स्वावलंबनाचा व स्वयंपाकाचा प्रयोग शांतिनिकेतन येथे सुरु केला व** १९३२ साली महात्मा गांधीनी "सत्याग्रह आश्रमाचा इतिहास" हे पुस्तक लिहिले.

त्यात त्यांनी आश्रम जीवनात केलेले प्रयोग वर्णन केले असून विद्यार्थ्यांनी कसे शिकावे यांचे मार्गदर्शन केले आहे. १९३४ साली वर्धा जवळील सेवाग्राम येथे आश्रमाची स्थापना केली त्यातील प्रार्थनेद्वारे त्यांनी शिक्षणविषयक अनेक विचार व्यक्त केले. मूलोद्योगी शिक्षणाच्या प्रयोगाची सुरूवात येथून केली.

**नई तालीम - एक नवकल्पना :-**

पुस्तकी शिक्षणाद्वारे शिकवला जाणारा ठरावीक साच्याचा अभ्यासक्रम जीवनात विशेष काही साध्य करु शकत नाही. अभ्यासक्रमातून जीवनाला पवित्र दिशा मिळाली पाहिजे म्हणून आपल्या मूलोद्योग शिक्षणाच्या अभ्यासक्रमाला त्यांनी "नई तालीम" किंवा"जीवन शिक्षण" हा शब्द वापरला आहे. जीवनाच्या गरजांना प्राधान्य देऊन अभ्यासक्रम आखले जावेत असे त्यांना वाटत होते. चांगल्या अभ्यासक्रमाच्या निकषात १) जीवनाभिमुखता २) कृतिपरता ३) समवायता यांचा अंतर्भाव आवश्यक असावा असे त्यांना वाटत होते.

खरा भारत खेडयांत वसत आहे म्हणून ग्रामीण जनतेच्या गरजा पूर्ण करु शकेल असा अभ्यासक्रम त्यांना अभिप्रेत होता. त्यांच्या अभ्यासक्रमाच्या कल्पनेत उत्पादकतेवर भर होता. अभ्यासक्रमाच्या चर्चेत

त्यांनी हस्तव्यवसायाला पायाभूत विषय म्हणून मानले होते. इतर विषयांचा अभ्यास हा समवाय पध्दतीने व्हावा असे त्यांना वाटत होते.

१९२० साली गुजरात विद्यापीठाची स्थापना केली होती. त्याचे "सा विद्या या विमुक्तये" असे ध्येयवाक्य त्यांनी सुचविले होते. शिक्षणातून सर्वंकष मुक्ती त्यांना अभिप्रेत होती. त्यांच्या मुक्तीच्या कल्पनेत इंग्रजी भाषेच्या दास्यत्त्वातून मुक्ती हा अर्थ समाविष्ट होता.

ललित कलांच्या अभ्यासक्रमातील महत्त्वाबद्दल ते म्हणतात, मुलांच्या हाताला शिक्षण देण्याची जितकी गरज आहे, तितकीच त्यांच्या गळयाला वळण देण्याची आहे, मुलामुलींच्या अंतर्यामी जे चांगले गुण आहेत, त्यांना प्रगट होण्यास अवसर देण्यासाठी व्यायाम, व्यवसाय, चित्रकला या बाबी त्यांना इतर विषयाबरोबर शिकविल्या जात. योग्य शिक्षकांद्वारे देता येणे शक्य असेल तर अभ्यासक्रमात लैंगिक शिक्षणाचाही अंतर्भाव करण्यात यावा, कारण त्याद्वारे कामवासनेवर विजय मिळविणे व प्रजननाचा शास्त्रोक्त अभ्यास करणे शक्य होऊ शकते असे महात्मा गांधी यांचे मत होते.

शिक्षणामधून सर्वसाधारण नीतितत्वे शिकविण्यावर व सर्वधर्मसमभावावर लक्ष केंद्रित करावे असे त्यांना वाटत होते. व्यक्तीची सहिष्णुता विकसित होऊन दृष्टी व्यापक व्हावी असा त्यांचा दृष्टिकोन होता. महात्मा गांधींची नैतिक शिक्षणाची कल्पना ही त्यांच्या सुयोग्य धार्मिक शिक्षणाशी निगडित होती.

**अध्ययन अध्यापनाच्या पध्दती :-**

**स्वयं अध्ययन पध्दती :-**

व्यक्ती स्वत : स्वतःचा शिक्षक बनू शकतो.शिकण्याची इच्छा जागृत झाली की, व्यक्ती भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास करुन इ

ानप्राप्तीचा मार्ग शोधते व आश्यक तेथेच शिक्षकांचे मार्गदर्शन घेते, अशी जाणीवपूर्वक स्वयं अध्ययन ही शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाची बाब होय.

कार्य करताकरता कार्याचा अनुभव मिळतो. निरीक्षण करण्याची इच्छा निर्माण होते व व्यक्तीची प्रयोगशील वृत्ती वाढीस लागते. त्यातून सेवाभाव व मानवाविषयीचे प्रेम वृध्दिंगत होते.

**कृतिकेंद्रित अध्यापनपध्दती :-**

आपल्या मूलोद्योगी शिक्षणाच्या योजनेत प्रात्यक्षिकांना व हस्तव्यवसायातील विविध कृतिपर कार्यक्रमांना प्राधान्य दिले होते. त्यातून व्यक्तीचे सामर्थ्य पणास लागते व बुध्दीला योग्य दिशा मिळते.

**समवाय अध्यापनपध्दती :-**

महात्मा गांधीनी मूलोद्योगी शिक्षणयोजनेतील समवायद्वारे अध्यापनाच्या या पध्दतीला महत्त्वाचे स्थान दिले होते. मूलोद्योगी शिक्षणयोजनेद्वारे शिक्षणात समवाय पध्दतीचा अवलंब करुन शिक्षणक्षेत्रात एक अभिनव प्रयोग करण्याचा महात्मा गांधींनी प्रयत्न केला. एका विशिष्ट हस्तव्यवसायाला पायाभूत विषय समजून तो समवायाद्वारे केंद्रस्थान व इतर विषयांचा त्या अनुषंगाने अभ्यास व नंतर समग्र उद्योगाचा अभ्यास अशी अध्यापनाची पध्दती होती.

साधनशुचितेवर भर देणारी, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारी प्रयोगशील व्यक्ती अशी महात्मा गांधींची प्रतिमा आहे. भारतीय अध्यात्मवादावर तिचा अढळ विश्वास आहे, तर कृतिशीलतेवर आधारित मनुष्य कर्तृत्वाला दिलेल्या महत्त्वामुळे तिची कार्यवादाशी जवळी प्रस्थापित झालेली आहे. इतकेच नव्हे तर नैसर्गिक सहजसुलभ प्रवृत्तीनुसार व्यक्तिस्वातंत्र्य देण्यासही तिचा पुढाकारच आहे, आणि म्हणूनच महात्मा

गांधीच्या शैक्षणिक विचारात भारतीय अध्यात्मवाद, कार्यवाद व निसर्गवाद यांचा मनोज्ञ संगम झालेला दिसून येतो.

भारतासारख्या नवोदित स्वतंत्र राष्ट्राला स्वाभिमानाने जगावयाचे असेल तर महागडी नसलेली राष्ट्रीय शिक्षणपध्दती भारतात विकसित व्हावी या दृष्टीने महात्मा गांधीनी शिक्षणाचा केलेला विचार पृथगात्मक स्वरुपाचा, व्यावहारिक व प्रयोगशील असल्यामुळे महात्मा गांधी श्रेष्ठ शिक्षणतज्ञ ठरतात.

**महात्मा गांधीचे शिक्षणक्षेत्रातील योगदान बहुविध स्वरुपाचे आहे. त्यात शिक्षणाची नवीन ध्येयदृष्टी आहे, अभ्यासक्रमाचा नवोदित दृष्टिकोन आहे, इतकेच नव्हे, तर मर्यादित स्वरुपाचे व्यक्तिस्वातंत्र्यही आहे. स्त्री शिक्षण, धार्मिक व नैतिक शिक्षण, लैंगिक शिक्षण, भाषा शिक्षण, कला शिक्षण व शिक्षणाचे माध्यम या बाबतीतील महात्मा गांधीचे विचार अत्यंत पुरोगामी आहेत. शिक्षणाच्या बहुविध अंगोपांगाचा मूलगामी विचार करणारा विचारवंत या दृष्टीने महात्मा गांधीचे शिक्षणक्षेत्रातील स्थान अनन्यसाधारण व ध्रुवासारखे अढळ आणि निश्चयी स्वरुपाचे आहे.**

म्हणूनच सत्य, अहिंसा, साधी राहणी व उच्च विचारसरणी, साधनशुचिता या महान तत्वांचा अवलंब करुन आपल्या विशिष्ट तंत्रमंत्राने ब्रिटीश साम्राज्यशाहीला हादरा देणारे, परिश्रम व स्वावलंबनाच्या पायावर भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेद्वारा स्वराज्यातून सुराज्याचे स्वप्न पाहणारे महान द्रष्टे, विचारवंत दीन, दरिद्री शोषित, पीडित जनतेची मानवतावादी दृष्टीने सेवा करणारे महात्मा गांधी केवळ थोर शिक्षणतज्ञच नव्हे तर राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय स्तरावरील युगपुरुष ठरले.

## २. मुल्यशिक्षणाचा प्रमुख स्त्रोत - अभ्यासक्रम

आज ज्ञानाच्या प्रगतीचा वेग प्रचंड असल्याने ज्ञानाच्या कक्षा खूपच विस्तारित होत आहेत. ज्ञानाच्या प्रगतीबरोबर, शिक्षण व अभ्यासक्रम यांची गती कायम ठेवण्यासाठी त्यात सतत सुधारणा व पुनर्रचना करावी लागणार आहे. शिकणा-यांची संख्या ही आज दिवसेंदिवस वाढत आहे. समाजहित साधणारी, समाज जीवन समृध्द करणारी, संस्कारित पिढी मूल्याधिष्ठित शिक्षणाने निर्माण करणे, व्यक्तीच्या शक्तीचा समाजानुकूल विकास करणे हे शिक्षणाचे कार्य. शिक्षण देण्यासाठी औपचारिक ज्ञानाची निर्मिती झाली. विद्यार्थी हा शाळेतील महत्वपूर्ण घटक आहे. उद्याचा समाज तोच घडविणार आहे. शाळा ही सर्वस्वी समाजासाठीच आहे म्हणूनच तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात जाणीवपूर्वक, काळजीपूर्वक, मूल्यांची रुजवणूक करणे आवश्यक ठरते त्यादृष्टिनेच विचार करुन इ.स. २००५ च्या राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडयात असे नमूद केले की, अभ्यासक्रम विषयक सर्व कार्यक्रम आपल्या राज्यघटनेतील मूल्यांवर आधारित असावेत. सर्व विषयांच्या व सुयोग्य उपक्रमांच्या माध्यमातून शांतताविषयक मुल्यांची रुजवणूक होण्यास प्रोत्साहन मिळेल. अभ्यासक्रमातून अध्ययनार्थींमध्ये लोकशाही पध्दतीच्या कार्यातून स्वयंशिस्तीचे मूल्य विकसित व्हावे. शालेय स्तरावरील संपूर्ण अभ्यासक्रम हा दहा गाभा घटकांवर आधारलेला दिसून येतो. याचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनाची जडणघडण, वर्तन, चारित्र्य यांच्या विकासाला चालना देण्यासाठी व योग्य दिशा देण्यासाठी राष्ट्रीय ऐक्य आणि मानव जातीचे

कल्याण लक्षात घेऊन मूल्य संस्कार होणे अनिवार्य आहे. हीच अपेक्षा आजच्या शिक्षणातून पर्यायाने अभ्यासक्रमातून केली जाते.

"व्यक्ती, वस्तू परिस्थिती हयांचे अपेक्षित महत्व, अपेक्षित किंमत व अपेक्षित विश्वासार्हता म्हणजे मूल्य. "

व्यक्ती, वस्तू, परिस्थिती हयांच्याविषयी व्यक्तीचा असणारा किंवा अपेक्षित असणारा चांगला सामाजिक दृष्टिकोन म्हणजे मूल्य.

वा. गो. आपटे ह.अ.भावे यांच्या विस्तारित शब्दरत्नाकर हया शब्दकोशानुसार मूल्य हा मुळात संस्कृत शब्द आहे. Value म्हणजे मोल, किंमत. मोल म्हणजे महत्व. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीनुसार Value या शब्दाचे मूळ Vaere हया लॅटीन शब्दात आहे. Valere म्हणजे किंमतीचा असणे. Value म्हणजे उपयुक्तता, योग्य व चांगल्या गोष्टींचा समन्वय व समुच्चय. याचाच अर्थ असा की, मूल्य म्हणजे, " चांगल्या गोष्टीचा वर्ग. " व्यक्ती व समाजासाठी जे काही चांगले असेल ते मूल्य. काही मूल्ये स्थलकालानुरूप बदलतात. तर काही श्वाश्वत व सार्वत्रिक असतात. ती व्यक्तीजीवनाला योग्य दिशा देणारी, योग्य वर्तन करायला भाग पाडणारी असतात.

**तात्पर्य :-**

माणूस हा मूल्यांचा मूलस्त्रोत. माणूस मूल्यांची निर्मिती करतो. आणि माणसाने निर्माण केलेली मूल्ये माणसाला वागायला, स्वतःच्या वागण्यात चांगले बदल घडवून आणायला शिकवतात. माणसाची संवेदनशीलता माणसाला समाजशील, सौजन्यशील व्हायला शिकवते.

प्रवास, धर्म, संतपरंपरा, राज्यसंस्था, प्रबोधन, स्वातंत्र्यलढा, विज्ञानातील शोध, शिक्षण, राष्ट्र, राष्ट्रध्वज, राष्ट्रमुद्रा, राष्ट्रीय ध्येयवाक्यता,

राष्ट्रगीत, राष्ट्रीय अभिवादन, राष्ट्रीय पशू, राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रीय पुष्प, राष्ट्राचे संविधान, राष्ट्रलिपी, राष्ट्रभाषा, राष्ट्रसंघ, वर्तमान काळाची आवाहने आणि आव्हाने, हे सर्व आणि इतरही मूल्यांचे स्त्रोत मूल्यशिक्षणाचे स्त्रोत आहेत. मात्र शालेय स्तरावरील अभ्यासक्रम हा मुख्य मूल्य स्त्रोत दिसून येतो.

**अभ्यासक्रम**

अभ्यासक्रम म्हणजे शिक्षणाचे स्पंदन, आंदोलन, शिक्षणातला पाऊस आणि वादळसुध्दा. अमंगल, अपवित्र, अनिष्ट, अवमूल्य, नामशेष करुन मंगल, पवित्र, इष्ट, मूल्य हयांना उभारी आणि भरारी देणारे वादळ. अभ्यासक्रमामुळे शिक्षणाला जिवंतपणा येतो. कॅसवेलने जिवंत शालेय परिसराला अभ्यासक्रम म्हटले आहे. शालेय परिसर तेव्हाच जिवंत ठरतो, जेव्हा तो चैतन्याने भारलेला असतो. शालेय परिसरात जेव्हा हसते खेळते सळसळते आणि जेवढेच धीर गंभीर अनुभव जेव्हा विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, प्रशासक, व्यवस्थापक हयांच्या व्यक्तिमत्वात मूल्यांची रुजवणूक करत असतात, आणि हे सर्व व्यक्तिमत्वाला समृध्द करत असतात. 'अभ्यासक्रम म्हणजे व्यक्तिमत्त्वात मूल्यांची रुजवणूक व विकसन करण्याचे निर्धारित साधन होय'. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून व्यक्तीच्या वर्तनात जे योग्य परिवर्तन साधावयाचे असते ते मूल्यांच्या अनुषंगानेच असते. हया मूल्य प्रेरित परिवर्तनातूनच व्यक्तीच्या चारित्र्याची जडणघडण होत असते.

इ.स. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने हेच मत व्यक्त केले आहे. हे धोरण अभ्यासक्रमात व्यक्तीचा चारित्र्य विकास व राष्ट्रीय एकात्मतेचा विकास हयांच्यावर आवर्जून भर देते. हया राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सुचविलेले उपाय

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास.

२) भारतीय संविधानात्मक जबाबदा-या

३) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यास आवश्यक आशय

४) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.

५) समानतावाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही.

६) स्त्री - पुरुष समानता.

७) पर्यावरणाचे संरक्षण.

८) सामाजिक अडसरांचे निर्मूलन.

९) छोटया कुटुंब प्रमाणकांचे पालन.

१०) वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिपोष

वरील सर्व अभ्यासक्रमाचे दहा गाभाभूत घटक म्हणजे दहा मूल्येच होत. अभ्यासक्रम रचनेची तत्वे ही ख-या अर्थाने मूल्येच असतात. ही मूल्ये राष्ट्रीय जीवनप्रणाली व संस्कृती हयांच्या विकसनावर भर देत वैश्विक जीवनप्रणाली व संस्कृती हयांच्याविषयी सदविचार करायला लावतात. कारण अवघ्या विश्वाबददल आपुलकीचा सदविचार हे आपल्या संस्कृतीचे आत्मतत्त्व असते.

"मानवी वर्तनाला नियंत्रित करणारी, सर्वमान्य मार्गाने जीवनाची वाटचाल करायला लावणारी बाब म्हणजे मूल्यशिक्षण. "

**मूल्यशिक्षणाचा मुख्य स्त्रोत अभ्यासक्रम**

शिक्षणात विविध विषयांचा अंतर्भाव केला जातो. या विषयांच्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना अनुभव देऊन त्यांच्या वर्तनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू होय. शिक्षण म्हणजे मूल्य. मूल्य म्हणजे शिक्षण. तरीही मूल्यशिक्षणाची आवश्यकता आहेच. ती शिक्षणाला अधिक ध्येयसंपन्न, उदिदष्टसंपन्न, विचारसंपन्न करण्यासाठी.

प्रक्रियासंपन्न, अध्ययनसंपन्न, संशोधनसंपन्न, परीक्षासापेक्ष करण्याऐवजी पण आजचे शिक्षण परीक्षाविपन्न झालेले आहे. ह्या परीक्षा, विपन्नतेची कारणे म्हणजे, अध्यापनविपन्नता, अध्ययनविपन्नता, संशोधनविपन्नता. ह्या विपन्नतेमुळेच आजच्या शिक्षणाचा सर्वांगीण विकास खुंटला आहे. या खुंटल्यापासून मुक्त होण्यासाठी प्रामाणिकपणा, सळसळ, जिद्द, चिकाटी अशा मूल्यांचे शिक्षण लागणारच आणि त्यासाठी आवश्यक आहे आशयसंपन्न अभ्यासक्रम. आशयसंपन्न अभ्यासक्रम हा गाभा घटकांवर आधारलेला असतो. कारण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सत्प्रवृत्ती वाढाव्यात, सद्भावनांचा परिपोष व्हावा. विद्यार्थ्यांचे वर्तन, चारित्र्य आणि क्षमता याबाबत नैतिक संस्कार केले जावेत. राष्ट्रीय ऐक्य आणि मानवजातीचे कल्याण लक्षात घेऊन विद्यार्थ्यांवर संस्कार केले जावेत हा अभ्यासक्रमरचनेचा प्रमुख उद्देश दिसून येतो.

**गाभा घटकाशी संबंध**

गाभा घटकाची ही संकल्पना विविधतेतून एकात्मता जपण्याच्या गरजेतून निर्माण झालेली आहे. शालेय अभ्यासक्रम ठरविताना, संपूर्ण देशाच्या समान गरजा ठरविताना अभ्यासक्रमांतर्गत विविधतेवर नव्हे तर एकात्मतेवर भर देणे आवश्यक ठरेल. भारतातील सर्व राज्यांच्या समान गरजा लक्षात घेऊन आणि भारताची एकात्मता जोपासण्याच्या दृष्टिकोनातून जे घटक शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत केले जातात त्यांना "गाभा घटक" असे म्हणतात.

मूल्यशिक्षण ही गाभा घटकाच्या पुढची पायरी आहे. गाभातत्त्वाचे उपयोजन म्हणजे मूल्यशिक्षण. हे उपयोजन अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करावयाचे असते.

शासनाने दिलेली सर्व दहा मूल्ये जरी गाभातत्त्वावर आधारलेली नसली तरी बरीचशी मूल्ये ही गाभातत्वांशी संबंधित आहेत. उदा. "राष्ट्रभक्ती" हे मूल्य राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यासाठी आवश्यक आशय व भारतीय स्वातंत्र्य चळवळ या दोन गाभा घटकांशी संबंधित आहे. तर "स्त्री - पुरुष समानता" या गाभा घटकावर आधारलेली मूल्ये ही स्त्री-पुरुष समानता होय तसेच "वैज्ञानिक दृष्टिकोन" या बाबतीतसुध्दा एकरुपता आहे कारण हे मूल्य वैज्ञानिक मनोभावांची रुजवणूक या गाभाघटकांशी संबंधित आहे. हे सर्व गाभाघटकांतर्गत येणारे मूल्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करणे म्हणजे मूल्यशिक्षण. की ज्याद्वारे विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित बदल करणे सहज साध्य होईल. जसे मूल्यसंस्कार व मूल्यसंवर्धन करण्यासाठी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मूल्यांचे ज्ञान देणे योग्य वृत्ती घडविणे यासाठी पोषक वातावरण निर्मिती करता येते.

- निरोगी जीवनासाठी आरोग्याचे धडे अभ्यासक्रमातून गिरविता येतात.
- समाजाचा एक घटक म्हणून सामाजिक बांधिलकी मानणे. समाजऋणाची परतफेड करण्याचे भान ठेवणे, सामाजिक एकसंघता व सर्वधर्मसमभाव ही मूल्ये अभ्यासक्रमातून संक्रमित व संवर्धित करता येते.
- परिसरातील कलाकृती निसर्ग, पर्यावरण, प्राणीमात्र यांची जोपासना, त्याबद्दल प्रेम वाढीस लावणे ही मूल्ये वृध्दिंगत होतात.
- स्वतंत्र राष्ट्राचा नागरिक म्हणून राष्ट्रभक्ती अंगी बाणणे, राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रीय विकास यासाठी पोषक अशा मूल्यांचा

संस्कार अभ्यासक्रमातून केला जातो आणि यामधूनच अपेक्षित वर्तन बदल होऊ लागतात.

**अभ्यासक्रमातून होणारे मूल्यसंस्कार व अपेक्षित वर्तनबद्दल.**

**१) राष्ट्रीय एकात्मता.**

- एकात्मता समाजाचे विघटन करणा-या शक्तीबद्दल विद्यार्थ्यांला तिटकारा वाटू लागतो.
- भारतीय भाषांचा अभ्यास करतो.
- सर्वधर्म सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये जीवनात कटाक्षाने पाळण्याचा प्रयत्न विद्यार्थी करीत असतो.
- नागरिकत्वाची भावना निर्माण होऊन विविध राज्यातील, प्रांतातील चालीरीती विषयी आदराची भावना बाळगतो.

**२) वैज्ञानिक दृष्टिकोन.**

- नैसर्गिक घटनामागील कार्यकारणभाव शोधण्याचा प्रयत्न करतो.
- निरीक्षण क्षमता वाढते.
- एखादी समस्या समोर आल्यास न घाबरता ती वैज्ञानिक पध्दतीने सोडवतो.
- विचार तर्कशुध्द, सुस्पष्ट व मुद्देसुदपणे मांडतो.
- पर्यावरणातील घटनांचा कार्यकारणभाव जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारतो.
- नवीन कल्पनांचा विचार व स्वीकार करण्याची तयारी दाखवितो.

**३) श्रमप्रतिष्ठा.**

- श्रमदानाच्या उपक्रमात सक्रीय सहभागी असतो.
- श्रमजीवी व्यक्तींशी बोलतांना आदराची भावना बाळगतो.
- श्रमजीवींच्या भेटी घेऊन त्यांचे सुख:दुख जाणून घेतो.
- स्वत:चे घर, शाळा, ग्रंथालय, क्रीडांगण स्वच्छ ठेवतो व इतरांनाही प्रवृत्त करतो.

**४) सौजन्यशीलता.**

सौजन्य म्हणजे प्रत्येकाशी प्रेमळपणाने वागणे, समजून घेणे, दुस-यांना दु:ख होइल असे न वागणे तसेच दुस-याचे मत शांतपणे व पूर्णपणे ऐकून प्रतिसाद देणे, म्हणजे सौजन्यपूर्ण वागणे. उदा -

- वडिलधाऱ्या व्यक्तींशी विनयाने वागतो.
- शिक्षक, मुख्याध्यापक, पाहुणे, पालक मित्र यांच्याशी सौजन्याने वागतो.
- सार्वजनिक ठिकाणी, सभास्थानी संभाषण, भाषण करतांना योग्य शिष्टाचार सहजपणे जाणीवपूर्वक पाळतो.
- कृतज्ञता व्यक्त करणे, दिलगिरी, अभिवादन करणे, संबोधन याकडे विद्यार्थी जाणीवपूर्वक लक्ष देतो.

**५) सर्वधर्मसहिष्णूता.**

सर्वधर्म विषयी सारखाच भाव असणे म्हणजे सर्वधर्मसहिष्णुता.

- विद्यार्थी प्रत्येक धर्मातील चांगल्या गोष्टी अंगी बाणवण्याचा प्रयत्न करतो.
- परधर्मातील आदर्श तत्त्वे समजून घेण्याचा प्रयत्न करतो.
- इतर धर्मातील मित्रांशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवतो.
- विविध धर्मातील संत, धर्मसुधारक यांची चरित्रे व साहित्य वाचतो.

सामर्थ्य व वैभवशाली राष्ट्रासाठी सर्वधर्मसहिष्णुता आवश्यक असते कारण राष्ट्रातील शांतता व समृध्दी यावरच अवलंबून असते व ही निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रम महत्वाचा स्त्रोत ठरतो.

**६) स्त्री-पुरुष समानता.**

स्त्री-पुरुष समानता म्हणजे स्त्रियांचा योग्य सन्मान, स्त्रियांवरील अन्याय किंवा त्यांची अप्रतिष्ठा होइल अशा परंपरा न मानणे, गुण व अभिव्यक्ति यात सारखेपणा असणे, सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने व्यक्तीमत्व विकासाची समानसंधी म्हणजे "स्त्री-पुरुष" समानता मूल्य की जे अभ्यासक्रमातून वृध्दिंगत होते व विद्यार्थी वर्तनात अपेक्षित बदल दिसून येतात जसे....

- स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केलेत, त्यांची माहिती मिळवतो.
- देशाकरिता त्याग केलेल्या स्त्रियांची उदाहरणे उद्धृत करतो.
- स्त्री-पुरुष समानता दाखविणा-या पाठयपुस्तकातील आशयाचे स्वागत करतो.

- विद्यार्थी-विद्यार्थिनी एकमेकांच्या सहकार्याने कामात सहभागी होतात.
- स्त्री-पुरुष समानतेचे तत्व समजून घेतो.

**७) संवेदनशीलता.**

संवेदनशीलता म्हणजे मनाचा हळुवारपणा. सभोवतालच्या माणसांची सुखदु:खे जाणीवपूर्वक समजून घेणे. दुस-यांचे दु:ख दूर करण्याचा निश्चयीपणा आणि सुखातही सहभागी होण्याची उदारता म्हणजे संवेदनशीलता. समाजमनाची जडणघडण ही संवेदनशीलतेतूनच होते. संवेदनशील व्यक्तिमत्त्व घडविण्यातच शिक्षणाचे सामर्थ्य आहे की जे केवळ अभ्यासक्रमातून साध्य होऊ शकते. उदा-

- आपल्या कोणत्याही कृतीमुळे इतरांस त्रास होणार नाही याची काळजी घेतो.
- शेजारच्या वर्गास आपल्या गोंगाटामुळे त्रास होणार नाही याची काळजी घेतो.
- शाळेच्या बागेतील फुलझाडे जतन करतो. वाढवितो, फुले तोडत नाही. तोडणा-यास प्रतिबंध करतो.
- प्राणिमात्रांविषयी दयाभाव व्यक्त करतो.
- प्रतिकूल परिस्थितीत शिकणा-या आपल्य वर्गबंधूला मित्रांच्या सहकार्याने जाणीवपूर्वक मदत करतो.
- नैसर्गिक संकटग्रस्तांना स्वत: होऊन मदत करतो.

## ८) राष्ट्रभक्ती.

राष्ट्रभक्ती हे श्रेष्ठ जीवन मूल्य आहे.त्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून हे मूल्य संस्कारित करणे आवश्यक असते व त्यासाठी अभ्यासक्रमाचा साधन म्हणून उपयोग होऊ शकतो. राष्ट्राच्या संवर्धनार्थ, पोषणार्थ आणि संरक्षणार्थ समर्पणाची भावना ठेवणे. राष्ट्रभक्तील अपेक्षित असते. राष्ट्रीय इतिहास, संस्कृती, भारतीय संविधान, पर्यावरण साधनसंपत्ती याबाबत अढळ श्रध्दा व प्रेम बाळगून त्यानूसार सर्मपित भावनेने वर्तन करणे अपेक्षित असते जसे-

- विद्यार्थी सांस्कृतिक वारसाची जपवणूक करतो.
- आपली प्राचीन सांस्कृतिक परंपरा, समृध्द वारसा याविषयी डोळसअभिमान बाळगतो.
- देशभक्तीपर गाणी म्हणण्यात विशेष रस घेतो.
- राष्ट्रीय व नैसर्गिक आपत्तीबाबत आपल्या देशबांधवाच्या मदतीला तन-मन-धन स्वरुपात धावून जातो.
- राष्ट्रीय प्रतीके, राष्ट्रीय सण यांचे महत्व जाणतो व त्यांच्याविषयी आदर बाळगतो.

स्त्रोतांपासून मूल्यांचा उदय होतो आणि मूल्य व्यक्तीला सद्‌वर्तनासाठी प्रेरित करतात आणि त्यानुसार व्यक्तीचे सद्‌वर्तन घडत राहते. व्यक्तीच्या वर्तनात वरीलप्रमाणे अपेक्षित बदल होत असतात म्हणून त्यांना मूल्यशिक्षणाचे स्त्रोत असे म्हणतात. माणूस हा मूल्यांचा मूल्यस्त्रोत असल्याने तो मूल्यशिक्षणासाठी मूल्यस्त्रोत ठरतो त्याप्रमाणे **अभ्यासक्रम हे शालेय पातळीवरील मूल्यशिक्षणाचे मुख्य स्त्रोत आहे.**

**अभ्यासक्रमातील मूल्यसंक्रमणात शिक्षकाची भूमिका.**

मूल्यांचे संक्रमण करण्यासाठी शिक्षकांना महत्त्वपूर्ण भूमिका बजवावी लागेल. प्रत्येक विषयाच्या शिक्षकाला आपल्या प्रत्येक पाठाचे, घटकाचे अध्यापन करतांना त्यातून कोणते मूल्य संस्कारित करावयाचे आहे याचा अभ्यास करावा लागेल. त्यासाठी कोणते अध्यापन-प्रसंग योजावयाचे याची पूर्वतयारी करावी लागेल आपल्या विषयाच्या बरोबरीने मूल्यांचा अभ्यास, व्यासंग ठेवावा लागेल. विविध चरित्रे, सुभाषिते, चित्रे, कविता, स्फूर्तिगीते, ऐतिहासिक -पौराणिक-सामाजिक कथा, विविध प्रार्थना, श्लोक, नाटयपूर्ण प्रसंग यांचा संग्रह प्रत्येक शिक्षकाजवळ असला पाहिजे. तो त्यांनी वाढवला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे अध्ययन, निरीक्षण, सहानुभूतीने करावे लागेल. विद्यार्थ्यांना नैतिक गुणांचा परिचय करुन देणे. त्यांची गोडी वाढवणे, नैतिक गुणांचा चांगल्या वर्तनाशी संबंध जोडणे, नैतिक मूल्यांच्या आचरणात कष्ट असले तरी निष्ठेने त्यांचे आचरण करणे कसे आवश्यक आहे, हे पटवणे यासाठी शिक्षकांना महत्त्वपूर्ण भूमिका बजावावी लागेल.

परिपाठांचे नियोजन करणे, त्यात तोच तो पणा येणार नाही. याची काळजी घेणे. शिक्षक व विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त व सहज सहभाग राहील याची काळजी घेणे, सर्वांची जबाबदारी स्वीकारुन या सर्व बाबींमध्ये चैतन्य ठेवावे लागेल. मूल्यसंस्कारास योग्य असे वातावरण निर्माण करावे लागेल. सर्व विषयांच्या सर्व शिक्षकांचा आपापल्या विषयातून मूल्यसंक्रमण करण्यात सहभाग आहे का ? व सर्वजण उत्स्फूर्तपणे व सहजपणे शैक्षणिक उपक्रमात सहभागी होत आहेत की नाही ? याचेही पर्यवेक्षण करावे लागेल. पालकांशी संपर्क ठेवून मूल्यमापनाची दृष्टी ठेवून नोंदी ठेवाव्या लागतील. विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी समाजातील मान्यवरांची

व्याख्याने आयोजित करणे. मूल्यशिक्षणाशी संबंधित ग्रंथ शालेय ग्रंथालयासाठी घेणे याकडेही अध्यापकांना लक्ष द्यावे लागेल.

अभ्यासक्रमातून नवनवीन शैक्षणिक उपक्रमांचा शोध घेणे, उपक्रमांची रेखीव आखणी करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे याकडे शिक्षकांनी लक्ष ठेवणे अगत्याचे आहे. शिक्षकांनी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून नवनवीन शैक्षणिक उपक्रम शोधले तर मूल्यशिक्षणात चैतन्य निर्माण होईल व मूल्यांचे संक्रमण करणे सहज शक्य होईल.

❖ ❖ ❖

# ३. मुल्य शिक्षणातून व्यक्तिमत्व विकास

व्यक्तीला सुसंस्कारित जीवन जगण्यासाठी, समाजात कुशलतेने आणि यशस्वीपणे वावरण्यासाठी केवळ निसगप्राप्त शिक्षणावर अवलंबून राहता येणार नाही. जीवन जगत असतांना अनेक गोष्टी व्यक्तीला प्रयत्नपूर्वक शिकाव्या लागतात. सुसंस्कृत जीवनासाठी सामाजिक, सांस्कृतिक, परंपरा नैतिक मूल्ये इत्यादी. गोष्टी स्वयं प्रयत्नानेच साध्यकराव्या लागतात. दैनंदिन अनुभवातून विशेषतः कुटूंबात, समाजात वापरतांना आवश्यक ती सर्व मूल्ये विकसित होतीलच असे नाही. त्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून शिक्षण देण्याची व्यवस्था करावी लागते. भविष्यातील भारत आजच्या शांळामधूनच घडणार आहे. त्यादृष्टीने शाळांमधून विद्यार्थ्यांवर जाणिवपूर्वक संस्कार होणे आवश्यक आहे. कारण आजचा विद्यार्थी हा कुटुंबाचा, समाजाचा घटकच नव्हेतर राष्ट्राचा भावी आधारस्तंभ, एक सुजाण नागरिक रहाणार आहे.

२०व्या शतकात अनेक परिवर्तने घडून आलीत. तांत्रिक, वैज्ञानिकदृष्टया देशाचा विकास होवून या भौतिकक्षेत्रात मानवाने विलक्षण प्रगती केली. मात्र त्याप्रमाणात व्यक्तीच्या चारित्र्याच्या, नैतिकतेचा विकास झालेला दिसून येत नाही. समाजात सध्या मूल्यांची घसरण झाली दिसून येते. विघातक दृष्ट प्रवृत्तीने समाजव्यवस्था नष्ट होत आहे. "साधी राहणी व उच्च विचारसरणी" ही तत्त्वेच आज मागे पडलेली आहे. प्रामाणिकपणाची जागा फसवणूकीने घेतली. या बदलत्या सामाजिक मूल्यव्यवस्थेचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे. शिकण्याची मूल्ये वेगळी व आचरणात आणावयाची मूल्ये वेगळी असा संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे "व्यक्तिमत्व" दुभंगण्याचीच शक्यता जास्त दिसून येते. हा

मूल्यसंघर्ष मिटवण्यासाठी व विद्यार्थ्यांचे "प्रगल्भ व्यक्तिमत्व" तयार करण्यासाठी आवश्यक आहे शालेय शिक्षणासोबतच परिणामकारक मूल्यांची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे.

**व्यक्तिमत्व**

दैनंदिन व्यवहारात "व्यक्तिमत्व विकास" या दोन शब्दांचा वापर सहजगत्या होतांना दिसून येतो. व्यक्तीला व्यक्तिमत्व असते. तसेच व्यक्तिमत्वसुध्दा असते. व्यक्तिचे नाव, गाव, पत्ता, शरीराची ठेवण चालण्याची ढब, बोलण्याची शैली इत्यादी घटक तिचे व्यक्तिमत्व ठरवतात. व्यक्तिमत्व हे अधिक खोलवर रूजलेले असते. व्यक्तीच्या अभिरूची, अभिव्यक्ती, मूल्ये, जीवनाकडे व स्वत:कडे पाहण्याचा दृष्टीकोन यांचा समुच्चय म्हणजे व्यक्तिमत्व.

व्यक्तिमत्व हे सतत बदलत असते. व्यक्तीच्या वर्तनाला वळण देत असते. कोणत्याही व्यक्तिमत्त्वाचे विशिष्ट वर्तन हे त्या वेळेची परिस्थिती आणि आंतरव्यक्ती संबंधावर अवलंबून असते. व्यक्तिमत्वाचे वर्णन हे तिच्या गुणविशेषांनी करता येते. म्हणूनच जीवनोपयोगी मूल्ये व व्यक्तिमत्व यांचा परस्परसंबंध दिसून येतो.

व्यक्तीने स्वत:मध्ये काही सामाजिक, मानसिक, कौशल्य निर्माण व्हावी हा व्यक्तिमत्व विकासाचा खरा उद्देश असतो. त्यादृष्टीने भावनिक संतुलन साधून परिणामकारक आतंर्व्यक्तित्व संबंध निर्माण करणे आवश्यक असते.

केवळ आकर्षकता, मोहकता, प्रामाणिकपणा, तापटपणा, आळशी स्वभाव, हट्टीपणा म्हणजे संपूर्ण व्यक्तिमत्व नव्हे. तर "व्यक्तींचे वैशिष्ट्पूर्ण वर्तन व विचार निर्धारित करणारे, तिच्या अंतर्गत असणारे

मनोशारिरीक संस्थाचे गतिशील संघटन म्हणजे व्यक्तिमत्व होय." --"ऑलपोर्ट

व्यक्तिमत्व हे प्रत्येकाला असतेच मात्र "प्रगल्भ व्यक्तिमत्व" हे सहजासहजी प्राप्त होणारी गोष्ट नव्हे. "ज्या व्यक्ती स्वत:मधील क्षमता, बुध्दिमत्ता, चारित्र्य यांचा पूर्णत: उपयोग करतांना स्वत:मधील सुप्त गुणांचा विकास घडवून आणण्यासाठी धडपडतात, स्वत:ला आलेल्या विविध अनुभवांतून स्वत:विषयी पूर्ण ज्ञान संपादन करतात अशांना प्रगल्भ व्यक्तिमत्व लाभलेले असते असे समजावे. प्रगल्भ व्यक्तिमत्वाकडे वाटचाल करणे ही सतत घडत राहणारी एक प्रक्रिया आहे.

**प्रगल्भ व्यक्तिमत्वाची लक्षणे :-**

ऑलपोर्ट यांनी प्रभावी व्यक्तिमत्वाची एकूण सहा वैशिष्टे सांगितली आहेत.

१. व्यापक 'स्व'ची जाणीव

२. घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्याची क्षमता.

३. भावनिक सुरक्षितता

४. वास्तववादी संवेदन

५. वास्तव 'स्व'ची जाणीव

६. जीवनाविषयक एकात्म दृष्टीकोन

इ.स. १९८६च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षणपध्दती ही सामाजिक व नैतिक मूल्ये निर्माण करणारी असावी. त्यासाठी सांस्कृतिकदृष्टया बहुविध असणाऱ्या समाजात सर्वसामान्य जनतेत ऐक्य व पुर्णत्व येण्यासाठी शिक्षणाने वैश्विक व शाश्वत मुल्यांना उत्तेजन दिले पाहीजे असा विचार मांडलेला आहे.

**मुल्यशिक्षण - अर्थ व स्वरूप**

जीवनाला योग्य दिशा दाखवू शकतात अशी मार्गदर्शक तत्वे म्हणजे मूल्य असे सर्वसाधारणपणे आपण म्हणू शकतो. मनुष्याला जीवनातील इष्ट ठरणारी मानवी व्यवहारातील आदर्श जीवनाच्या दृष्टीने नियमन करणारी जी जीवनमूल्ये असतात त्यांचे ज्ञान करून देणे म्हणजे मुल्यशिक्षण होय. "मूल्य" म्हणजे मानवाच्या जीवनातील आवडीनिवडीवर प्रभाव गाजवून त्याच्या वर्तनाचे नियंत्रण करणारे घटक होय.

संस्कार हे शिक्षणानेच करता येतात. म्हणून सुसंस्कार म्हणजेच मुल्यशिक्षण होय. किंवा सामाजिक हित साधण्यासाठी स्वतःच्या इच्छा, आंकाक्षा आणि प्रवृत्तीवर बंधने घालण्याची प्रेरणा ज्या शिक्षणाने मिळते ते मुल्यशिक्षण होय. मानवी संस्कृतीने मानवाला बहाल केलेलया सदगुणांचे संर्वधन आणि सक्रंमण करीत राहणे म्हणजेच मूल्याची जपवणूक करणे.

चारित्र्यसंवर्धन व व्यक्तिविकासाचे एक साधन म्हणून मूल्यशिक्षणाकडे बघितले जाते.

**मुल्यशिक्षणाची उद्दिष्टे :-**

मुल्यशिक्षणाची उद्दिष्टे तीन प्रकारात येतात.

१. वैयक्तिक उद्दिष्टे

२. सामाजिक उद्दिष्टे

३. राष्ट्रीय उद्दिष्टे

**१. वैयक्तिक उद्दिष्टे**

- विद्यार्थ्यांच्या अंगी स्वयंशिस्त व स्वावलंबन निर्माण करणे.
- व्यक्ती म्हणून निरोगी व निरामयस्वरूपाचे अंतर्बाहयजीवन जगता येणे.

- विज्ञाननिष्ठा, साहसीवृत्ती, अहिंसा, सत्य, समता, क्षमाशिलता, बंधुभाव, परस्परांबद्दल प्रेम, सहकार्याची भावना, कार्यनिष्ठा, न्याय सेवाभाव यासारखे मानवी गुण निर्माण करणे.

**२. सामाजिक उद्दिष्टे**

- सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे.
- समाजाचा एक घटक म्हणून बंधुता, सामाजिक बांधिलकी, सर्वधर्मसहिष्णुता, सौजन्यशीलता या मुल्यांची रूजवणूक करणे.

**३. राष्ट्रीय उद्दिष्टे**

- देशाच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन मिळावे.
- आत्मसन्मानजागृत होवून राष्ट्राध्दारासाठी प्रयत्नशील असावे.
- धर्म, जाती, लिंग, वंश, पंथ, भाषा यावर आधारित संकुचित दृष्टीकोन नष्ट करून वैचारिक जागृती करणे.

## मुल्यांचे वर्गिकरण

मुल्यांचे वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय अशा तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने १९८६च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानूसार अभ्यासक्रमात एकूण १० मूल्यांचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने

१) संवेदनशीलता
२) श्रमप्रतिष्ठा
३) नीटनेटकेपणा
४) राष्ट्रभक्ती
५) राष्ट्रीय एकात्मता

६) सर्वधर्मसहिष्णुता

७) वक्तशीरपणा

८) वैज्ञानिक दृष्टीकोन

९) स्त्री-पुरूष समानता

१०) सौजन्यशीलता

जीवनाच्या प्रवाहात स्वत:ला झोकून देऊन सतत धडपडत, स्वत:ला पूर्णपणे गुंतवून घेवून, पुर्ण जागरूकतेने, जिवंतपणे, जीवनाचाच एक भाग बनून जीवन जगणे म्हणजेच चांगले आयुष्य व्यतीत करणे. हेच खरे प्रगल्भ व्यक्तिमत्वाचे लक्षण होय.

**मुल्यशिक्षणाची गरज**

शिक्षणाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणजे तो चांगला माणूस बनावा यासाठी बौध्दिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांचा भावनिक व सामाजिक विकास झाला पाहिजे. म्हणून संस्कारसंपन्न व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शालेय स्तरावर मुल्यशिक्षणाची नितांत गरज आहे. मानवी विकासाच्या प्रगतीसाठी तंत्रविज्ञानाची प्रगती पुरेशी नसून व्यक्तिमत्वास नैतिकतेचे अधिष्ठान असावे लागते. समाज परिवर्तनासाठी मनुष्य हा सद्‌वर्तनी व सदाचारी बनला तरच मुल्याधिष्ठीत सामाजिक बदल घडून येवू शकतो.

मानवाच्या वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय विकासास उपयुक्त ठरणारी मानवाच्या वर्तवणूकीची तत्वे म्हणजे मुल्ये असून व्यक्तीचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक, राष्ट्रीयस्तरावर विविध भूमिका जबाबदारीने यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सहाय्यभूत होणारे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय. मूल्ये ही शाश्वत व चिरंतन टिकणारी असतात.

शालेय जीवनात मुलांवर होणाऱ्या संस्काराचा प्रभाव आयुष्यभर टिकणारा असतो. मुल्यशिक्षण म्हणजे योग्य संस्कार, सदाचाराचे वळण शिक्षणाचा उद्देश व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे.

स्वामी विवेकानंद म्हणतात, "विद्यार्थी स्वदेशाभिमानी उत्साही, बलसंपन्न असायला पाहिजे. त्याशिवाय राष्ट्राचा उध्दार होऊ शकणार नाही. त्यादृष्टीने शाश्वत मूल्यांचा शोध घेवून शिक्षकांनी ती मुल्ये विद्यार्थ्यांच्या ठिकाणी रूजविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. मुल्यशिक्षण हे सहज शिक्षण असून ते दैनंदिन अध्ययन-अध्यापन व विविध उपक्रमातून सहजपणे साध्य करता येते.

**मुल्यांची रूजवणूक करणे**

मुल्य रूजविण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करता येतो. जसे- वर्गशिक्षकाचे आचरण तसेच विविध प्रकारच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमातून मूल्यांची रूजवणूक करता येते. मुल्यशिक्षण हे सहज शिक्षण आहे. ती शिकायची बाब नसून ग्रहण करावयाची बाब आहे.

**माध्यमे :-** मूल्य रूजविण्यासाठी शालेय स्तरावर प्रामुख्याने सहली, अभ्यासपूरक कार्यक्रम, मुलाखती, परिसंवाद, मौन, चितंन, विविध शिबिरे, मेळावे, शालेय परिपाठ, प्रार्थना, प्रतिज्ञा, परिसंवाद, गीतमंच, थोर पुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी साजऱ्या करणे या सारख्या विविध माध्यमांचा उपयोग करता येतो.

**१. प्रार्थनेपूर्वी करावयाचे उपक्रम.**

उदा. :- स्वच्छता, उपस्थिती, फलकलेखन इ.

**२. प्रार्थनेच्या वेळी करावयाचे उपक्रम.**

उदा. :- सामुहिक राष्ट्रगीत, प्रार्थना, सुविचार, चितंन, मौन, ठळक दैनंदिन घडामोडीचे वाचन करणे.

३. प्रार्थनेनंतरचे उपक्रम.

उदा. :- दिनविशेष, वाढदिवस शुभचिंतन, अनुभव कथन, समुह गीत, कथाकथन इ.

**निष्कर्ष**

१. विद्यार्थ्यामधील सत्प्रवृत्ती जागृत होतात.
२. नीटनेटकेपण येऊन सौदंर्यदृष्टी विकसित होते.
३. वेळेचे महत्व लक्षात आल्याने वक्तशीरपणा निर्माण होतो.
४. राष्ट्रगीत, वंदेमात्‌रम यासारख्या देशभक्तीपर गीतांमधून राष्ट्रप्रेम निर्माण होते.
५. विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेलया अंधश्रध्देचा लोप होवून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होतो.
६. श्रमाधिष्ठित उत्पादक कार्यक्रमांच्या माध्यमातून सहकार्य, चिकाटी, काटकसर स्वावलंबन, निसर्गप्रेम यासारखी मूल्ये विकसीत होतात.

एकंदरीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी जे नैतिकतेचे अधिष्ठानआवश्यक असते ते मुल्यशिक्षणातून प्राप्त होऊ शकते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी मूल्यशिक्षण आवश्यक ठरते.

❖ ❖ ❖

# ४. स्वामी विवेकानंदांचे शैक्षणिक चिंतन

## प्रास्ताविक

संपूर्ण विश्वामध्ये ज्ञान, विद्या, शिक्षण हया संज्ञांच्या अनुषंगाने अनेक श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञ्यांनी विविध प्रकारचे विचार प्रगट केले आहेत. शिक्षण प्रणालीला नवी दिशा दिलेली आहे.

भारतामध्ये जे विचारवंत होऊ न गेले, त्यांच्यामध्ये स्वामी विवेकानंदांचे नाव मोठया सन्मानाने घेतले जाते. त्यांनी सामान्य माणसाला मोठे करण्याची अर्थात त्यांच्यातील अंतर्निहतेचे उन्नयन करण्याची आस धरली होती. भारताचे नाव विश्वामध्ये अग्रस्थानी असावे. अशी मनीषा बाळगली होती. त्यांनी देशासाठी जे कार्य आयुष्यभर केले, ते महनीय आहे, वंदनीय आहे.

## जीवन आणि कार्य (१८६४ - १९०२)

संन्यस्त जीवन पत्करुन सामान्य जनतेसाठी आयुष्य वेचणारे स्वामी विवेकानंद एक श्रेष्ठ व्यक्तिमत्व होते. त्यांचे नाव नरेंद्र १२ जानेवारी १८६३ ला कलकत्ता येथे नरेंद्राचा जन्म झाला. विश्वनाथ दत्त आणि भुवनेश्वरी हे नरेंद्रांचे मातापिता होते. वडील व्यवसायाने वकील होते.

इ.स. १८६८ मध्ये कलकत्ता येथे मेट्रोपॉलिटन स्कूलमध्ये प्राथमिक शिक्षणासाठी त्यांनी प्रवेश घेतला. त्यांचे उच्चशिक्षण प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये झाले. तेथे ते इ.स. १८८० पासून शिक्षण घेऊ लागले.

इ. स. १८८१ मध्ये श्री. रामकृष्ण परमहंसांची आणि नरेंद्राची भेट झाली. ईश्वर आहे वा नाही, हा नरेंद्राचा संभ्रम रामकृष्णांनी दूर केला आणि नरेंद्र त्यांच्यापासून प्रभावित झाले. त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांना दिव्य आत्मिक ज्ञान प्राप्त झाले. हयानंतर नरेंद्र हेच स्वामी

विवेकानंदांनी सांभाळली. रामकृष्ण मिशनची स्थापना केली. पर्यटनामधून भारतीय समाजाचे जवळून अवलोकन केले.

१८८७ साली संन्यास ग्रहण केला. १८९३ विश्वभ्रमणासाठी प्रयाण केले. ११सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत त्यांनी वेदान्त तत्वज्ञान आणि हिंदू धर्माचा परिचय करुन दिला. तेथून परतल्यानंतर कलकत्त्याजवळील बेलूर येथे मठ स्थापन केला. इ.स. १८९७ मध्ये रामकृष्ण सेवा संघ निर्माण केला.

स्वामी विवेकानंदाचे कार्य अद्वितीय आहे. त्यांनी भारताला विश्वामध्ये गौरवशिखरी नेऊन प्रतिष्ठित केले आहे.

स्वामी विवेकानंदांनी मनुष्यामध्ये परमेश्वराचे दर्शन घेतले आहे आणि मनुष्य हे सर्वोत्तुंग मंदीर आहे असे त्यांचे अभिमत आहे.

जीवनामध्ये कार्य करण्याचे स्वातंत्र्य पाहिजे. ज्ञानप्राप्तीचे आणि उपासना करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. सत्य आणि असत्यामधील फरक जाणून घेण्याचा विवेक मनुष्याला स्वातंत्र्यामुळे प्राप्त होऊ शकतो. परावलंबित्वापेक्षा स्वयंनिर्भरता श्रेष्ठ असते. ती स्वातंत्र्यामुळे निर्माण होते आणि जीवन उज्वल बनते.

स्वामी विवेकानंद वेदान्त तत्वज्ञानाचे भाष्यकार होते. प्राचीन भारतीय संस्कृतीचे उपासक होते. त्यांच्या शिक्षणाविषयक विचारांमध्ये त्यांचे तत्वज्ञान प्रतिबिंबित झालेले दिसते.

**शिक्षणाचा अर्थ (Meaning of Education)**

शिक्षण म्हणजे माणसातील पूर्णत्वाचा अविष्कार. "Education is the manifestation of the perfection in man. " - Swami Vivekananda. पूर्णत्व हे मनुष्याच्या अंतर्गत असते. ते सुप्त

स्वरुपात असते. त्याचा अविष्कार शिक्षणामुळे होतो. त्याची आध्यात्मिक शक्ती विकसित होते.

**ज्ञान माणसांत निहित आहे.**

स्वामी विवेकानंद म्हणतात "माणूस जे काही शिकतो" ते तो अनावृत (Unevils) करीत असतो. अनावृत्त करणे म्हणजे "अनंत ज्ञ ानाची खाणच असा जो स्वत:चा आत्मा त्यावरुन एक आवरण वा एक पडदा दूर सारुन टाकणे, जगाला जेवढे म्हणून ज्ञान आजतागायत उपलब्ध झाले आहे, ते सारेचे सारे मनातूनच आविर्भूत झालेले आहे. विश्वाचे अनंत ग्रंथालय तुमच्या मनातच विद्यमान आहे. स्वत:च्या मनाचे अध्ययन करावे यासाठी बाहय जगत हे एक उद्दीपक आहे, एक उपयुक्त संधी वा निमित्त आहे.

अध्ययनाचा विषय मात्र नेहमी व्यक्तीचे मनच असते. लौकिक असो वा परमार्थिक समस्त ज्ञान हे मानवी मनातच अस्तित्वात असते. अधिकांश व्यक्तीत ते प्रकट न होता झाकलेलेच पडून असते. तो पडदा ज्या वेळी हळूहळू थोडा थोडा दूर सारला जातो त्यावेळी "मी शिकत आहे" असे आपण म्हणतो. आवरण दूर सारण्याची ही क्रिया जसजशी प्रगत होत जाते तसतशी ज्ञानाची उन्नती होत जाते. ज्या माणसामधून हे आवरण क्रमश: निघून जात आहे तो इतरांच्या मानाने अधिक ज्ञानी, ज्यांच्यामध्ये ते आवरण अतिशय दाट तो अज्ञानी आणि ज्या माणसामधून ते अजिबात दूर झालेले असते तो सर्वज्ञ पुरुष होय.

म्हणूनच स्वामी विवेकानंद शिक्षणाची व्याख्या करतांना म्हणतात. शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण म्हणून या मार्गामधून अडथळे दूर करणे हेच आचार्यांचे एकमेव कर्तव्य होय.

खरे शिक्षण म्हणजे नुसते शब्द घोकणे नव्हे, तर सर्व मानसिक शक्तींचा विकास करणे हेच खरे शिक्षण होय.

शिक्षण कशाला म्हणावयाचे ? पुस्तके वाचण्याला? नाही, निरनिराळया प्रकारचे ज्ञान मिळविण्याला ? नाही त्यालाही नाही ? ज्या शिक्षणाद्वारे हया इच्छाशक्तीचा प्रवाह आणि अभिव्यक्ती ही आपल्य स्वतःच्या ताब्यात येतात आणि फलद्रूप होतात त्यालाच म्हणावे शिक्षण.

शिक्षण म्हणजे भाराभर माहितीने मन भरणे नव्हे. साधन निर्दोष करणे आणि स्वतःया मनावर पूर्ण प्रभुत्व मिळविणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

शिक्षणाचे मुख्य सार म्हणजे मनाची एकाग्रता.

आयुष्यभर आत्मसात न झालेला व मेंदूत अस्ताव्यस्तपणे कोंबलेला असा ज्ञानाचा भारा म्हणजे काही शिक्षण नव्हे , आपल्याला जीवन घडविणारे, "माणूस" निर्माण करणारे , चारित्र्य घडविणारे व चांगले विचार आत्मसात करविणारे शिक्षण हवे आहे.

चारित्र्य घडविणारे, मानसिक बल वाढविणारे, बुध्दी विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे असे शिक्षण स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत होते.

जे शिक्षण लाभल्याने सामान्य जनता जीवनसंग्रामाला लायक होऊ शकत नाही, जे शिक्षण चारित्र्यबल, परसेवातत्परता व सिंहासारखे साहस निर्माण करु शकत नाही त्याला काय शिक्षण म्हणायचे ? ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायांवर उभा राहू शकतो तेच खरे शिक्षण.

## शिक्षणाचे स्वरुप (Nature of Education)

स्वामी विवेकानंदाचे शिक्षणाचे स्वरुप मानव निर्माण करण्यास सहायक आहे किंबहुना ते मानवनिर्मितीचे शिक्षण आहे असे म्हणणे संयुक्तिक होइल. शिक्षणाचे स्वरुप खालील सिध्दांतावरुन अधिक स्पष्ट होईल.

## आत्मज्ञानाचे श्रेष्ठत्व (Importance of Man making Education)

मनुष्य हा पंचतत्वांच्या देहाने युक्त असतो. तो भौतिक जगताचा एक घटक आहे. पण तो अध्यात्मिक तत्वांशीही संबंधित आहे. त्यांचे आत्मज्ञान विकसित झाले तर तो परमतत्वाशी तादात्म्य पावू शकतो. आत्मज्ञान हेच श्रेष्ठ ज्ञान होय.

## मनुष्याचा मनुष्याशी संबंध (Relationship bewteen Man and man)

हया विश्वात प्रत्येक मानव दुस-या मानवाशी मानव्याच्या सूत्राने बांधलेला आहे. आध्यात्मिक क्षेत्रात हा संबंध अधिक दृढ होतो. आध्यात्मिक ज्ञान विकसित होणे महत्वाचे आहे.

## आत्मा हे ज्ञानाचे भांडार (Atma - the treasure of Knowledge)

ज्ञान ही बाहयप्रवृत्ती नाही. ते आत्म्यातूनच जगाला प्राप्त होत असते. प्रत्येक मनुष्याच्या अंत : करणात विश्वाचे अनंत ज्ञान साठवले आहे.

**शिक्षण : नैसर्गिक विकास (Education Natural Growth)**


शिक्षण बाहेरुन लादता येत नाही. ती सहज प्रक्रिया आहे. तो नैसर्गिक विकास आहे. शिक्षण निसर्गतः विकसित होण्यास अडथळे नकोत. स्वातंत्र्य मिळायला हवे.

**शिक्षण : चरित्र्यनिर्मिती (Education : Formation of Character)**

मनुष्याचे चारित्र्यसंवर्धन म्हणजेच शिक्षण, ज्या संस्कारामुळे मनुष्याची विकासात्मक जडणघडण होते तेच शिक्षण होय. अंत :करणातील मानवतेचा विकास हेच शिक्षणाचे स्वरुप होय.

**शिक्षण : मानवनिर्मिती (Education : Formation means Man Making)**

शिक्षणाचा प्रत्येक उपक्रम मनुष्याला घडविण्यास साहय करतो. शिक्षणाच्या साहयाने मनुष्य निर्माण होत असतो. त्याच्यातील मनुष्यत्व जागे होत असते.



## शिक्षणाची ध्येय (Aims of Education)

स्वामी विवेकानंदाच्या विचारातून शिक्षण हे मनुष्याच्या निर्मितीचे सर्वांत उत्तम साधन होय. त्यानुसार त्याची ध्येय निर्धारित झाली आहेत.

## आत्मविश्वास (Self Confidence)

मनुष्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा हे शिक्षणाचे ध्येय. आत्मविश्वासामुळेच मनुष्य प्रगतिपथावर खंबीरपणे पाऊल पुढे टाकू शकतो. भौतिक शरीरातील शाश्वत तत्वाचे ज्ञान झाले की आत्मविश्वास जागा होतो.

## आत्मसाक्षात्कार (Aims realization)

स्वत : च्या अंतरंगातील आत्मतत्वाची जाण झ ाल्यशिवाय मनुष्य स्व-स्वरुपाला ओळखू शकत नाही. मनावरील अज़ ानाचे आवरण दूर करण्यास आत्मविश्वास आणि आत्मज्ञानाची आवश्यकता आहे.

## आत्मविकास (Self developement)

मनुष्य स्वत :च स्वत :चा विकास करुन घेत असतो. कोणीही कोणाला शिकवित नसतो. झाडाचे रोप स्वत : हून वाढते तसे मूल स्वत : हून शिकत असते.

"You Cannot teach a child any more than you can grow a plant. The plant develops its own nature. The child also teaches itself. " - Swami Vivekanand.

**चारित्र्यनिर्मिती (Character Formation)**

शिक्षणाचे सर्वात महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे चारित्र्यनिर्मिती होय. चारित्र्य म्हणजे मनुष्याच्या प्रवृत्तीचे एकत्रित रुप होय. त्याच्या मनाचा एकूण कल चारित्र्य निर्माण करतो.

"The Character of any man is but the aggregated of his tendencis. The sum total the bent of his mind. " - Swami Vivekanand.

मनुष्यामध्ये सत्प्रवृत्ती निर्माण व्हाव्यात, सदभिरुची असाव्यात यासाठी शिक्षकांचे कार्य आवश्यक आहे.

**व्यक्तिमत्वाचा विकास (Developement of Personality)**

व्यक्तीच्या आचरणाचा समोरच्या व्यक्तीवर होणारा प्रभाव म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्वाचे स्वरुप होय. व्यक्तिमत्व गुणांमुळे आकर्षक बनले पाहिजे. शिक्षणाच्या संस्कारामुळे प्रभावी बनले पाहिजे.

**विश्वबंधुत्वाच्या भावनेचे उन्नयन (Promotion of Universal Brotherhood)**

"वसुधैव कुटुम्बकम्" हे तत्व प्रतिष्ठित व्हावे, हे तत्व शिक्षणातून संस्कारित केले जावे. प्रत्येक प्राण्यात एकच आत्मा वास करतो. तोच परमात्मा विश्वाला व्यापून आहे. अर्थात परमात्माचेच सारे अंशस्वरुप हयानुसार वैश्विक बंधुत्व विकसित व्हावे.

**अभ्यासक्रम (Curriculum)**

अभ्यासक्रम परिवर्तनशील असावा. विद्यार्थ्यांच्या आवश्यकतांनुसार त्यात बदल करता यावा.

१. उच्च नीतिमुल्यांनी युक्त असावा.

२. उदात्त आदर्शांनी परिपूर्ण असावा.

३.	अंत : करणाला सुसंस्कृततेची प्रेरणा देणारा असावा.


४.	भूत, वर्तमान व भविष्यकालीन ज्ञानाचे ग्रहण करण्यास तत्पर असावा.

५.	देशाला यशस्वी बनविण्यास आवश्यक विषयांचा समावेश अभ्यासक्रमात करावा.

मुलांना भाषा, साहित्य, कला, काव्य, विज्ञान इ. विषयाचे शिक्षण मिळावे. उपनिषदांच्या शिक्षणातून सृष्टीचे स्वरुप जाणता यावे. क्रीडा व शारीरिक परीक्षणातून शरीरसंपत्तीचा विकास व्हावा.

अशा सर्वसमावेशक अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन ह्यामधून होते.

## अध्यापन पध्दती (Method of Teaching)




अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रेमपूर्वक वातावरणात चालली पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतांच्या अविष्कारांस साहाय्य करावे.

## एकाग्रता (Concentration)

ज्ञानप्राप्तीचे एकमेव साधन एकाग्रता होय. "This is only one method by which to attain knowledge that with is called concentration" - Swami Vivekananda.

शिक्षणाचे संपूर्ण रहस्य मनाच्या एकाग्रतेत सामावले आहे.

"The very essence of education is concentration of mind."

**मार्गदर्शन (Guidance)**

शिक्षण फुलांची शेज नाही. तेथे अनेक समस्यांचे काटे असतात. विद्यार्थ्यांला ते स्वप्रयत्नाने दूर करायचे असतात, तेव्हा मार्गदर्शन अतिशय गरजेचे असते. शिक्षकाने योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

**चर्चा (Discussion)**

अनौपचारिक वातावरणात होणारी चर्चा विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करु शकते. ज्ञानार्जनास मदत करु शकते.

**ध्यान (Vontemplation)**

ध्यानधारणा शांत वातावरणात घडणारी मनाची उच्च अवस्था होय. त्यासाठी ज्ञानावर श्रध्दा असायला हवी. "श्रध्दावान लभते ज्ञानम्" हयानुसार श्रध्दावंतास ज्ञानप्राप्ती होते.

**अध्यापनाचे माध्यम (Medium of Instruction)**

**मातृभाषा -** मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे हयावर स्वामी विवेकानंदांनी भर दिला आहे.

**सामान्यभाषा -** मातृभाषेबरोबरच एक सामान्य भाषा विद्यार्थ्यांला शिकविली जावी. संपूर्ण देश एकत्वाच्या सूत्राने बांधला जाईल हयासाठी ही भाषा असायला हवी.

**संस्कृत भाषा-** अभ्यासक्रमामध्ये संस्कृतचे शिक्षण समाविष्ट करणे विवेकानंदांना आवश्यक वाटते. संस्कृत सर्व भाषांचा स्त्रोत आहे. संस्कृतच्या ज्ञानाशिवाय भारतीय संस्कृती समजणे शक्य नाही.

**शिक्षक कसा असावा.**

शिक्षकांविषयी विवेकानंदाचे विचार लक्षात घेतल्यास निदर्शनास येईल की, शिक्षक हा फक्त मार्ग दाखविणारा असतो.....मी शिकवितो ही भावना जर शिक्षकाच्या मनात जागृत होत असेल तर काम बिघडल्यशिवाय राहत नाही. मनुष्याच्या आतच......मग तो लहान मुलगा का असेना - सर्वज्ञान साठविलेले आहे. ते फक्त जागृत करावे लागते. येवढेच शिक्षकाचे कार्य. बुध्दीचा वापर कसा करावा ज्ञानेंद्रियांचा उत्तम उपयोग कसा करावा हे त्यांना स्वतंत्रपणे सुचले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप न करता योग्य मार्गदर्शन व त्यांना रस्ता मोकळा करुन देणे येवढेच शिक्षकांचे कार्य. कुणाचाही विश्वास नष्ट होईल असे वर्तन शिक्षकांचे नसावे. शिक्षकाने शक्य तेवढे चांगले देण्याचा प्रयत्न करावा.

जो स्वत : ला एका क्षणात जणू हजारो विभिन्न व्यक्तीत परावर्तीत करु शकतो. तोच खरा गुरु किंवा शिक्षक होय. आपल्या शिष्याच्या अवस्थेपर्यंत अगदी सहजगत्या उतरु शकून जो त्याच्या भूमिकेशी झटकन समरस होऊ शकतो तोच खरा आचार्य वा गुरु.

आपला आत्मा शिष्याच्या आत्म्यात संक्रमित करुन, त्याच्याशी एकरुप होऊन त्याच्याच डोळयांनी पाहतो, त्याच्याच कानांनी ऐकतो. त्याच्याच बुध्दीने समजू शकतो तोच खरा आचार्य.

शिक्षकाने आपल्या निषेधात्मक, मोडीतोडीच्या विध्वंसक पध्दतीच्या शिकविण्याने केवळ दुस-यांचा विश्वास अथवा भाव

भंगून टाकण्यातच दंग नसावे. आपल्या हातून कुणाचे हित घडेल असाच विचार करणारे शिक्षक असावेत.

**शिक्षक विद्यार्थी संबंध -**

गुरु सहवास अर्थात शिक्षकांशी विद्यार्थ्यांचे व्यक्तिगत संबंध असावे कारण शिक्षकाच्या व्यक्तिगत संपर्काशिवाय मिळालेले शिक्षण हे शिक्षण नव्हे. मुलांनी अगदी किशोरावस्थेपासून उज्ज्वल चारित्र्यसंपन्न व्यक्तीजवळ म्हणजे शिक्षकांजवळ राहिले पाहिजे. सर्वोच्च शिक्षकाचे जिवंत उदाहरण नेहमी विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर असले पाहिजे. शिक्षकांची कृती त्यांच्या उक्तीप्रमाणे असावी तरच श्रध्दा आणि विश्वास निर्माण होऊ शकेल, स्वामी विवेकानंद म्हणतात भारताचे भविष्य उज्ज्वल व्हावे म्हणून शिक्षक हा त्यागी असावा. शिक्षक - विद्यार्थी संबंध हे श्रध्दा, विश्वास यावर अवलंबून असतात.

## स्वामीजींच्या मते शिक्षण कसे असावे

**नकारात्मक नव्हे सकारात्मक शिक्षण हवे.**

शिक्षणातून बालकांपुढे विधायक व भावात्मक कल्पनाच ठेवावयास हव्यात. अभ्यासात्मक, अकारणात्मक (नको-नको, नाही-नाही)अशा स्वरुपाचे विचार व्यक्तीला दुबळे बनवितात. मुलांना हा गदधा, हा मूर्ख, हा ठोंब्या, असे न म्हणता मुलांना भले म्हटल्यास, त्यांना प्रोत्साहन दिल्यास, जीवन घडवतील, अशा विधायक, भावात्मक कल्पना देऊ शकल्यास पुढे ती खात्रीने चांगली निघतात. विद्यार्थ्यांच्या विचारात वा प्रयत्नांत ज्या चुका होत असताल त्याच फक्त दाखवित न बसता या सा-या

गोष्टी हळूहळू अधिक चांगल्या प्रकारे कशा करता येतील हेच सतत त्यांच्या निदर्शनास आणावयास हवे.

स्वामी विवेकानंद म्हणतात - विद्यार्थी दशेत प्रत्येकास ही जाणीव करुन द्यावी की, " तुझ्या-माझ्यासारखा माणूस काय वाटेल ते करु शकतो. अंत : करणात साहस बाळग, धीट हो उत्तिष्ठत, जागृत -ऊठ जागा हो" पण आज मुलांना जे शिक्षण मिळते ते संपूर्णपणे नास्तिभावात्मक व अकरणात्मक स्वरुपाचे असते, परिणामी निर्माण होते ते श्रध्दाहीनत्व - श्रध्देचा अभाव, ज्या श्रध्देचा बळाने हे जग चालते, त्या श्रद्धेचा लोप म्हणजे श्रध्दामहित्व व याचा परिणाम विनाश. याला तरणोपाय म्हणजे शिक्षणाचा फैलाव - विद्येचा प्रसार सकारात्मक शिक्षण म्हणजे विदेशीयांच्या नियंत्रणाशिवाय, स्वतंत्रबुध्दीने आपल्या प्राचीन ज्ञानशाखांचा अभ्यास, आत्मविद्येबरोबरच लौकिक विद्यांचा प्रसार.

## दुर्बलतावर्धक शिक्षण नको

बालकांमध्ये किंवा विद्यार्थ्यांमध्ये दुबळेपणा निर्माण करणा-या कोणत्याही उपदेशाला स्वामी विवेकानंदांनी सक्त विरोध केला. शारीरिक, मानसिक वा आध्यात्मिक शिक्षण घेत असलेल्या प्रत्येकास स्वामीजींचा एकच प्रश्न तुम्ही बलवान आहात ना, तुमच्यात बलाचा संचार होत आहे ना, कारण केवळ सत्यच बल प्रदान करु शकते. सत्यच जीवन देत असते. सत्याची कास धरल्याशिवाय कशानेही बलवान होऊ शकत नाही, जी कोणती मतप्रणाली माणसाचे मन दुर्बल करते, माणसाला खुळचट बनविते, माणसाला भल-भलत्या अशक्य गोष्टींच्या मागे धावायला शिकविते, चमत्कारांच्या नादी लावते असे दुबळे शिक्षण नको. दुबळ्या शिक्षणाने मने एवढी रोगट, विकृत होतात की, कालांतराने बालक, युवक हा सत्याच्या आकलनास आणि जीवनात ते आचरण्यास जवळ-

जवळ अपात्रच ठरतो. म्हणून दुर्बलतावर्धक शिक्षणाला स्वामी विवेकानंदांनी विरोध केला.

**जनसामान्यांच्या विपन्नावस्थेचे निर्मूलन करणारे शिक्षण हवे.**

विवेकानंद म्हणतात, युरोपातल्या अनेक शहरांमधून भ्रमण करतांना तेथील गरीब लोकांच्या सुखसोयी व शिक्षण यातून भारतातल्या गरिबांची दशा नजरेसमोर येते, प्रश्न निर्माण होतो असं का? कशाने हा फरक असावा ? तेव्हा एकच उत्तर समोर येते ते म्हणजे शिक्षण.

शिक्षणाने प्रत्येकाच्या ठायी आत्मविश्वास निर्माण होणे आवश्यक आहे. कारण आत्मविश्वासाने त्यांच्या मधील अंत : स्थिती अव्यक्त ब्रम्ह जागे होत असते. मात्र भारतातील जनसामान्यात ते हळूहळू लोप पावत आहे. जनसामान्यांच्या विपन्नावस्थेचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार, ज्ञानाची वाढ व माहितीचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे, तरच देशाची उन्नती होऊ शकेल. त्यासाठी सर्वसामान्य लोकांना आणि स्त्रियांना पुराण, इतिहास, कला, गृहकृत्ये, कौटुंबिक जीवनातील कर्तव्ये व आदर्श चारित्र्य घडविण्यात साहाय्यक असणारे नितिनियम आधुनिक विज्ञानाच्या मदतीने शिकावयास हवेत. शिक्षणातून विद्यार्थ्यांनी नीति धर्मपरायणता व नितीपरायणता अंगी बाणावयास हवी. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत" सर्वसाधारण जनतेला शिक्षण व त्यांची उन्नती" हाच एकमेव उपाय आहे. खरे राष्ट्र आज झोपडीत राहत आहे आणि झोपडीत वास करणाऱ्या आपल्या बांधवांना स्वत : च्या व्यक्तिमत्त्वाचा, मनुष्यत्वाचा विसर पडलेला आहे. शिक्षणाव्दारे त्यांच्या विस्मृत व्यक्तीमत्वाचे पुन्हा ज्ञान करुन दिले पाहिजे. प्रत्येकाने स्वत :चा उध्दार करुन घेण्याचा प्रयत्न करावा.

विवेकानंद म्हणतात, "गरीब लोक जर शिक्षणापर्यंत पोहोचू शकणार नाहीत अर्थात जर ते शाळेत जाऊ शकणार नाहीत तर शिक्षणाने त्यांच्या नांगराजवळ, त्यांच्या कारखान्याजवळ वा जरुर तेथे कोठेही पोहोचले पाहिजे. " तात्पर्य गरीब लोक जेथे जेथे काम करतात तेथे तेथे जाऊन त्यांना शिक्षण दिले पाहिजे.

शिक्षणाविषयी विवेकानंद म्हणतात, जरी निसर्गात विषमता असली तरी सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे, जर काहींना अधिक, काहींना कमी संधी मिळणार असेल तर दुबळयांना बलवानांपेक्षा अधिक संधी दिली गेली पाहिजे. निसर्गाने ज्याला सूक्ष्म बुध्दीची देणगी नाकारलेली आहे, अशाला अधिक मदत करण्याची आवश्यकता आहे

**बोलीभाषेतून शिक्षण** (बोलीभाषा की मातृभाषा)

विवेकानंदांचा बोलीभाषेतून शिक्षण देण्यावर, घेण्यावर भर होता. कारण व्यक्ती स्वाभाविकपणे ज्या भाषेतून स्वत : चे मनोभाव व्यक्त करीत असतो. ज्या भाषेतून राग, द्वेष, प्रेम वगैरे प्रगट करीत असते तिच्यापेक्षा अधिक योग्य भाषा शिक्षणासाठी असूच शकत नाही. भाव व्यक्त करु शकते अणि ती जशी जिकडे जशी फिरवावी तशी फिरते त्याप्रमाणात कोणतीही तयार कृत्रिम भाषा तशी होऊ शकत नाही.

विवेकानंद म्हणतात, भाषा कशी असावी, "जणू लखलखीत निखळ पोलादी पट्टा वाकवा, दुमडा, पिरगळा हवे ते करा फिरुन बोथटणार नाही. भाषा कृत्रिम, अस्वाभाविक नसावी कारण भाषा हाच खरा उन्नतीचा मुख्य उपाय आहे. " अन किती उन्नती झाली यांचा निदर्शक भाषा असते. भाषा हे आशयाचे व अर्थाचे वाहन आहे, "ज्यात भाव नाही, ज्यात आशय नाही, ज्यात प्राण नाही अशी भाषा कुचकामी"

राष्ट्राच्या जीवनात जसजसे बळ संचारेल तसतसी भाषा, कला, संगीत सारे आपोआप भावपूर्ण, आशयपूर्ण, प्राणपूर्ण होऊन जाईल. अशी भावपूर्णता, आशयपूर्णता ही केवळ बोलीभाषेतूनच व्यक्त होत असते. म्हणूनच शिक्षण हे बोली भाषेतून असावे असा विवेकानंदांचा आग्रह दिसून येतो.

## स्वामीजींची धर्मकेंद्रित शिक्षण योजना -

स्वामी विवेकानंदांच्या मते, "धर्म हा शिक्षणाचा गाभा आहे." कारण धर्म हा सगळ्यांचे गूढ आहे. आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार व प्रचार केला की, त्याचबरोबर आवश्यक असलेले लौकिक व अन्य प्रकारचे ज्ञान आपोआपच येईल. धर्मकेंद्रित शिक्षणाविषयी सांगतांना त्यांनी ॐ या प्रतीकाला सर्वोच्च स्थान दिले आहे. भारताचे राष्ट्रीय आदर्श, त्याग, सेवा, आत्मविश्वास, आत्मसम्मान हे आहेत. ज्याची घडण धर्माद्वारेच होत असते. ईश्वरावरील श्रध्देपेक्षाही स्वत : वरील श्रध्दा म्हणजे "आत्मश्रध्दा" फार महत्वाची असते. याची जाणीव आध्यात्मिकतेतूनच होते. कोणत्याही व्यक्तीला वा राष्ट्राला थोर होण्यासाठी खालील तीन गोष्टींची आवश्यकता असते.

१) चांगुलपणाच्या इभ्रतीवर प्रगाढ विश्वास
२) मत्सराचा व संशयखोरपणाचा अभाव.
३) जे चांगले बनण्याचा व चांगले कार्य करण्याचा प्रयत्न करीत आहे त्या सर्वांना साहाय्य करणे.

ही धर्मकेंद्रित शिक्षणप्रणाली मध्ये त्याच गोष्टी अभिप्रेत आहेत.

धर्मकेंद्रित शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे देश, काल व परिस्थिती यांच्या अनुरोधाने लोकांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे,

आध्यात्मिक ज्ञान पूर्णावस्थेला पोहाचविणे, नित्य सत्यत्व हाच मानवाच्या धर्म जीवनाचा आधार असावा.

धार्मिक शिक्षणाचा अर्थ "मानवाची समानता" सर्व माणसे समान आहेत. अध्यात्मिकता प्राप्त करुन घेण्याचा प्रत्येक पुरुषाला व स्त्रीला सारखाच हक्क आहे.

तात्पर्य : शरीर हे सतत बदलत असते म्हणून "स्व" हा एक आभास आहे. या "स्व" ला धरुन ठेवल्याने सर्व स्वार्थीपणा उत्पन्न होतो. "स्व" म्हणून काही नाही हे सत्य जर मानवाने जाणून घेतले तर मानव निश्चितच सुखी होईल व इतरांनाही सुखी करु शकेल, आणि हेच खरे अर्थाने धर्मशिक्षण ठरेल.

**वर्तमान शिक्षण पध्दतीतील दोष**

स्वामी विवेकानंद यांनी वर्तमान पध्दतीतील काही दोषांवर विशेषरुपाने प्रकाश टाकला आहे.त्यातील महत्त्वाचे दोष म्हणजे

- आजचे शिक्षण कारकून निर्माण करणारे एक उत्तम यंत्र आहे.
- शिक्षण मनुष्य निर्माण करणारे नसून ते सर्वस्वी अकरणात्मक, निषेधप्रधान आहे.
- प्रत्येक व्यक्ती स्वावलंबी व काटकसरी कशी होईल याकडे शिक्षणात दुर्लक्ष होते आहे.
- नैतिक आणि बौध्दिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण देण्यावर भर दिसून येत नाही.
- आत्मनिर्भरतेवर शिक्षणाने भर दिलेला दिसून येत नाही.

➢ आजचे शिक्षण म्हणजे गुरुजी पोपटांची केवळ शब्द घोकणे एवढेच.

वर्तमान शिक्षणपध्दतीतील दोष लक्षात घेता, आजची शिक्षणपध्दती ही ताबडतोब बंद केली पाहिजे. आजचा शिक्षक, 'मी' भोवती गुरफटलेला गेला आहे... "मी शिकवितो आहे. " ही भावना जर शिक्षकांच्या मनात जागृत राहील तर सगळेच काम बिघडेल. त्यामुळे शिक्षकाने आपले खरे कार्य लक्षात घ्यावे. मुलांच्या अंतर्मनातच सर्व ज्ञान साठविलेले असते. ते जागृत करण्याचेच काम शिक्षकांनी करावे. मुलांना शिक्षण द्यायचे म्हणजे येवढेच करायचे की, बुध्दी कशी वापरावी हे त्यांना दाखवायचे, ज्ञानेंद्रियांचा उपयोग कसा करावा हे त्यांना स्वतंत्रपणे सुचले पाहिजे.

तात्पर्य -स्वामीजींना भारतासाठी असे शिक्षण पाहिजे होते की, जे भारताचा आदर्शवाद व पाश्चिमात्यांची कार्यक्षमता यांची सांगड घालू शकेल. शिक्षणाने व्यक्तीचे जीवन प्रगल्भ होऊन चारित्र्याची बांधणी होईल. शिवाय विविध कौशल्ये संपादित करण्याचे सामर्थ्य प्रत्येक बालकात निर्माण होऊ शकेल. जेणेकरुन शिक्षण उत्पादक ही ठरु शकेल. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीला स्वत : च्या पायावर उभे राहण्यास समर्थ करणारे असावे. त्यासाठी शिक्षणातून मिळणारे ज्ञान अधिक अर्थपूर्ण असावे. तेव्हाच शिक्षणाद्वारे ख-याअर्थाने माणूस घडू शकेल.

❖ ❖ ❖

# ५. स्त्रीशिक्षणात समाज परिवर्तकांची भूमिका

शिक्षण मानवी विकासाचा आणि म्हणूनच राष्ट्राच्या विकासाचा केंद्रबिंदू होय. शिक्षणाने संस्कृतीवर्धन होवून राष्ट्र विकसित बनते आणि हे संस्कृतीसंवर्धन व संक्रमणाचे मुख्य स्त्रोत जर कोण असेल तर ती माता, आई होय. ही बाब दृष्टिक्षेपात घेऊनच स्वातंत्र्यपूर्व काळापासून विविध शिक्षणतज्ज्ञ, समाजसूधारक यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले. त्या दृष्टीने स्वभाषा, स्वलिपी, स्वदेशी वस्तू आणि स्वाभिमान अशा सर्वांगाने 'स्व' विकसीत करण्याच्या दृष्टीने स्त्रियांना प्रेरित करून स्त्रियांसाठी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे स्थापन करण्यात पुढाकार घेतलेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री शिक्षणाला एक नवा आयाम प्राप्त झाला. स्त्री शिक्षणाकडे पाहावयाच्या मूलगामी दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झपाटयाने घडून आला. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय संविधानाच्या स्वीकृत तत्वानुसार 'शिक्षणाची सर्वांना समान संधी' यावर भर देण्यात आला. भारतीय सुदृढ पायावर राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्याच्या उद्देशाने स्त्रीशिक्षणाचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. राष्ट्रीय पातळीवरील पायाभूत अभ्यासक्रम हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे वैशिष्ट्य आहे. या धोरणानूसार इतर अनेक कायदेशीर तरतूदींसोबतच 'स्त्री-पुरूष समानता' यांचा अभ्यास करण्यात यावा असेही सुचविण्यात आले.

भारतीय समाजसुधारकांचे विचार हे आधुनिक काळातील विचार होते. भारतीय शिक्षणाच्या दृष्टीने स्त्रीशिक्षणविषयक विचार अधिक महत्वाचे आहेत. भारतातील ज्या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाला चालना

दिलो व स्त्रीशिक्षणाच्या विकासाच्यादृष्टीने पुढाकार घेतला त्यां स्त्रीशिक्षणविषयक विचारांकडे डोळेझाक करून चालत नाही. स्त्रीशिक्षणाचा विचार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, महात्मा फुले, महात्मा गांधी, गोपाळकृष्ण गोखले, स्वामी विवेकानंद, सखाराम भागवत यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल.

**थोर समाजसूधारकांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार :**

**महर्षी धोंडो केशव कर्वे (१८५८-१९६२) :**

महर्षी धोंडो केशव कर्वे 'अण्णा' या नावाने सर्वांना परिचित होते. अण्णांच्या शिक्षणविषयक कार्याची उत्तुंगता अथांग आहे. आजही पुण्यातील कर्वे नगरात 'कर्वे स्त्रीशिक्षण संस्था विराजमान आहे. कर्वे यांचे संपूर्ण कार्य स्त्रियांच्या शिक्षणासाठी आहे. ते संपूर्ण आयुष्यभर केवळ स्त्रीकल्याणासाठी झटले. त्यांचे स्त्रीशिक्षणविषयक उदात्त विचार ऐकन, त्यांनी स्त्रियांसाठी निर्माण केलेलया संस्था बघून त्यातील थोरपणा समजतो. महर्षी कर्वे म्हणतात,-

"स्त्री दास्य विमोचन चळवळ आम्हाला मान्य नाही, उलट स्त्रीचे मुक्त क्षेत्र तिचे घर आहे. या कार्यक्षेत्रात पत्नी, माता म्हणून तिचा योग्य सन्मान झालाच पाहिजे. हे स्थान केवळ गृहकृत्याच्या उपयोगी किंवा साधन असे नसून कुटुंबात जी विश्वबंधुत्वाची भावना नांदायला हवी या भावनेने, उत्साहाने समरस होणारी यादृष्टीने स्त्रीचे स्थान अनन्यसाधारण आहे" आणि अशी स्त्री शिक्षणाने नक्कीच परिपूर्ण असायला हवी.

"स्त्रियांचे शिक्षण" हया देशात धर्म काय आहे, असे समजून करायला पाहिजे. "स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हे अत्यंत पवित्र असे देशकार्य-धर्मकार्य आहे. या कार्यासाठी केलेले विचार, उच्चार व आचार हीच परमेश्वराची प्रार्थना होय. हेच जन्माचे सार्थक अशी आपली वृत्ती

असली पाहीजे. शिक्षणाने स्त्रीयांची निर्भयता विकसीत व्हावी, दुष्ट परंपरांचा विरोध करण्याचे सामर्थ्य निर्माण व्हावे. परिस्थितीही अनुकूलन साधता यावे, स्त्रीला संतुलीत वृत्तीने कार्य करता यावे व स्त्री दिवसेंदिवस कृतिशील होत जावी या उद्देशाने स्त्रीशिक्षण महत्वाचे ठरते. जेणेकरून शिक्षणाने स्त्री स्वतंत्र व कर्तव्यदक्ष बनेल. अशा आकांक्षाचे अमर्याद क्षेत्र स्त्रियांना शिक्षणाने मोकळे होईल, शिक्षणाने स्त्री अधिक समर्थ बनेल. असे मत महर्षी कर्वे प्रखरतेने मांडतांना दिसून येतात. स्त्री-शिक्षणाचे महत्व स्वत: ओळखून देशाला स्वकर्तृत्वाने पटवून दिले. त्याचे स्त्रीशिक्षण विषयक कार्य महनीय, वंदनीय आहे. कर्वे यांनी ४ मार्च १९०७ महिला विद्यालयाची स्थापना, स्त्रीला स्वविकासासाठी शिक्षण देण्याच्या दृष्टिने भारतीय महिला विद्यापीठ स्थापन, २२ ऑक्टोबर १९२२ सातान्यात मुलींची शाळा, तर १९३६ मध्ये 'महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ" स्थापन केलेत. तसेच आईच्या नावाने श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठस्थापन करून स्त्रीशिक्षणाचा प्रचार व प्रसार केला.

**मातृसुखेन शिक्षणम्-विनोबा भावे (१८९५ ते १९८२) :**

विनोबा भावे म्हणतात, केवळ मुलांना शिकवून चालणार नाहीतर मुलींनादेखील शिकविले पाहिजे. उलट मुलींना मुलांपेक्षा जास्त शिकवावे कारण मुले मोठी झाली की, त्यांना कष्ट करायचे, राबायचे असते, धान्याचे पीक वाढवायचे असते पण स्त्रियांना मुले वाढवायची असतात. स्त्रिया मुलांना वाढविणार म्हणजे राष्ट्राला वाढविणार त्यामुळे ज्ञानाची किल्ली स्त्रियांजवळच पाहीजे. प्रत्येक घरात अगदी लहानपणापासून आईजवळ ज्ञ ान मिळविण्याची सोय झाली तर मात्र आणखी काय हवे? लहान मुलांना जे शिक्षण द्यायचे ते शाळेत नाही मिळणार ते आईच देऊ शकेल. म्हणून स्त्रियांच्या शिक्षणाची सोय गावातच केली पाहिजे. घरात आई काम करता

करता ते म्हणेल. जे वाचेल, ते मुलाला सहज ऐकून पाठ होईल. त्यासाठी आईला लेखन, वाचनाचे शिक्षण मिळणे आवश्यक ठरते. विनोबांच्या मते, मुलींना कसे शिक्षण मिळते याची परीक्षा त्यांना शाळेत काय शिकवितात यावरून मी करणार नाहीतर भक्ती, ज्ञान वगैरे गोष्टीत त्या किती प्राविण्य आहेत त्यावरून मी करणार. आजपर्यंत जेजे ज्ञानी संत ज्ञानेश्वर, तुकाराम, शंकराचार्य सर्व पुरूषच. एखादीच मुक्ताबाई, जनाबाई. आत्मज्ञानामध्ये स्त्रिया पुरूषांच्या पुढे जावू शकतात. विनोबा म्हणतात, जेव्हा शंकराचार्यासारख्या स्त्रिया निर्माण होतील तेव्हाच हिंदूस्थान पुढे जाईल. पुरूषांचे नियंत्रण स्त्रियांनीच केले पाहीजे आणि आपल्या हातात त्यांनी अंकुश ठेवला पाहिजे. तरच समाज सुधारेल. समाज परिवर्तनात स्त्रियांची फार चांगली मदत होईल.

**विनोबाजींच्या मते, जेवढे काही गुण आहेत ते सर्व स्त्रीलींगी आहेत,**

**व्यक्ती, मुक्ती,**

**शक्ती, निती सर्व स्त्रीलींगी शब्द. जे प्रत्क्ष गीतेतसुध्दा सांगितले आहे-**

**गीतेतील श्लोक**

**वाणी श्री कीर्ति नारीत। क्षमा मेधा धृती स्मृती**

ह्या सर्व स्त्रियां आहेत. पुरूष पराक्रम करतात पण तयावर भक्तीचा अंकुश पाहीजे.

स्त्रियांना जर शिक्षक बनविले तर त्या शाळेत भक्तीचे वातावरण निर्माण करतील. म्हणूनच लहानपणीचे शिक्षण स्त्रियांच्या हातात असले पाहिजे.

विनोबाजी म्हणतात, छडी मारल्याने विद्या येत नसून ती प्रेमाने समजावून सांगण्यात येते. त्यासाठी मातृमुखातून ज्ञान मिळाले पाहिजे. एकंदरीत आचार्य विनोबा भावे यानी स्त्री शिक्षणावर विशेष भर दिलेला

दिसून येतो. मुलांच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण आई करते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. बालपणी बालकावर होणारे संस्कार त्याला प्रतिष्ठा देतात, समाजात स्थान मिळवून देतात. मातृदेवोभव। या उक्तीनुसार बालकाच्या जीवनात मातेचे स्थान उच्चस्थानी असते. हे विनोबाजींनी स्पष्ट केले.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (१९०९-१९६८) :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना स्त्रियांविषयी विशेष आदर होता. त्यांच्या मते, संसारामध्ये स्त्री-पुरूष दोघांचेही कार्य महत्वाचे असते.

**स्त्री पुरूष ही दोन चाके। परस्पर पोषक होता निके गाव नांदेल**
**स्वर्गीय सुखे। तुकडया म्हणे।।**

स्त्री समानतेचा पुरस्कार तुकडोजींनी केला होता.

**जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उध्दारी।।**
**ऐसी वर्णिली मातोची थोरवी। शेकडो गुरूहूनही।।**

मातृदेवा भवः असे वेदांत वचन आहे. समाजाती स्त्रियांचा मान मोठा आहे. अर्थातच स्त्रियांच्या शिक्षणाचाही विचार व्हायला पाहिजे.

**"महिलांचे उत्तम शिक्षण। शिक्षणात असावे जीवनाचे स्थान।।**
**जीवनात असावे स्वारस्यपूर्ण। शांती, दयादि भावनांचे।।"**

स्त्रियांना उच्चतम प्रतीचे शिक्षण मिळावे, ते जीवनाशी निगडित असावे त्याचप्रमाणे मूल्यांचाही परिपोष त्यातून व्हावा हे तुकडोजी महाराजांना अभिप्रेत होते. ते म्हणतात,

**समाजी जो पुरूषांशी आदर। तैसाच महिलांशी असावा व्यवहार।**
**किंबहूना अधिक त्यांचा विचार। झाला पाहीजे समाजी।।**

तुकडोजी महाराज म्हणतात, मुलींना साक्षर तर नक्कीच करावे पण स्त्रियां जीवनात आपला विकास करू शकतील अशी दिशा शिक्षणामुळे मिळायला हवी. स्त्रियांच्याअंतर्गत गुणांना शिक्षणातून वाव मिळावा अशी संधी उपलब्ध करून द्यावी.

**"महिलांच्या आंतरिक गुणांचा विकास। करिल ऐसे शिक्षण खास।**
**जरि दिले जाईल त्यास। तरीच भावी जग पालटे।।**

स्त्रियांची उन्नती साधण्याकरिता प्रयत्न झाले पाहिजेत. स्त्री-पुरूष ही संसाररथाची दोन चाकं, आहेत. ती सारख्याच प्रमाणात सक्षम व्हावयाची असेल तर दोघांना सारख्याच प्रमाणात विकसित करणे आवश्यक आहे.

**'म्हणोनी रथाची दोन्ही चाके।**
**मजबूत करावी कातोनी सारखे।**
**तरीच संसारगाडी सुखे।**
**सुखावेल ग्रामजीवाची।।'**

१९, २०व्या शतकापासून विविध समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणासाठी महत्त्वाचे योगदान दिलेले दिसून येते. याचीच फलश्रुती म्हणजे या २१व्या शतकात जगभरातील स्त्रियां जवळपास सर्वच क्षेत्रात भरीव कामगिरी करतांना दिसून येतात. आतापर्यंत स्त्रियांसाठी निषिध्द मानल्या गेलेल्या क्षेत्रातही यशाचे नवनवीन मापदंड स्त्रिया प्रस्थापित करीत आहेत. आज राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, राज्य अशा अनेक स्तरांवर स्त्रिया कर्तृत्वाची बाजी मारतांना दिसून येत आहे. मात्र प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांना मिळत असलेले हे यश सहजसाध्य बाब नाही. यासाठी अनेकांना संघर्ष करावा लागला. त्यांचा हा संघर्ष निश्चितच इतरांना प्रेरणा देणारा व दिशादिग्दर्शन करणारा ठरू शकतो. मात्र त्यासाठी समाजरचेनेचा केंद्रबिंदू

हा स्त्री असणे गरजेचे आहे. असे झाल्यास एक यशस्वी लोकशाही राष्ट्र अशी भारताची प्रतिमा जागतिक मंचावर निर्माण होवू शकेल.

स्त्री केंद्रात, समाजरचना या संदर्भात डॉ. रघुनाथ माशेलकरांनी व्यक्त केलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. त्यादृष्टीने त्यांनी स्त्रीकेंद्रीत समाजरचनेची मांडणी केली आहे.

१) **स्त्रीला कुटुंबात सन्मानाचे स्थान :** कुटुंब हा समाजरचनेचा पाया असतो. ते समाजाचे एक छोटे प्रतिबिंब असते. स्त्रीला समाजात सन्मानाचे स्थान द्यावयाचे असेल तर प्रथम तिला तिच्या कुटुंबात मान मिळायला हवा. बहुतांश देशातील समाजात स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान दिले जातेअसे १९९३ च्या मानव विकास अहवालात संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे या असे मत डॉ. माशेलकरांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. कुटुंबाकडून तिला तिच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते. परंतु तिच्या हक्काची जाणीव करून दिली जात नाही. तसे झाले तर ती अधिक आत्मविश्वासपूर्वक वागेल. स्वतःच्या क्षमतांचे पूर्ण शक्तीनिशी प्रकटन करू शकेल. आपल्या स्वप्नातील नव्या भारताच्या बांधणीतील ती एक सजग, शक्तिमान भागीदर बनू शकेल.

२) **स्त्री-विवाहविषयक समस्या :** सशक्त समाजाची रचना करण्यासाठी परंपरेने चालत आलेल्या काही अनिष्ट प्रथा मोडीत काढल्या गेल्या पाहीजेत. समाजातील काही नियम पुन्हा एकदा तपासून बघितले पाहिजेत. उदा.-स्त्रीचा विवाह, हा समाजातील परंपरेतील एक महत्वाचा घटक आहे. यामध्ये स्त्रीच्या मनाविरूध्द होणारे लग्न, लहान वयात स्त्रीचा विवाह करणे, आंतरजातीय

विवाहावर बंधने आणणे. तिच्या इच्छेविरूध्द तिला सासरी राहण्यास भाग पाडणे. पुनर्विवाहास विरोध करणे, विधवा विवाहास विरोध करणे यासारख्या अनिष्ट परंपरा मोडीत काढल्या पाहिजेत. तरच तो समाज विकासाच्या दिशेनी पाऊल टाकणारा समाज म्हणून ओळखला जाईल.

३) **स्त्रीविषयक कायदे :** स्त्रीकेंद्रीत समाजरचनेच्या निर्मितीसाठी जुन्या अयोग्य परंपरा मोडीत काढण्यास कायदे हे सहाय्यकारी ठरतात. एखादी गोष्ट कायद्याने अमान्य केली की कालांतराने का होईना, हळूहळू त्या गोष्टी नाकारण्याकडे समाजाचा कल होऊ लागतो. बुध्दिवादी लोक कायद्याच्या बाजूने वर्तणूक करण्याकडे आपली पसंती दर्शवितात. त्यामुळे स्त्रियांना हक्क देणारे कायदे करणे आवश्यक आहे. कायद्याची अंमलबजावणी झाल्याशिवाय कोणताही कायदा करून उपयोग नाही.

४) **मनोवृतीत बदल :** आजही स्त्रियांना कायद्याचा म्हणावा तितका फायदा होत नाही. परंतु जेव्हा आपल्या पितृसत्ताक समाजरचनेच्या मनोवृत्तीत आमूलाग्र बदल होईल तेव्हाच ही गोष्ट शक्य आहे.

५) **स्त्रियांसाठी उच्च शिक्षण :** नव्या तंत्रज्ञानविषयक विकासाने स्त्री-जीवनाचा पोत पालटण्यास सुरूवात झाली आहे. स्त्रियांना उच्च शिक्षणाच्या वाटा खुल्या झाल्या आहेत. उद्योग व्यवसायासंदर्भातही हेच म्हणता येईल.

६) **घरबसल्या उद्योगाची सोय :** नव्या संगणकीय तंत्रज्ञानामुळे स्त्रीला घरच्या घरी, स्वतःला सोईचे असेल त्या वेळेत काम

करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता घर आणि कार्यालय या दोन्ही ध्रुवांत होणारी तिची ओढाताण थांबू शकेल.

७) **निर्णय स्वांतंत्र्य :** विज्ञानाने स्त्रीला इनव्हिट्रोफर्टिलायझेशनसारख्या सुविधा दिल्या आहेत. त्यामुळे स्त्री स्वतंत्र झाली आहे. स्वतःचे आयुष्य कसे जगावे याचे निर्णय घेतांना अनेक पर्याय तिच्यासमोर आहेत. परंतु तंत्रज्ञानामुळे स्त्रीजीवनाला इजाही होऊ शकते.

८) **आर्थिक स्वातंत्र्य :** स्त्रीची उद्यमशीलता, तिची कौशल्ये वाढवणे, तिला आर्थिक स्वातंत्र्य देणे यांच्या माध्यमातून तिला कुटुंब व समाजात मानाचे स्थान मिळेल.

❖ ❖ ❖

## ६. "सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक भूमिका."

**प्रस्तावना :-**

असामान्य बौध्दधर्माचा प्रभाव काहीकाळ भारतात नष्टच झाला होता. पण विसाव्या शतकात बौध्दधर्माचे पुनरूज्जीवन झाले. डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यता निराकरणाच्या संदर्भात एक युगपुरूष ठरले. १४ एप्रिल १८९१ साली हिंदू धर्मात अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या (महार) जातीत इंदूरजवळील महू येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळचे आडनाव 'सपकाळ' होते. त्यांचे वडील लष्करात सुभेदार होते. त्याकाळात अस्पृश्य वर्गाला अत्यंत अपमानाने बहिष्कृत म्हणून वागविले जात असल्याने त्यांना शिकण्यासाठी फारच हालअपेष्टा व कष्ट सहन करावे लागले. अस्पृश्यांना मिळणारे मानभंग, अपमान, हाल, तिरस्कार त्यांना स्वतःला खूपच अनुभवायला मिळाले. पण अडचणींना टक्कर देवून त्यांनी उच्च शिक्षणही घेतले. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण महाराष्ट्रातील सातारा शहरात झाले. मॅट्रिक झाल्यानंतर ते मुंबईस एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिकण्यास गेले. तेथून बी.ए. ही पदवी संपादन करून बडोदा संस्थानात त्यांनी नोकरी पत्करली. त्यांना बडोदा सरकारने तेवढयात परदेशातील उच्च शिक्षणासाठीची एक शिष्यवृत्ती मंजूर केली. ती घेऊन ते अमेरिकेत गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र (एम.ए.) ही पदवी संपादन केली. आणि पी.एच.डी ही सर्वोच्च पदवी संपादन केली. त्यानंतर पुन्हा इंग्लंडला जावून त्यांनी अर्थशास्त्रात लंडन विद्यापीठाच्या एम्.एस्सी. आणि डी.एस्सी. आणि बार ॲट लॉ या पदव्या संपादन केल्या. नंतर भारतात वकील, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून व्यवसायाला

सुरूवात केली. पण त्याचबरोबर अस्पृश्यताविरोधी त्यांना जी तळमळ लागून राहिली होती. तिच्यामुळे अस्पृश्य समाजावरील अन्याय दूर करण्यासाठी जिवाचे रान करून अस्पृश्य समाजाला जागृत व संघटित केले.

आंबेडकर हे एक उच्च दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, इतिहास व कायदा या विषयात प्रावीण्य मिळवून त्यांनी पंडित असा जागतिक लौकिक मिळविला. १९२३ साली लंडन विद्यापीठाने त्यांना त्यांच्या या अर्थशास्त्रातील प्रबंधाबद्दल पी.एच.डी पदवी दिली.

१९१६ साली त्यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात भारताच्या राष्ट्रीय नफ्यातील वाटयाविषयी ऐतिहासिक दृष्टीने चिकित्सक अभ्यास केला. भारतात परत आल्यानंतरमुंबईत बॅरिष्टर म्हणून व्यवसाय सुरू केला. त्यातही त्यांना अस्पृश्यतेचा शिक्का भोवला. त्याचवेळी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या नावाची संघटना स्थापन केली. अस्पृश्यांना न्याय मिळविण्यासाठी अशी पहिलीच सार्वजनिक संस्था उभी राहिली.

चवदार तळयात पाणी घेण्यास मोकळीक मिळावी म्हणून त्यांनी मोर्चा काढून चळवळ केली. पुढे नाशिक येथील राममंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी १९३० साली सत्याग्रह केला. अभ्यासपूर्वक रीतीने अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी व अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक व राजकीय आघाडयांवर कामे सुरू केली. मुंबईस सिडनेहॅम कॉलेजात त्यांनी १९१८ ते १९२१ काळात प्राध्यापक म्हणूनही कार्य केले. १९२८ साली ते मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजात प्राध्यापक झाले. १९३० साली त्यांनी 'मूकनायक' व त्यानंतर 'जनता' ही साप्ताहिके सुरू केली. १९४६ साली त्यांनी मुंबईत सिध्दार्थ कॉलेज सुरू केले. लंडन येथील

गोलमेज परिषदेस महात्मा गांधी व बॅ. जीना यांच्याबरोबर उपस्थित राहिले. आणि तेथे त्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली.

डॉ. आंबेडकरांनी जगातील अनेक राष्ट्रांच्या राज्यघटनांचा बारकाईने परिश्रमपूर्वक अभ्यास करून भारताच्या राज्यघटनेला आदर्श रूप देण्याचा प्रयत्न केला. १९३५ साली त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा केली १९५६ साली मृत्यूपूर्वी थोडे दिवसआधी बौध्द धर्माची दीक्षा घेतली. आंबेडकर हे एक चारित्र्यसंपन्न, विव्दान, बुध्दिमान व लढाऊ वृत्तीचे नेते बनले. त्यांनी अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी अनेक आघाड्यांवर निर्भयपणे प्रयत्न सुरू केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वभाव वैशिष्टे :-**

डॉ. आंबेडकरांची वैज्ञानिक दृष्टी होती. आपले विचार ते केवळ भावना, विकार व पूर्वगह यांवर आधारून ठेवणारे नव्हते. बुध्दिनिष्ठ व तटस्थ रीतीने ते कोणत्याही घटनेकडे व प्रश्नाकडे पाहून तिचे तर्कशुध्द व पुराव्यावर आधारून विश्लेषण करीत असत, आणि मग पुरावा सबळ मिळाला तर त्यावरून अपरिहार्यपणे निष्पन्न होणारे निष्कर्ष काढण्यास कचरत नसत. पूर्ण विचार व विवेक यांवर आधारलेले निष्कर्ष जाहीरपणे मांडण्यासाठी लागणारी बौध्दिक निर्भीडता, धैर्य, सचोटी व प्रामाणिकपणा त्यांच्यापाशी होता. म्हणून त्यांच्या मांडणीत एक प्रकारचा सडेतोडपणा, स्पष्टता, रोखठोकपणा आणि परखडता आढळते. आपले म्हणणे बरोबर असल्याची, त्याला पुरेसा पुरावा व आधार असल्याची त्यांना बौध्दिक खात्री पटल्यानंतर मात्र ते आपले म्हणणे व निष्कर्ष लोकांना आवडतील की नाहीत, रूचतील की नाहीत, त्यामुळे आपल्यावर लोकांचा राग ओढवेल की काय, , याची पर्वा न बाळगता व मुलाहिजा न ठेवता स्पष्ट व गरज वाटल्यास परखड शब्दांत व्यक्त करीत असत.

उद्दिष्टे :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट करणे.

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

(३) सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा चिकित्सक अभ्यास करणे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार :-**

* इतिहासाला विसरा असे लोकांना सांगणे चूक आहे, जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकणार नाहीत. * दु:खाचे मूळ बळाच्या उपयोगात नसून त्याचा दुरूपयोग करण्यात आहे. * सचोटी आणि बुध्दिमत्ता यांचा संगम झाल्याशिवाय कोणत्याही माणसाला मोठे होता येणार नाही. *जीवनासाठी वाचन आवश्यक आहे. * वाचन थांबले तर जगून काय उपयोग? * जबाबदार व्यक्तीला चुकीची दुरूस्ती करता आली पाहिजे. पुर्नविचार करण्याचे व त्यानुसार मतांतर करण्याचे धाडसही व्यक्तीच्या अंगी असावे लागते. * विचार आपोआप मूळ धरतात. हा विचारच चुकीचा आहे, विचारालाही प्रचाराची आवश्यकता असते. त्याशिवाय दोघेही लय पावतील. * प्रत्येक मनुष्यास जीवनाचे तत्त्वज्ञान असावयास हवे, कारण तत्त्वज्ञान म्हणजे दुसरे काही नसून आपले जीवन मोजण्याचे ती मापकाठीच होय. * मनुष्याला शरीराबरोबर मनही आहे. म्हणून दोन्हींचाही विचार करावयास हवा. मन सुसंस्कृत झाले पाहिजे. मन सुसंस्कृत बनविले पाहिजे. * ज्यांचे मन स्वतंत्र नाही तो मोकळा असून गुलाम आहे. * मनाचे स्वातंत्र्य हे जिवंतपणाचे लक्षण आहे.

मानसिक स्वातंत्र्य कोणाला आहे असे म्हणता येईल? जो आपली बुध्दी जागृत ठेवून आपले हक्क व कर्तव्य यांची जाणीव करून घेतो, जो

परिस्थितीचा दास झालेला नाही, जो रूढींच्या स्वाधीन झालेला नाही, जो पराधीन झालेला नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवत नाही. आपल्या हक्कांवर गदा आली असता जो त्यांच्या रक्षणासाठी दक्ष असतो, जो आपल्या बुध्दीनुसार आपल्या आयुष्याचे ध्येय व कार्य निश्चित करतो. म्हणून जो सर्वस्वी स्वाधीन आहे तोच माणूस स्वतंत्र आहे. * कोणत्याही कार्यात यशप्राप्ती होईल किंवा नाही हे जितके साधनसामुग्रीच्या प्रमाणावर अवलंबून असते, तितकेच ते कार्याच्या नैतिक स्वरूपावरही अवलंबून असते. * कार्याच्या मुळाशी जर सत्य असेल तर त्यात यश प्राप्त होण्यास चिंता करण्याचे विशेष कारण नाही. * सत्याग्रहाच्या ठायी आत्मबल पाहिजे. आत्मबल हे आपण करतो ती गोष्ट योग्य आहे किंवा नाही यावर अवलंबून असते. * ज्या कार्यामुळे लोकसंग्रह होतो ते कार्य सत्कार्य, व त्यासाठी केलेला आग्रह म्हणजे सत्याग्रह. * राजकीय सुधारणांना मी सामाजिक सुधारणा मूलभूत मानतो. * ज्यावेळी माणसांची, आपण करत असलेल्या श्रमाचा, आपल्याला न्याय्य मोबदला मिळतो अशी समजूत असते त्यावेळी मानवी जीवन हे उत्साही, समृध्द आणि प्रेरणादायी असते. * मानसिक स्वतंत्र/स्वातंत्र्य हे खरे स्वातंत्र्य आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही, तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्य हा जिवंतपणाची साक्ष आहे. जो आपली बुध्दी जागृत ठेवून आपले हक्क काय, अधिकार काय व आपले कर्तव्य काय याची जाणीव करून घेतो, त्याला मी स्वतंत्र म्हणतो. जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कहयात आणण्यात सिध्द असतो तो माणूस स्वतंत्र आहे असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुसऱ्याच्या शिकवणुकीने वागत नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवत नाही, जो हक्कांचा अपहार केला असता त्यांच्या

रक्षणार्थ दक्ष बनतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याच्या हातचे बाहुले न बनण्याइतकी बुध्दी, स्वाभिमान ज्याला आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे.

* प्रगतीचे मापन करणारी व इतिहास दर्शविणारी दोन प्रभावी अस्त्रे आहेत. एक लेखणी व दुसरी वाणी. ही दोन्ही अस्त्रे व्यासंगी वृत्तीने कमाविता आली पाहिजेत. * जीवनात साहित्य हेच तुमचे कर्तव्य, विद्वत्ता व बुध्दिमत्ता सिध्द करणारे एकमेव साधन आहे. ते प्रगतीकडे नेणारे हत्यार आहे. * संगीत आणि हास्य प्रत्येक माणसाला आवडलं पाहिजे. * सर्व बुध्दींमध्ये श्रेष्ठ म्हणजे प्रज्ञाबुध्दी. ती प्राप्त करण्यासाठी तुम्ही साधना केली पाहिजे. * जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, व दुसऱ्याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुध्दी, स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे. * तुमचा उध्दार करण्यास कोणी येणार नाही, तुम्ही मनात आणाल तर तुमचा उध्दार करण्यास समर्थ व्हाल. * बुध्दिमत्ता हा गुण नसून साधन आहे. व तिचा उपयोग कसा करावा हे बुध्दिमान व्यक्तींच्या अंतीम हेतूवर अवलंबून आहे. * मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही, त्याला सुसंस्कृतीची गरज आहे. आपल्याला कितीही त्रास झाला तरी आपण केलेली प्रतिज्ञा आपण कधीच मोडता कामा नये. * आपल्याला ज्या मार्गाने जावयाचे आहे, तो मार्ग चिरस्थायी असावा. * जो मार्ग आपल्याला इप्सित ध्येयाप्रत सुरक्षित पोचवितो, तो जवळच्या मार्गापेक्षा निश्चित श्रेयस्कर असतो. * व्यक्तीला व्यक्तीस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य आणि लेखनस्वातंत्र्य हवेच; त्याशिवाय त्याला व्यवसाय स्वातंत्र हवे, स्वतःचा विकास करण्याचे स्वातंत्र्य हवे. * सचोटी आणि बुध्दिमत्ता या दोन्ही गुणांच्या मिलाफाशिवाय कोणतीही व्यक्ती थोर ठरू शकत नाही. * माणसाला माणूस म्हणून ओळखा नि जगू द्या. * आपल्याला जर प्रगती

माणसाचे असेल तर इतिहासाची पुनरावृत्ती होऊ देण्यात काही अर्थ नाही त्यापासून बोध घेऊन नवा इतिहास घडविण्याची आपण उमेद बाळगली पाहिजे. आणि ही उमेद व्यक्तीत शिक्षणातून निर्माण होते. * मर्दुमकी गाजवून दोन दिवस जगणे हे दुसऱ्याचे गुलाम होऊन शंभर वर्ष जगण्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठपणाचे आहे. * सर्व माणसे जन्मत: समान दर्जाची आहेत व ती मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतील. * मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही. त्याला जिवंत मन आहे. त्या मनाला विचाराचे खाद्य पाहिजे. * सार्वजनिक सदसद्विवेकबुद्धी म्हणजे सर्व अन्यायाविरुद्ध बंड करण्याची बुद्धी होय. * आपल्यातील एखादा माणूस कितीही मोठा असला तरी त्यावर पूर्णपणे विसंबून राहता कामा नये. * हिंसक, अतिरेकी व अराजकता पसरवणारे मार्ग वर्ज्य आहेत. * एखादा मनुष्य कितीही मोठा असला तरीही त्याच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पू नये. * महापुरुष आपली मते आपल्या शिष्यांवर कधीच लादत नाही- उलट तो त्यांना प्रेरणा देतो. त्यांना जागृत करतो. त्यांच्यात ऊर्जा निर्माण करतो आणि त्यांच्यामध्ये जे सुप्त गुण आहेत त्यांच्या विकासाला तो संधी उपलब्ध करून देतो.

* प्रत्येक मनुष्याचे अंतीम ध्येय काय आहे? आपल्या अंगी वसत असलेल्या गुणांचा परिपोष होवून त्यास गोड फळे यावीत हेच ध्येय आहे. * माणसाला मुक्तपणे विचार करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. विचार करण्याचे स्वातंत्र्य नाकारले तर कोणतीही संस्कृती डबक्यासारखी होते, ती माणूस असण्याची आपली योग्यता गमावून बसते. * प्रत्येक माणसाला विचार करता आला पाहिजे. एवढेच नव्हे तर प्रत्येकाजवळ त्याचे जीवनविषयक स्वच्छ तत्त्वज्ञान पाहिजे. ** कोणत्याही प्रकारची गरिबी असू नये. आर्थिक गरिबी असू नये आणि मनाचीही असू नये. * भक्तीच्या

मुलाम्याने माणुसकीला किंमत येते असे नाही. तिची किंमत स्वयंसिद्ध आहे.

**शैक्षणिक तत्वज्ञान :-**

६५ वर्षाच्या जीवनात प्रवासात डॉ. आंबेडकर यांना देश-विदेशांत विविधस्पर्शी अनुभव आलेले होते. त्यांचे कार्यही विविधांगी असे बनले होते. जीवनाच्या या प्रदीर्घ अनुभवातून त्यांचा निश्चित असा जीवनविषयक दृष्टिकोन बनला होता. डॉ. बाबासाहेब हे प्रथम भारतीय नंतर भारतीय त्यांनंतरही भारतीय व शतप्रतिशत भारतीय होते. स्वातंत्र्याचा खराखुरा लाभ भारतीय सर्वसामान्य जनतेला कसा मिळू शकेल व लोकशाही जीवननिष्ठेलाप्रत्यक्ष जीवनात व व्यवहारात कसे आणता येईल याकरिता त्यांनी आयुष्याचा कण कण वेचला होता. आपल्या विचारांशी अत्यंत प्रामाणिक राहून व्यापक राष्ट्रहिताकरिता, सामान्यांच्या व दलितांच्या हिताकरिता जीवनाचा मार्ग त्यांनी स्वीकारला होता व हाच त्यांचा जीवनविषयक व्यापक दृष्टिकोन होता. त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनातूनच शैक्षणिक तत्वज्ञान प्रतिबिंबीत झालेले दिसून येते.

**शिक्षणाची उद्दिष्टे :-**

**(१) शिक्षणाने व्यक्तिविकास साधणे :-**

शिक्षणामुळे व्यक्तीतील न्यूनगंड नाहीसा झाला पाहिजे. त्याच्या ठिकाणच्या संकुचित भावनेचा लोप होऊन राष्ट्राच्या दृष्टीने व्यक्तिविकास शिक्षणाव्दारे साध्य करता आला पाहिजे. दिनांक २२.८.५१ च्या आपल्या 'जनता' या साप्तासहिकात डॉ. आंबेडकर लिहितात. "खालच्या वर्गाची ज्यांच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे, चालू समाजपध्दतीमुळे त्यांचे जे जीवन लुबाडण्यात आले, त्याचे स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय

महत्त्वआहे याची त्याना खास जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न सोडविण्याचा उपाय आहे.

**(२) व्यक्तीला चारित्र्यसंपन्न बनविणे :-**

शिक्षणाव्दारे व्यक्ती चारित्र्यसंपन्न बनली पाहिजे. चारित्र्यसंपन्नतेचा व्यापक अर्थ शिक्षणामुळे निर्माण होतो व अशी चारित्र्यसंपन्नता शिक्षणामुळेच व्यक्तीच्या ठिकाणी येत असते. शिक्षणाव्दारे श्रेष्ठ दर्जाची चारित्र्यसंपन्नता निर्माण होण्याकरिता चारित्र्यसंपन्नतेचा आधार, **विद्या, प्रज्ञा, शील, करूणा व मैत्री** यांचा परस्परांशी असलेला योग्य संबंध समजला पाहिजे. ही पाच तत्त्वे म्हणजे मनुष्याच्या चारित्र्याचा पंचस्तंभी आधार होय. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

**(३) स्वोन्नती साधने :-**

शिक्षणाव्दारे स्वतःचा उध्दार म्हणजे स्वतःच प्रगती करता आली पाहिजे. त्याचप्रमाणे स्वतःच्या जातीच्या उध्दाराची तळमळ निर्माण झाली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाव्दारे ज्ञानसंपन्नता प्राप्त केली होती. त्याचप्रमाणे अस्पृश्यातील हीनत्वाची भावना कशी हटविता येईल याचा प्रयत्न केला होता. आपला उध्दार दुसरा कोणीही करू शकत नसेल तर शिक्षणाव्दारे स्वोध्दाराची तळमळ निर्माण होणे आवश्यकच आहे. "झगडा, आणखी संघर्ष, त्याग करा, आणखी त्याग करा. त्यागाची आणि हालांची पर्वा न करता एकसारखा संघर्ष चालू ठेवाल तरच तुम्हाला मुक्ती मिळेल.

**शिक्षणाचे कार्य :-**

बाबासाहेबांच्या मते, 'प्रज्ञाविकास' हे शिक्षणाचे मुख्य कार्य असून त्यात पुढील मुल्यांचा समावेश महत्त्वाचा ठरतो : (१) खालच्या जातीतील लोकांच्या मनात विवेक जागवून व्यक्तिगत व राष्ट्रीय जीवनाचे महत्त्व पटवून देणे. (२) माणसामाणसांमधील उच्च-नीच व श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभावाचा आणि ज्या न्यूनगंडाने त्यांची वाढच खुंटवून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावयास लावले त्या विषारी परंपरेतून सुटका करणे. (३) खालच्या वर्गातील व्यक्तीची खाण्यापिण्याची व कपडयालत्त्यांची फुकट सोय करणे म्हणजे त्यांना उच्च वर्णीयांच्या सेवेसाठी तत्पर ठेवणे नव्हे. बाबासाहेबांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय चळवळीला शिक्षणविषयक विचारांचा भरभक्कम आधार होता. (४) दलित पिडीत समाजाचा खऱ्या अर्थाने उध्दार शिक्षणानेच करणे.

**शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यात यावे :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "उपासमारीने शरीराचे शोषण कमी झाल्यास माणूस हतबल होवून अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्याने जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो. हे भविष्याच्या दृष्टीने घातक आहे म्हणून प्रत्येकाने शिक्षित होणे व त्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकरण होणे आवश्यक आहे."

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे :-**

**भारतात** प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याबाबत १९१० पासून ब्रिटीश शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न झालेला होता. १९२० साली राजकीय सुधारणेचा कायदा पास होऊन मुंबई शहरातील प्राथमिक शिक्षण मुंबई म्युनिसिपालिटीकडे व १९२३ च्या कायद्याने जिल्हयातील प्राथमिक शिक्षण स्थानिक नगरपालिका व लोकल बोर्ड यांच्याकडे सोपविण्यात

आले. त्यावेळच्या कार्यमंत्र्यांवर व शिक्षणमंत्री डॉ. परांजपे यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कडाडून हल्ला चढविला. कारण त्यांच्या मते शिक्षणावर स्थानिक स्वशासन संस्थांपेक्षा प्रांतिक सरकारचा ताबा असणे इष्ट व आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या दृष्टीने राज्यसरकारचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. त्याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रीक प्रसार सर्वांगीण प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे. केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यास कैक शतके लागतील म्हणून शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा."

प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले तसे ते मोफत ठेवण्याची आवश्यकता नाही, असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. एकतर प्राथमिक शिक्षणाची फी नगण्य असते. ती देण्याचे ज्यांचे सामर्थ्य आहे, त्यांच्याकडून ती वसूल करावी व ज्यांना ती सुध्दा देणे अशक्य आहे. त्यांच्या करताच मोफत प्राथमिक शिक्षण असावे.

**शिक्षणाव्दारे काय साध्य व्हावे :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाविषयी म्हणतात, "शिक्षण ही एक शक्ती आहे. ती प्रत्येक नागरिकाला मिळाली तरच राष्ट्र बलवान होते. शिक्षणाव्दारे सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. सामाजिक समता आणि स्वातंत्र्य संरक्षण व संवर्धन यासाठी आवश्यक असणारी शक्ती म्हणजे शिक्षण." समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे पारतंत्र्याला निमंत्रण होय. शिक्षण हे दुधारी शस्त्र असल्यामुळे चालविण्यास धोक्याचे असते. चारित्र्यहीन आणि विनयहीन सुशिक्षित माणूस हा पशूपेक्षा भयंकर असतो.

जर सुशिक्षित मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास विरोधी असेल तर तो समाजाला शाप ठरतो.

विद्यार्थी वर्गाने दोन गोष्टी ध्यानात ठेवल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे बुध्दिमत्तेत आणि कार्यक्षमतेत आपण कमी पडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे व्यक्तिगत सुखापेक्षा आपण आपला समाज स्वतंत्र व सन्माननीय कसा होईल याकडे लक्ष पुरविले पाहिजे. विद्यार्थी आपले कर्तव्य नि जबाबदारी कशी पार पडतात यावरच समाजाचे भवितव्य अवलंबून आहे.

**शिक्षक कसा असावा? :-**

शाळेत समबुध्दीचे, उदात्त, नि:पक्षपाती थोर मनाचे शिक्षक पाहिजेत. "शिक्षकाने बहुश्रुत असावे. शिक्षकाला आपले विचार व्यवस्थित मांडता आले पाहिजेत. तसेच इतरांचे व स्वत:चे विचार तपासता आले पाहिजेत." "शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये मी काही तरी निर्माण करू शकेन असा आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे." "प्राध्यापक नुसताच विव्दान असून चालायचे नाही तर तो सर्वश्रुत असला पाहिजे. तो स्वत: अत्यंत उत्साही असला पाहिजे व आपण आपला विषय मनोरंजक करू अशी त्यांच्यात धमक असली पाहिजे." "शाळा म्हणजे उत्तम नागरिक तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्यांचा फोरमन जितका शहाणा असेल तितका उत्तम माल कारखान्यातून बाहेर पडणार आहे.

**निष्कर्ष :-**

सामाजिक दृष्टीकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणापासून विद्यार्थ्यांत (१) विचार करण्याची शक्ती बृध्दिंगत झाली पाहिजे (२) त्यांच्या ठिकाणी वैयक्तिक समस्येसोबतच सामाजिक समस्या सोडविण्याची क्षमता आली पाहजे. (३) आजच्या शिक्षणात पुस्तकी

शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जात असून या शिक्षणाची व्यावहारिक जीवन व समाजजीवनातील समस्या सोडविणे यावरून पूर्णपणे फारकत झालेली आहे ते होता कामा नये.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले हे विचार [illegible] सप्टेंबर १९४७ ला मुंबईच्या सिध्दार्थ महाविद्यालयाच्या विद्यार्थी संसदेचे उद्घाटन करताना व्यक्त केले.

(३) समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुता या तत्वांवर आधारलेला जीवनधर्म म्हणजे सामाजिक लोकशाही. जी शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायला पाहिजे.

(४) डॉ. आंबेडकरांच्या मते, मानवाच्या खऱ्या उत्कर्षासाठी, नवआशा, नवउत्साह प्राप्त करण्यासाठी आणि मानवाला त्याच्या शारिरीक व वैयक्तिक उपभोगांवर संतुष्ट राहू न देता बुध्दीच्या व अंतःकरणाच्या उन्नतीसाठी मानवजातीशी समरस होण्याची प्रेरणा देवून मनाला स्वार्थ व संकुचिततेमधून बाहेर काढते. आणि प्रेम व करूणा यांची वृध्दी करून अखिल मानव जातीशी समरस होण्याची प्रेरणा, उत्साह व लाभ निर्माण करून देते ते खरे शिक्षण होय.

# ७. इतिहास विषयाचे व्यवस्थापन - एक नवा दृष्टिकोन

इतिहासाला इंग्रजीमध्ये History हा पर्याय शब्द वापरला जातो, History म्हणजे मानव जातीच्या कथेचा इतिहास. प्रो. जोन्स यांच्या मते, "इतिहास म्हणजे जीवनाभुवांची खरी खाण आहे. आपल्याला मानवजातीच्या अनुभावापासून फायदा व्हावा म्हणून आजचा युवक इतिहास शिकतो. इतिहासामध्ये मानवी समाजामध्ये घडलेल्या खऱ्या घटनांचे वर्णन केले जाते. जगात घडलेल्या घटनांचा शोध घेऊन त्या घटनांचे वर्णन केले जाते. आणि त्या घटनांच्या क्रमबध्द स्वरूपालाच इतिहास म्हणून ओळखले जाते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीच्या दष्टिकोनातून शालेय अभ्यासक्रमात इतिहास विषयाचा समावेश झलेला दियून येतो. कारण भारताला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय संविधानात सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, अखंडता इत्यादी बावतीत जे निर्धार व्यक्त केले त्यांच्या पूर्ततेसाठी शालेय शैक्षणिक स्तरावर इतिहासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

असे म्हणतात की, इतिहासाच्या माध्यमातून राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये प्रेमभाव साधला जातो. विश्वशांती आणि विश्वकल्याण या संकल्पनेचा विकास इतिहासातूनच घडत असतो. आणि मानव व मानवी संस्कृतीचा अभ्याससुध्दा इतिहासातच होत असतो. याचाच अर्थ असा की,इतिहासाचा संबंध प्रामुख्याने मनुष्याशी येतो.

- इतिहासाच्या अभ्यासाने मानवाच्या कल्पनाशक्तींचा व स्मरणशक्तीचा विकास होतो.

- निरनिराळे समाज आणि त्यांच्या संस्कृतीचे ज्ञान होते. त्यातील गुणदोष लक्षात येतात.
- मानवाच्या गरजा, ईच्छा, आकांक्षा यांचे मर्म लक्षात घेवून व्यक्ती समंजस, सहिष्णु व विवेकी बनते.
- मानवी विचारशक्तीचा विकास होतो.
- इतिहासात घटनांचा कार्यकारणभाव दिला जात असल्याने आकलनशक्तीचा विकास होण्यास मदत होते.
- इतिहासाच्या अध्ययन-अध्यापनामुळे मानवी मूल्यांचा विकास होण्यास मदत होते.
- सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात सहभागी होण्यासाठी आवश्यक असेली निकोप अभिवृत्ती विकास पावते.

यादृष्टीने इतिहासाच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना समृध्द अशा अनुभूती प्राप्त करून देणे शिक्षकांचे कर्तव्य ठरते. त्यासाठी शिक्षकांना आपल्या **"विषयाचे व्यवस्थापन"** करणे गरजेचे आहे.

**विषयाचे व्यवस्थापन म्हणजे काय?**

"fo"kk;kph mfn+n"Vs साध्य करण्याच्या हेतूने आणि उपलब्ध साधनांचा कुशल आणि परिणामकारक उपयोग करण्याच्या दृष्टीने आखलेल्या विविध उपक्रमांचा संच म्हणजे व्यवस्थापन होय"

व्यवस्थापन ही एक महत्त्वाची ज्ञानशाखा होय. दर्जेदार अध्ययन-अध्यापनाच्या नियोजनासाठी व्यवस्थापन महत्वपूर्ण ठरते. कारण अध्यापन प्रक्रिया जरी शिक्षकांपुरती मर्यादित असली तरी त्यात इतर घटकांचीही भूमिका समाविष्ट असते. विविध घटकांमुळेअध्यापन प्रक्रियाही प्रभावित

होत असते. आणि त्याचा परिणाम फलितांवर होतो. यादृष्टीने विषय व्यवस्थापन ही एक प्रणाली आहे.

इतिहास विषयाचे व्यवस्थापन करतांना खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

**अ) उद्दिष्टे** - इतिहास विषयाचे अध्यापन का करायचे? कशासाठी करायचे? कशापध्दतीने करायचे? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी उद्दिष्टे निश्चित करावी लागतात.

**ब) साधने** - उद्दिष्टपूर्तीसाठी शिक्षकाला अनेक प्रकारच्या साधनांची गरज भासते. यात भौतिक, आर्थिक साधनांसोबतच वेब, तंत्रज्ञान आणि माहिती या महत्त्वाच्या साधनांचासुध्दा उपयोग करावा लागतो.

**क) वैशिष्ट** - परिस्थितीमध्ये कोणत्या साधनांचा कोणत्या कारणांसाठी वापर करायचा हे ठरविणे फार महत्त्वाचे असते. असे निर्णय घेण्यासाठी Efficicncy आणि Effectiveness या दोन्हींचा विचार करायला पाहिजे.


**ड) उपक्रम** - उपेक्रम यात अध्यापकाने अध्यापनाअंतर्गत करावयाच्या विविध कृतींचा समावेश होत असतो. परिस्थितीनुरूप आणि मानवी घटकांच्या गरतेनूसार या कृती सतत बदलत असतात. जसे नियोजन, नियंत्रण, संघटन, निर्णय प्रक्रिया, संप्रेषण, अभिप्रेरण, नेतृत्व यासारख्या.

## इतिहास विषयाची व्यवस्थापन प्रक्रिया

इतिहास विषयाचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने प्रणाली उपागमाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. विषयाच्या यशापयशात प्रसेत आदान आणि प्रक्रियेचा महत्त्वाचा वाटा असल्याने त्या सर्वांची दखल घेणे, त्यातील उणिवांचा सतत शोध घेवून त्या सुधारणांसाठी योग्य आणि वेळीच उपाययोजना करणे हे विषय व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य आहे. आदान, प्रक्रिया आणि फलिते यांच्यात विषय व्यवस्थापनाचा समावेश होतो. इतिहास हा जर अध्ययनआणि अध्यापनाचा विषय असेलतर त्या विषयाचा संपूर्ण पाठ्यक्रम हा प्रणालीअंतर्गत मोडतो. म्हणजेच प्रणाली ही विषय व्यवस्थापनाची निर्देशक ठरते.

## विषय व्यवस्थापन प्रणाली

### इतिहास विषय



इतिहास व्यवस्थपनाच्या प्रक्रियेत अभ्यासक्रम आणि अध्यापन हे दोन महत्त्वपूर्ण घटक आहेत.

* **अभ्यासक्रमाचे व्यवस्थापन** - "Curriculum is the titalkity of ;learning experiences intentionally designed and proved by the school Curriculum" या शब्दात "विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनात सर्वांगीण विकासासाठी जेजे शिकणे आहे. ते सर्व अंतर्भूत आहे. अभ्यासक्रम प्रक्रिया अधिक विस्ताराने समजण्यासाठी तिचे अनेक घटक करण्यात येतात. यातूनच Course, Outline, Unit, Topic, Sub-topic अशा शब्दांची व्युत्पत्ती झालेली दिसते. जेव्हा अभ्यासक्रम तयार करण्याच्या कामाचे केंद्रीकरण होते तेव्हा अभ्यासक्रमांत शाळांच्या विशिष्ट गरजा किंवा उपलब्धी यांचा विचार अपेक्षित नसतो. राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना लागू पडेल असा सरसकट अभ्यासक्रम शासकीय यंत्रणात तयार होतो. म्हणूनच अभ्यासक्रमाच्या संदर्भात शाळेची व्यापक भूमिका शाळेच्या मुख्याध्यापकांनी विचारात घेणे आवश्यक आहे.

अभ्यासक्रमात विद्याथी, समाजाच्या गरजा आणि ज्ञानसंपदा ह्या तीन स्त्रोतांचे योगदान महत्वपूर्ण असते. व त्यांच्या योग्य समन्वयामुळेच अभ्यासक्रम संतुलित राहतो. संतुलित अभ्यासक्रम सजीव करण्याची जबाबदारी ही शाळेची असते. शासनाकडून आलेलया अभ्यासक्रमाचा सखोल अीयास शाळाप्रमुखांसोबतच शिक्षकांनीसुध्दा करणे गरजेचे असते. त्यानंतरच शाळेला आपला कृतिकार्यक्रम ठरविणे सोपे जाते. शासकीय यंत्रणेतून आलेल्या अभ्यासक्रमात प्रामुख्याने अध्यापनाचे विषय आणि प्रत्येक विषयाचा आशय याची नोंद असते. उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात अध्ययनासाठी पुस्तकांची यादी असते. परंतू एवढ्या मर्यादित मार्गदर्शनावरून प्रतयेक शाळेला, तेथील शिक्षकांना आपल्या

अध्यापनाच्यासंबंधीचे सर्व निर्णय घेणे अपरिहार्य ठरते. ही त्रुटी दूर करण्यासाठी मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाखाली इतिहास विषय शिक्षकांनी विषयाचे व्यवस्थापन करावे व त्याचा लिखीत स्वरूपात आराखडा तयार करावा.

शिक्षकांची क्षमता, सर्जनशीलता, कल्पकता आणि व्यासंगपूर्ण व सखोल आंतरक्रियेतूनच इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमाचे अध्यापनाचे नियोजनचे व्यवस्थित, दर्जेदार व यशस्वी होऊ शकते. कारण अभ्यासक्रमाचे तीनही स्त्रोत हे सतत बदलत असतात.

## अध्यापनाचे व्यवस्थापन

अभ्यासक्रमाचा संबंध अध्यापन व्यवस्थापनाशी असतो अभ्यासक्रमाचे व्यवस्थापन हे शिक्षकांच्या परिणामकारक अध्यापनासाठी अतिशय उपयुक्त साधन ठरू शकते. त्यादृष्टीने व्यवस्थापन संक्षिप्त, स्पष्ट, नि:संदिग्धआणि कृतीत उतरविण्यास सुलभ असणे आवश्यक असते.

अभ्यासक्रमासोबतचअध्यापन प्रक्रिया हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. कारणअध्यापन प्रक्रियेतूनच फलिते (इच्छित क्षमता) प्राप्त होत असतात. आणि त्यादृष्टीने अध्यापनाचे आदान-प्रदान यशस्वी होणे आवश्यक ठरते.

**इतिहास विषयाच्या व्यवस्थपन प्रक्रियेत समाविष्ट घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे "अध्यापन प्रक्रिया"**

अध्यापन प्रक्रिया ही शाळेतील सर्वात महत्त्वाची प्रक्रिया समजली जाते. अभ्यासक्रम सर्व दृष्टींनी संपन्न असलातरी त्याच्या विषयप्रभावी अध्यापनासाठी वर्गात जिवंत करण्याचे कार्य शिक्षकांचे अध्यापनच करीत असते. एवढेच नव्हेतर अभ्यासक्रमात काही उणीवा असल्यास अध्यापक आपल्या अध्यापनाव्दारे त्या भरून काढू शकतात. अध्यापन प्रक्रियेत खालील मुद्यांचा समावेश होणे महत्त्वपूर्ण ठरते.

अध्यापनाचे नियोजन →
- उद्दिष्टे
- आशयाची निवड व मांडणी
- अध्यापन पध्दतीची परिणाकारक अंमलबजावणी
- सहाय्यक साधनांची निवड
- निर्माण आणि साधनांचा योग्य वापर
- अध्यापन प्रक्रियेशी संबंधित घटकांचे (वि.-शि.) मूल्यमापन

इतिहास विषयाची व्यवस्थापन प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी अभ्यासक्रमाचे तीन स्त्रोत आणि व अध्यापनाचे विविध घटक दोन्ही घटक महत्वपूर्ण असल्याने या दोन्ही घटकांचा स्थूलपणे तयार केलेलया आराखडयावरून आपल्याला इतिहास विषयाच्या व्यवस्थापनाची व्याप्ती लक्षात येऊ शकते.

**१) शिक्षक** - इतिहास विषय शिक्षकाची निवड व नेमणूक, इतिहास विषयाचा व्यासंग व शैक्षणिक पात्रता, उदबोधन, इतिहास विषयाच्या अध्यापनाचे निरिक्षण, पर्यवेक्षण,मुल्यमापन इतिहास विषयातील गुणवत्ता विकासाची संधी,विषय शिक्षकांचे वैयक्तिक गुण व क्षमता,

इतिहास विषयासाठी केलेल्या उत्कृष्ट व विशिष्ट कामगिरीसाठी, राबविण्यात आलेले विविध प्रकल्पांसाठी सत्कार, पुरस्कार याचा विचार विषय व्यवस्थापन करतांना करणे आवश्यक ठरते.

२) **विद्यार्थी** - इतिहास विषयासाठी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया,संबंधित विषयाच्या अध्ययनातील प्रगती व त्याची नोंद घेणे, इतिहास विषयासंदर्भात विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक कार्यक्रम, त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी इतिहास पाठयक्रमाच्या व्यतिरिक्त आयोजित केलेले उपक्रम, चाचण्या, परीक्षा, Monityoring या सर्व गोष्टींचा विचार इतिहास विषयाचे व्यवस्थापन करतांना प्रामुख्याने करावा लागतो.

३) **साधनसंपतत्ती व उपक्रम** - विषयासंदर्भात उलब्ध साधनसामुग्री, त्याचा योग्य वापर,ग्रंथालय व इतर शैक्षणिक घटकांची योग्य व आकर्षक मांडणी, इतिहास विषयकक्ष, क्षेत्रभेटी, सहल, ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन यांचा पुरेपूर उपयोग व लाभ व्हावा यादृष्टीने विद्यार्थी व शिक्षक यांना उत्तेजन देणे हया बाबी विषय व्यवस्थापनात समाविष्ट असतात.

४) **बहिस्थ वातावरण** - इतिहास विषयाचे शिक्षक व अध्ययन करणारे विद्यार्थी यांचे परिसरातील घटकांशी सलोख्याचे संबंध, इतिहासविषयक उपक्रम व शैक्षणिक प्रक्रिया समृध्द करण्यासाठी बाहय परिसरातील व्यक्ती, समाज, पालक इत्यादींचे सहकार्य, शाळेबद्दल आत्मीयता वाढविणारे विविध उपक्रम तसेच इतिहास विषयाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर विद्यार्थी व परिसरातील इतर घटकांना गरजेनुसार शैक्षणिक सहाय्य इ.बाबींचा विचार महत्वपूर्ण ठरतो.

**शालेय व्यवस्थापन :-**

इतिहासविषयाचे व्यवथापन करतांना शाळेचे व्यवस्थापन विचारात घेणे आवश्यक ठरते त्यामध्ये संस्थाप्रमुख,मुख्याध्यापक यांची इतिहाससंबंधीची भूमिका, व्यक्तिमत्व, कार्यालयीन कर्मचाऱ्यांची विषयासंदर्भात व राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी सकारात्मक भूमिका, पत्रव्यवहार, दस्ताऐवज, विद्यार्थी, शिक्षक यांना आवश्यक असलेली मदत या सर्व गोष्टी शाळा व्यवस्थापनाअंतर्गत येतात. विषय व्यवस्थापन हा शाळा व्यवस्थापनाचाच एक भाग असल्याने ते विचारात घेणे अपरिहार्य ठरते.

वरील सर्व महत्वपूर्ण घटकांवरून आपल्याला इतिहास विषयाच्या व्यवस्थापनाची व्याप्ती लक्षात येते. एकंदरीत इतिहास विषयाच्या गुणवत्ता वाढीसाठी विषयाचे व्यवस्थापन महत्वपूर्ण प्रक्रिया ठरते.

# ८. अभ्यासक्रमांतर्गत भाषेचे स्थान

**प्रस्तावना :-**

समाजामध्ये विद्यार्थ्यांचे आदानप्रदान करण्याचे प्रमुख साधन भाषा हे आहे. समाजाचे अस्तित्व आणि विकासासाठी अविरत कार्यशील असलेली भाषा म्हणून मानवी जीवनामध्ये महत्वाची आहे. सर्व मानवी समूहांचा स्वतःच्या भाषेशी घनिष्ठ व अतूट संबंध असतो. भाषा ही प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचा एक भाग असते. समाजाची संस्कृती, परंपरा, श्रद्धा, ज्ञान इत्यादींचे जतन आणि पुढच्या पिढीकडे वहन करण्याचे महत्वाचे कार्य भाषेमार्फत सुरू असते. परंपरेतून चालत आलेल्या आणि संस्कृतीमध्ये अंतर्भूत असलेल्या अनेक गोष्टी भाषेमुळेच मनुष्य शिकतो. त्यामुळे भाषेला 'समाजाचे संचित' असे म्हटले जाते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात भाषेची भूमिका सर्वांत महत्वाची असल्याने शिक्षणप्रक्रियेत विविध दृष्टिकोनातून भाषेला स्थान दिले गेले. शिक्षणामधील विविध अभ्यासक्रम हे विशिष्ट भाषेच्या माध्यमातून शिकले व शिकविले जातात. यामुळे शिक्षणप्रक्रियेत भाषा व अभ्यासक्रम यांचा नैसर्गिकपणे समन्वय घडून येत असतो.

याचाच अर्थ अभ्यासक्रमाशिवाय भाषेला औपचारिक शिक्षणात महत्त्व उरत नाही तर भाषेशिवाय अभ्यासक्रम शिकवला जाऊ शकत नाही. यादृष्टीनेच सद्यःस्थितीत या दोन्ही संकल्पनाचा एकत्रितपणे विचार मांडणारी नवीन संकल्पना उदयास आली. यालाच LAC म्हणजेच **"Language Across The Curriculum"** अर्थात 'अभ्यासक्रमांतर्गत भाषा' ही संकल्पना आज रूढ झालेली दिसून येते.

`अभ्यासक्रमांतर्गत भाषा` ही संकल्पना जास्त करून उच्च शिक्षण आणि अध्यापन शास्त्रीय सैध्दांतिक चर्चेत दिसून येते. मात्र शालेय स्तरावर या संकल्पनेचा विशष ऊहापोह झालेला दिसून येत नाही. ह्या संकल्पनेचा उदय १९७०-८० च्या दशकात प्रथमतः ग्रेट ब्रिटनमध्ये झालेला आढळून येतो. जिथे अभ्यासक्रमांतर्गत भाषेचा संबंध शालेय भाषिक धोरणाषी जोडलेला दिसून येतो जो संपूर्ण शालेय भाषिक शिक्षणाला व्यापणारा आहे.

अभ्यासक्रमांतर्गत भाषा ही संकल्पना शालेय शैक्षणिक धोरणामध्ये भाषेच्या विकासावर आणि भाषेच्या सर्वत्र वापरावर विशेष भर देणारी आहे. यात फक्त भाषेचे विषय शिकविण्यासाठी भाषेचा विचार न करता इतरही अभाषिक विषय शिकविण्यासाठी भाषेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करता येईल याचाही विचार यात अंतर्भूत आहे. (अभिप्रेत आहे.)

**अभ्यासक्रमांतर्गत भाषा विषयक चळवळ :-**

भाषेचे अस्तित्व काय? मानवाला भाषेची गरज का भासली? जर भाषा जन्माला आली नसती तर काय झाले असते? या सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्याचा प्रयत्न हजारो वर्षांपासून मानव करीत आला आहे. या सर्व बाबींची माहिती समाजातील प्रत्येक घटकास व्हावी यासाठी भाषेचा समावेश मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात करण्यात आला. त्याला शिक्षणक्षेत्रसुध्दा अपवाद राहिलेले नाही. अभ्यासक्रमांतर्गत प्रत्येक विषयात भाषेचा समावेश करण्यात आला असून त्याव्दारे विद्यार्थ्यांना भाषा, भाषेचे महत्त्व, स्थान, गरज या सर्व घटकांचा समावेष शिक्षणशास्त्रातील विविध अभ्यासविषयांमध्ये करण्यात आला. यासाठी भाषेविषयक सिध्दांत, विविध विचारप्रवाह, दृष्टिकोन यांचा समावेश भाषेच्या अभ्यासक्रमांत व एकंदरीत

अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे. यामध्ये बुलकचा अहवाल सर्वात महत्वपूर्ण समजला जातो. त्याचप्रमाणे एलरचा १९८९ चा भाषाविषयक तुटीचा सिध्दांतसुध्दा महत्वपूर्ण ठरतो.

अभ्यासक्रमांतर्गत भाषाविषयक ज्या चळवळी सुरू झाल्यात त्यामध्ये खालील बाबींचा विषेशत्वाने समावेष होतो.

**भाषेविषयक विचारप्रवाह :-**

अ) अभ्यासक्रमांतील भाषेसिध्दांत (LAC) :-

भाषा मानवी जीवनांतील अविभाज्य घटक आहे. भाषा मानवी जीवनाला सर्व बाजूंनी अधिक अर्थ प्राप्त करून देते. भाषा मानवी जीवनाची जडण घडण करीत असते. भाषेशिवाय मानवी जीवन अर्थहीन आहे. प्राचीन काळात भाषा निर्माण होण्याची विविध कारणे असली तरी भाषा मानवी जीवनाला अधिक परिपूर्ण आणि सृजनशील बनवित असते. भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण असे महत्व आहे. भाषा मानवी जीवनाला प्रभावित करते.

**अभ्यासक्रमविषयक चळवळ :-**

यांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१. भारतामध्ये भाषा आणि साक्षरता या बाबी फक्त भाषा विषयाच्या शिक्षकांशीच निगडित आहेत असे समजले जाते.
२. विद्यार्थ्यांची भाषा आणि त्यांची भाषिक पार्श्वभूमी वर्गातील आंतरक्रियांवर परिणाम करते. (प्रतिकूल)
३. वर्गातील आंतरक्रिया भाषाविषयक निर्णय आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे स्वरूप प्रभावित होते
४. विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचे अध्ययन अध्यपनातील महत्व ओळखणे.

५. विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचा आणि त्यांच्या भाषेचा शाब्दिक आणि अशाब्दिक स्वरूपात भाषा विषयाच्या विश्वासपूर्ण विकासासाठी होणारा उपयोग लक्षात घेणे.

६. विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शाब्दिक आणि अशाब्दिक स्वरूपात उपयोग करून घेणे.

७. शिक्षक आणि विद्यार्थी यांनी भाषाविषयक आणि भाषा विषयाच्या संदर्भातील सर्व तात्त्विक घटकांवर विचार करणे आणि ते आत्मसात करणे

८. शिक्षक आणि विद्यार्थी यांनी भाषा विषयाचे घटक मानून वेगवेगळ्या शालेय घटकांशी संबंधित क्षमता स्वतःमध्ये विकसित करणे आवश्यक असते

९. त्याचबरोबर शिक्षणामध्ये वारंवार होणा-या भाषाविषयक बदलांना अनुकूलआणि प्रतिकूल स्वरूपात सामोरे जाणे आवश्यक आहे

१०. विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आणि भाषा प्रथम आणि व्दितीय समजून तिचा अध्ययन अध्यापनात उपयोग करणे

११. वर्गातील भाषाविषयक विविधतेविषयी विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक भावना निर्माण करणे

१२. शिक्षकांनी वर्गातील वातावरण समजून घ्यावे आणि शाब्दिक भाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भाषेच्या विषयांमध्ये आवड निर्माण व्हावी यासाठी वेगवेगळ्या कार्यनिती निर्माण करणे आवष्यक आहे.

अशाप्रकारचे सकारात्मक उपाय वरील वेगवेगळ्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षकाने करणे आवश्यक आहे जेणेकरून विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचा फायदा विद्यार्थ्यांच्या भाषेच्या शिक्षणात होईल.

**उद्दिष्टये :-**

१. विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता आणि भाषिक प्रभुत्वाचा विकास करणे.

२. विषयज्ञान आणि भाषिक क्षमता यांचा उपयोग इतर विषयांच्या अध्ययनासाठी करणे.

- विद्यार्थ्यांना भाषेचा उपयोग करता यावा यासाठी त्यांना वेगवेगळया स्वरूपाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
- भाषाविषय आणि इतर विषयाचा सहसंबंध समजून घेण्यासाठी इतर अभ्यासक्रमेतर कार्यक्रमाचे नियोजन करणे.
- भाषाविषयक कार्यक्रमांचे योग्यप्रकारे आयोजन करणे.
- भाषाविषयक ज्ञानाच्या वृध्दीसाठी भाषिक पर्यावरण निर्माण करणे.
- भाषाविषयक अभ्यासात विद्यार्थ्यांनी काय शिकावे यांची नोंद करावी.

**अभ्यासक्रमांतर्गत भाषेची (LAC) शाळेतील अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यनीती :-**

उद्दिष्टांची योग्य प्रकारे पूर्तता करता यावी यासाठी त्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होणे अत्यंत आवष्यक असते त्याचप्रमाणे **LAC** या सिध्दांताची योग्यप्रकारे शाळेत अंमलबजावणी करता यावी यासाठी योग्य प्रकारे वेगवेगळया कार्यनीती राबविल्या जाव्यात. त्या खालील प्रकारे असाव्यात.

(१) भाषेचे अध्ययन

(२) सामाजिक शास्त्राचे अध्ययन

(३) पर्यावरण शिक्षण

(४) सहशालेय कार्यक्रमाचे आयोजन

(५) मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन

(६) विज्ञानाचे अध्ययन

अशाप्रकारची आवश्यक स्वरूपांची कार्यनीती शाळेमध्ये अभ्यासक्रमांतर्गत भाषे (LAC) च्या अंमलबजावणीसाठी राबविणे आवष्यक आहे.

**अभ्यासक्रमांतर्गत भाषेमधील (LAC) महत्वाचे घटक :-**

LAC मध्ये असंख्य घटक आहेत जे यांवर प्रतिकूल आणि अनूकूल प्रभाव टाकीत असतात. त्यामधील महत्वाचे घटक खालीलप्रमाणे आहेत.

**अभ्यासक्रमांतर्गत भाषेमधील (LAC) घटक** → शिक्षक / विद्यार्थी / शाळा

**शिक्षक : -**

- अभ्यासक्रमाच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील एक महत्वाचा घटक.
- शाळा विकासाचा आधारस्तंभ.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा प्रमुख स्त्रोत.

१. विद्यार्थ्यांच्या सर्व अध्यापनविषयक गरजांची पूर्तता करण्याचे कार्य करणारा प्रमुख घटक.

२. विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून त्याची भाषिक क्षमता विकास करणारा प्रमुख घटक.

३. शाळा आणि विद्यार्थी यांमधील दुवा म्हणून कार्य करतो.

**विद्यार्थी : -**

(१) अभ्यासक्रमाविषयक (LAC) चळवळीत विद्यार्थी अत्यंत महत्वाचा घटक आहे.

(२) विद्यार्थी हा विविध भाषिक पार्श्वभूमि असलेला (LAC) मधील घटक आहे.

(३) विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमिचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम याभाषाविषयक चळवळीवर जाणवत असतो.

(४) शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचे सखोल ज्ञान असायला हवे.

(५) विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचा आधार घेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळायला हवी.

(६) प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीच्या स्वरूपामुळेच अभ्यासक्रमांतर्गत भाषा (LAC) ही चळवळ निर्माण झाली.

**शाळा :-**

(१) विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी प्रयत्न करणारा घटक.

(२) शिक्षक या घटकाला विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी प्रयत्न करण्यासाठी प्रत्येक स्तरावर मदत करण्याची जबाबदारी या घटकावर असते.

(३) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी ही शिक्षकाची असते व ती पार पाडण्याचे कार्य शाळा हा घटक करत असतो

(४) विद्यार्थ्यांच्या भाषिक विकासासाठी आवश्यक असलेली कार्ये हा घटक करीत असतो.

(५) शिक्षकाला विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी जाणून घेण्यात मदत करते

(६) आवश्यक त्या सर्वसाधनांची पूर्तता करते

(७) शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे पालक यामध्ये समन्वय साधते.

(८) विद्यार्थ्यांना भाषा विषय अधिक आवडीचा व्हावा यासाठी प्रयत्न करणे.

(९) त्यासाठी विविध उपक्रम, कार्यक्रम यांचे आयोजन करते.

(१०) सगळ्या चळवळीतील जबाबदार घटक म्हणून सदैव कार्य करते.

अशाप्रकारे वरील घटकांचा परिणाम या चळवळीवर होत असतो.

**सारांश :-**

भाषा मानवी जीवनातील अविभाज्य घटक आहे. भाषा मानवी जीवनाला सर्व बाजूंनी अर्थ प्राप्त करून देते. भाषा मानवी जीवनाची जडणघडण करीत असते. भाषेशिवाय मानवी जीवन अर्थहीन आहे. प्राचीन काळात भाषा निर्माण होण्याची विविध कारणे असली तरी भाषा मानवी जीवनाला अधिक परिपूर्ण आणि सृजनशील बनवीत असते. भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. भाषा मानवी जीवनाला प्रभावित करते म्हणूनच प्रत्येक विशयाचा अभ्यासक्रम तयार करतांना भाषा या घटकाचा प्रामुख्याने विचार केला जातो. अभ्यासक्रमाचे स्वरूप ठरवितांना, व्याप्ती निश्चित करतांना आणि विद्यार्थ्यांनुरूप अभ्यासक्रमाचा स्तर ठरविण्यासाठी भाषेचा उपयोग केला जातो. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये भाषेची आवड निर्माण होऊ शकेल. अभ्यासक्रम शिकविण्याच्या विविध पध्दती आहे. या अध्ययन-अध्यापन पध्दतीचा भाषेशी अत्यंत जवळचा संबंध असून या पध्दतीची परिणामकारकता ही `भाषा` या घटकावर अवलंबून असते. त्यामुळे अभ्यासक्रमांतर्गत भाषेचे स्थान अतिशय महत्वपूर्ण ठरते.

तसेच संस्कृतीची अभिव्यक्ती सुध्दा प्रामुख्याने भाषेच्याव्दारे होत असते. आणि व्यक्तीच्या समाजीकरणाला व सामाजिक कृतिसौकर्याला भाषेइतके दुसरे प्रभावी साधन कोणतेच नाही. विद्यार्थ्यांमध्ये भाषिक विविधता निर्माण होण्यासाठी वर्गातील भाषिक विविधता अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असते.

परंतु सध्याच्या शालेय स्तरावरच्या भाषा शिक्षणाचा विचार करता असे दिसून येते की, प्रत्येक विषयाची उद्दिष्टे, व ध्येये वेगळी असतात. आणि त्या दृष्टिकोणातून प्रत्येक स्तरावर वेगवेगळा अभ्यासक्रम तयार करण्यात येतो. मात्र यामुळे भाषा शिक्षणावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येत नाही. कारण सर्व भाषिक आणि अभाषिक विषयांच्या अध्ययन-अध्यापनात यामुळे समन्वय घडून येत नाही. आणि असा समन्वय नसल्यामुळे पुढे विद्यार्थ्यांना विविध बौध्दिक व आकलनस्तरावरील समस्यांना सामोरे जावे लागते. कारण प्रत्येक स्तरावर शैक्षणिक उद्दिष्टे बदलतात त्याचबरोबर भाषा शिक्षणाचे स्वरूपही बदलत जाते. यासाठी 'अभ्यासक्रमांतर्गत भाषा' या संकल्पनेचा शालेय स्तरावर मॉडेल म्हणून उपयोग केला तर निश्चितच सर्व विषयांमध्ये समन्वय घडून अध्ययनाची प्रक्रिया सुलभ घडून येईल.

# ९. शिक्षक प्रशिक्षण गुणवत्ता विकासासंदर्भात चिकित्सक अध्ययन

शिक्षण हया संकल्पनेत शिक्षण प्रशिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. शिक्षक हा शिक्षणप्रणालीचा कणा आहे. हा कणा जेवढा मजबूत तेवढी शिक्षण प्रणालीही मजबूत बनते. आजच्या शिक्षक प्रणालीत शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात माहिती कोंबणारा एक घटक झाला आहे पण एवढेच शिक्षकाचे कार्य नाही. प्राचीन काळी आध्यात्मिक पिता ही शिक्षकाची भूमिका शिक्षणाने मान्य केलेली आहे. आधुनिक काळात तत्त्वज्ञ I, मार्गदर्शक, उपदेशक ही भूमिका मान्य करण्यात आली आहे. पण त्यासाठी शिक्षकाचे शील, व्यक्तिमत्व, प्रेम, आदरभाव, बौध्दिक पात्रता आदराला पात्र ठरते. हयासाठी सर्वप्रथम वरील बाबींचे विकसन शिक्षणाच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे. शिक्षक म्हणजे केवळ शिक्षण देणारे उपकरण ही आधुनिक भूमिका बदलणे नितांत गरजेचे आहे. मानव संस्कृतीचा नैतिक दर्जा किंवा सदाचाराची झळाळी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वास प्रदान करावयाची असेल तर विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांबद्दल पूज्यभाव व आदरभाव निर्माण व्हायला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्ररित्या प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेण्याचे सामर्थ्य निर्माण करण्याबाबत शिक्षक सदेव तत्पर असायला पाहिजेतो केवळ ध्वनिमुद्रक नको. शिक्षकाला स्वतःची चिकित्सा तर करता यावीच पण त्याचसोबत विद्यार्थ्यांमध्ये ही त्याने स्वयंचिकित्सेची क्षमता निर्माण करावी. कारण व्दसल जमंबीमत बंदे नचचसल ं बसमंअम टपेपवद.

आज शिक्षणामधून व्यक्तिविकासाचे ध्येय साध्य करण्याचे प्रयत्न सुरू असले तरी हा विकास अत्यंत वरवरचा असा विकास आहे. आज वारंवार शिक्षणपध्दती, पाठ्यपुस्तके यांत परिवर्तन होत आहे. वास्तविक पाहता शिक्षणाने लवचिक असायला पाहिजे याबाबत शिक्षणतज्ज्ञांनी अत्यंत जागरूक असायला पाहिजे. नेमकी हीच बाब आजच शिक्षक प्रशिक्षणातून दिसून येत नाही.

शिक्षक-प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि विकास या संदर्भात विचार करताना काही मार्गदर्शक तत्वांचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते.

**मार्गदर्शक तत्वे :-**

(१) शिक्षक प्रशिक्षणाचा संबंध व्यक्तिमत्व विकास संकल्पनेशी जोडणे.

(२) प्रशिक्षणाचा दृष्टिकोन निर्धारित करणे.

(३) प्रशिक्षणांतर्गत असलेल्या ज्ञानाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी जोडणे.

(४) प्रशिक्षणातील शाष्वत तत्वांचे निर्धारण करणे.

N.F.C. २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी अभ्यासक्रमाची व्याप्ती वाढवून त्यात ज्ञानाच्या, कामाच्या आणि कारागिरीच्या विविध समृध्द परंपरा आणि वारसा अंतर्भूत करायचे भान ठेवायला हवे. आज अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणामुळे लोकांमधील ज्ञान, परंपरा व कौशल्ये यांना धोका निर्माण झाला आहे. हया परिस्थितीत मुलांमधील सर्जनशीलता, नैतिकता आणि आत्मसन्मान यांची जोपासना व विकास करण्याच्या कार्याला व कृतीला शिक्षक प्रशिक्षणात महत्व दिले गेले पाहिजे. शिक्षक प्रशिक्षणाच्या संदर्भात विचार केल्यास खालील मुद्यांना अनुसरून हया सर्व बाबींचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

शिक्षक-प्रशिक्षण गुणवत्ता विकास संदर्भातील काही आवश्यक बाबी :-

- Education for self control.
- व्यक्तिमत्व विकासाकरिता शिस्त.
- मूल्य जोपासना
- नेतृत्व, नियोजन
- राष्ट्रीय शिक्षणाचा विचार
- पालकांचे शिक्षण.
- सांस्कृतिक शिक्षण.

**शिक्षक प्रशिक्षण गुणवत्तेचा संदर्भ :-**

शिक्षक प्रशिक्षणातील गुणवत्ता हा संदर्भ आपल्याला नाकारून चालत नाही. गुणवत्तेचे प्रशिक्षण उपलब्ध होणे हे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षक प्रशिक्षण गुणवत्तेचा संदर्भ आपण केवळ व्यवस्थेशी जोडून चालत नाही तर तो मानवी मन, बुध्दी, व मानवीय घटकांशी जोडावा लागेल. हयाला अनुसरून मनावरील संस्कारामुळे मानवीय मनाची होणारी जडण, घडण, बुध्दीतील निर्णयक्षमता, बौध्दिक घटकांचा विकास, मानवी घटकांचा विकास, आध्यात्मिक व नैतिक विकास हा गुणवत्तेचा संदर्भ ठरतो. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयातील भौतिक साधनांपेक्षा महाविद्यालयाचे Vision Mession त्यानुसार महाविद्यालयातील प्राध्यापक, विविध घटकांशी होणा-या आंतरक्रिया हे गुणवत्तेचे संदर्भ ठरतात. शिवाय प्रशिक्षणार्थींच्या विकासासाठी घेणा-या विषयांचा अंतर्भाव अध्ययन, अध्यापन पध्दती, शिक्षक-विद्यार्थी संबंध, शिस्तीच्या संकल्पना,

वापरण्यात येणारी पाठ्यपुस्तके, महाविद्यालयीन वातावरण, महाविद्यालयीन कामकाजाची उद्दिष्टे ह्या बाबी गुणवत्तेचे महत्वाचे संदर्भ व निकष असतात.

## शिक्षक प्रशिक्षण गुणवत्तेचे सामाजिक संदर्भ -

आज शिक्षण प्रशिक्षणाचा विचार करता अनेक आव्हाने दिसून येतात. आर्थिक, सामाजिक अशा अनेक आव्हानांना शिक्षक प्रशिक्षणास सामोरे जावे लागत आहे. त्यातील महत्वाचे आव्हान म्हणजे ढासळलेली नीतिमत्ता, अशांतता, धार्मिक विव्देश, सांप्रदायिकता, जातीयता इत्यादी. व्यक्ती जीवनात अशांतता, तणाव, संघर्ष उत्पन्न झालेले आहे. याचा परिणाम समाजावर व पर्यायाने राष्ट्रावर होत आहे. प्रशिक्षण हे बाजारू बनत असून ते एक वस्तू झाली आहे. प्रशिक्षणात क्रयशक्ती आली आहे. ज्ञानाचा, शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करण्याची पात्रता मात्र अद्यापही विकसित झालेली नाही. ही बाब केवळ पुस्तकी ज्ञानातून साध्य होणार नसून प्रशिक्षणातूनच ही योग्यता निर्माण व्हायला हवी. आणि ह्यासाठी सर्वत्र इंग्रजी संकल्पनात्मक शब्दांसाठी मराठी पर्यायही द्यावेत. Re-education of intellect in right values of life or realing the mind जीम उपदक ह्या बाबी आवश्यक आहेत. ह्या सर्व बाबींचा विचार केला तर सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी योग्य प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शिक्षण प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणामध्ये पुढील गुणांची रूजवणूक व्हायला हवी.

- The Practice of what is right and Proper as indicate in the Scripture.

- Living the ideals that have been intellectually comprehended during the studies.
- A Spirit of self Sacrifice
- Control of Sense
- Tranquility of mind.
- Practice of Concentration
- During ones duty towards humanity.

खरा शिक्षक हा केवळ Instruction चा वापर करणार नाही तर खरा शिक्षक हा विद्यार्थ्यांना ऊनपकम करतो. ही पात्रता शिक्षण प्रशिक्षणातून शिक्षकामध्ये यायला हवी. हयासाठी त्याला आपल्या व्यक्तिमत्वात समायोजनक्षमता वृध्दिंगत करावी लागते. तेंव्हाच काही परिवर्तनाची अपेक्षा करू शकतो शिक्षकाचे Work load हे Joy load मध्ये परिवर्तीत करण्याची क्षमता प्रशिक्षणातून विकसित व्हायला पाहिजे. शिक्षकाची भूमिका ही शाळा व समाज यातील Bridge ची असते. शिवाय तो पालक व विद्यार्थी यातील दुवा असतो या भूमिकांबाबतची जाणीव जागृती ही शिक्षण प्रशिक्षणातून व्हायला हवी. शिक्षक जर मूल्याचरण करणारा आवश्यक आहे तर तसे संस्कार प्रशिक्षणातून रूजायला हवे. शिक्षक प्रशिक्षणात शिक्षकाच्या हया मूल्याबाबत **Knowledge, Skill, attitude** विकसित करणारा अभ्यासक्रम हवा. विविध अध्ययन पध्दतीसोबतच आत्मनिरीक्षणाची पध्दती ही प्रशिक्षणात अनिवार्य करण्यात यावी. शिक्षकाची भूमिका आजही **worked as a team, Serving as a Preachers** आणि **nourshing the culture** ही आहे. या बाबींचे संस्कार प्रशिक्षणातून व्हावे.

शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास व त्यातील आदर्श यांचा अभ्यास प्रशिक्षणांतर्गत देता येईल. शिक्षक हा Pureliving चे उदाहरण बनायला हवा. शिक्षकाची प्रत्येक कृती महत्त्वाची असते. आणि म्हणून जीवनाच्या प्रत्येक क्षणात आध्यात्मिकता व सांस्कृतिकता यांचे आचरण करण्याचे प्रशिक्षण मिळायला हवे. शिक्षणातून व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रीय दृष्टिकोन, सांस्कृतिक दृष्टिकोन रूजविणारा शिक्षक हा महत्त्वाचा घटक आहे. हया दृष्टिकोनातून त्याला भारतीय संस्कृती, व्यवस्था, समाजव्यवस्था, भारतीय संविधानात्मक मूल्ये हयाची जाण आवश्यक असून तो आपल्या व्यवसायाप्रती समर्पित वृत्तीचा हवा. मानवी संबंधाबद्दल त्याला जाण हवी. हया सर्वांसाठी Educational for Sustainable development हा विषय अभ्यासक्रमात असावा. सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षणातसुध्दा हयाचा अंतर्भाव व्हावा- कारण शिक्षक creative, innovative असणे आवश्यक आहे.


"The reward of true teacher is not aterm of money. But the fact that he has moulded and shaped, trained let act in society student who will contribute to their glorious history of their communior nation." हा शिक्षक प्रशिक्षणातील मूळ संस्कार आहे.

शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्ता विकसनासाठी कार्यक्रमाची एक निश्चित रूपरेषा ठरविणे आवश्यक असते. त्यादृष्टीने खालीलप्रमाणे गुणवत्ता विकास कार्यक्रमाचे

- निर्धारित घटक विचारात घेणे महत्वाचे ठरते.
- गुणवत्ता विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे ठरविणे.

- सद्यःपरिस्थितील गुणवत्तेचे मूल्यांकन करणे.
- विकासात्मक गरजांची खात्री करून घेणे.
- मनुष्यबळाचा प्राधान्याने विचार करणे.
- गुणवत्ता विकास कार्यक्रमाचे योग्य नियोजन करणे.
- प्रशिक्षण कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे.

**शिक्षक प्रशिक्षण गुणवत्ता विकास कार्यक्रम :-**




**गुणवत्ता विकसन कार्यक्रमाची फलनिष्पत्ती -**

- शिक्षकांमध्ये शिक्षणाच्या गुणवत्तेविषयी जागरूकता निर्माण होते.
- नवनवीन संशोधन व प्रचलित अध्यापन पध्दतीतील नवोपक्रमाप्रमाणे स्वतःमध्ये बदल घडवून आणणे शिक्षकांना सहज साध्य होते.

- ज्ञानाच्या बाबतीत अद्ययावतपणा आणण्यास शिक्षकांना मदत होते
- सकारात्मक बदलाला प्रतिसाद देण्याचे प्रोत्साहन मिळते
- वाढत्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास शिक्षक सक्षम बनतो.
- वाढत्या विद्यार्थी संख्येला हाताळण्याची क्षमता विकसित होते.
- प्रत्येक पातळीवर पर्यवेक्षण व नेतृत्वामध्ये सुधारणा करणे शक्य होते.
- उपलब्ध आर्थिक संसाधनाच्या कमतरतेचा प्रश्न हाताळण्याची क्षमता विकसित होते.

तात्पर्य :-

शिक्षणातून कार्यकुशलता, कर्मकुशलता जर निर्माण व्हावयाची असेल तर मन व बुध्दी यांच्यातील समन्वय हा शिक्षणाच्या माध्यमातून साध्य व्हायला पाहिजे. त्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविणे आवश्यक ठरते.

❖ ❖ ❖

# १०. डिजिटल शिक्षण व पारंपारिक शिक्षण

भारतातील मोठमोठया शहरांमधून आजची शिक्षणप्रणाली ब-याच प्रमाणात आधुनिकीकृत होत आहे. ज्यामुळे डिजीटलीकरण होण्यासाठी एक नवीन मार्ग तयार होतो आहे. उदा. मोबाइल फोन, इंटरनेट, मोबाईल ॲप्लीकेशन, टॅबलेट, लॅपटॉप आणि इतर आधुनिक उपकरणांचा विकास यामुळे संपूर्ण जगातील जास्तीत जास्त गोष्टी डिजिटल होत आहेत.

डिजिटल शिक्षण काही आंतरराष्ट्रीय शाळांसोबतच भारतातील पारंपारिक शिक्षण प्रणालीमध्ये सुध्दा आपले स्थान निर्माण करते आहे. सोबतच पारंपारिक वर्ग प्रशिक्षणाचे स्थान घेते आहे.

**उद्‌देश :-**

१) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम घटकांविषयी आवड निर्माण करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये मनोरंजनात्मकरित्या सूचना सप्रेषित करणे

३) शिकण्याच्या गतीमध्ये वाढ करणे.

४) विद्यार्थ्यांना अधिक क्रियाशील बनविणे.

५) कठीण विषय सोपा करून शिकविणे.

६) अमूर्त संकल्पनेला मूर्त स्वरूप देणे.

७) विद्यार्थ्यांच्या निरीक्षण शक्तींचा विकास करणे.

८) तीव्र मंदबुध्दी विद्यार्थ्यांना योग्यतेनुसार शैक्षणिक अनुभव देणे.

**डिजिटल शिक्षण व वर्गशिक्षण यामधील मूलभूत अंतर :-**

सद्यस्थितीचा विचार केला तर असे निदर्शनास येते की, आधीच्या काळी वर्गातील शिक्षण, प्रशिक्षण पाठ्यपुस्तकांव्दारे दिले जात असे. शिक्षक अध्यापनासाठी फलकाचा वापर करीत. विद्यार्थी आपल्या वहीत

त्याची नोंद घेत असत. शिकण्यासाठी विद्यार्थी पूर्णपणे शिक्षकांवर अवलंबून असे. आणि लेखन, वाचन व पाठांतर (स्मरण) यावर जास्तीत जास्त शाळांमधून खडू-फळ्याचा उपयोग नाहीच्या बरोबरच आहे.

कारण आजकाल डिजिटल शिक्षण जसे-पीपीटी, व्हिडीयो, ई-लर्निंग पध्दती, अभ्यासविषयक दिग्दर्शन, ऑनलाइन प्रशिक्षण आणि इतर डिजिटल पध्दती यांचा उपयोग करून वर्गातील शिक्षण हे अत्याधिक संवादात्मक होऊ लागले आहे.

**डिजिटल शिक्षणाचे विद्यार्थ्यांना होणारे लाभ :-**

**(१) संवादात्मक :**

डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक शालेय स्तरावरील शिक्षण हे अधिक मजेशीर आणि संवादात्मक झालेले आहे. विद्यार्थी यावर जास्त लक्ष केंद्रीत करू लागले. विद्यार्थी केवळ त्याचा वापर श्रवणासाठी न करता प्रत्येक माहिती स्क्रीन वर बघूपण शकतात. ज्यामुळे अध्ययन क्षमतेत वाढ होण्यास मदत होते. ध्वनी आणि चित्रे यांच्या माध्यमातून विद्यार्थी सहजपणे अध्ययन करू शकतात.

**विवरणावर लक्ष केंद्रीत करणे :-**

ऑनलाईन प्रस्तुतीकरण च्या माध्यमातून व्यावहारिक दृष्टीकोणातून आवश्यक साभुग्री विद्यार्थ्यांना विवरण करण्यावर आणखी जास्त लक्ष केंद्रीत करण्यास मदत करीत असते. ज्यामुळे विद्यार्थी आपल्या क्षमतेनुसार, पध्दतीनुसार कार्य पूर्ण करण्यास सक्षम होतात.

**कमी कालावधी :**

पेन व पेन्सील शिवाय बॅब, लॅपटॉप, नोटपॅडचा उपयोग करून त्याच्या मदतीने विद्यार्थी आपले कार्य कमीतकमी वेळेत, कालावधी मध्ये पूर्ण करू शकतात.

**(शब्दसंपदा) शब्दावली :**

सकीय ऑनलाईन स्क्रीनच्या मदतीने विद्यार्थी आपल्या भाषिक क्षमतेत सुधारणा घडवून आणू शकतात. ई-बुक किंवा ऑनलाईन अध्ययन सामुग्रीच्या व्दारे नवीन नवीन घब्द शिकता येतात. आणि आपली घब्दसंपदा वाढवितात.

**स्वःक्षमतेने अध्ययन :**

काही वेळा विदयार्थी आपल्या शिक्षकांकडून वर्गात शिकतांना शिक्षकांना प्रश्न विचारण्यास मागेपुढे करतात, घाबरतात. पण डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून जरी एकावेळी काही लक्षात आले नसेल तरी आपली समस्या सोडविण्यासाठी तो रिकॉर्डिंग सत्रात सामील होऊ घकतो. याचाच अर्थ तंत्रज्ञान विद्यार्थ्याला त्याच्या योग्यतेनुसार शिकण्यास मदत करते.

**उपयोगकर्त्यास अनुकूल :**

डिजिटल शिक्षणाचा सर्वात महत्वाचा गूण म्हणजे हे उपयोग करणा-यास अनुकूल असते. विद्यार्थी कुठेही असला तरी तो पाठ्यक्रम सहजरित्या वाचून पूर्ण करू घकतो. एवढेच नव्हे तर प्रवासादरम्यान तो पाठ्यक्रमाचे वाचन करू घकतो. एवढेच नव्हेतर विद्यार्थी काही कारणास्तव वर्गात उपस्थित न राहू घकला तर घाळेच्या वेबसाईट वरून वर्गात शिकविलेला भाग, विविध अध्ययन सामुग्री व फाईल डाऊनलोड करू घकतो.

**स्वतः शिकणे :**

याव्यतिरिक्त आजकाल ऑनलाईन अध्ययन सामुग्री सहजपणे उपलब्ध होते. संपूर्ण शिक्षण प्रणाली जरी डिजिटल रूपात उपलब्ध नसली तरी विद्यार्थी आपल्या क्षमतांनुसार डिजिटल माहितीचा फायदा करून घेत

असतात. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकांशिवायसुध्दा आपल्या ज्ञानाभिवृध्दीसाठी. ज्ञान वृध्दिंगत करण्यासाठी विविध विषयांचे अध्ययन ऑनलाईन पध्दतीने करीत असतात.

**बाह्य मार्गदर्शन :-**

ऑनलाईन अध्ययनाच्या माध्यमातून विद्यार्थी अन्य मार्गदर्शकांचे व अन्य घटकांचे मार्गदर्शन प्राप्त करून आपले प्रश्न व समस्या सोडविण्यास डिजिटल शिक्षणाची मदत घेऊ शकतो.

डिजिटल शिक्षणाच्या तुलनेत शिक्षक आधारित शिक्षणाचा विचार केल्यास असे दिसून येते की, शिक्षक आधारित (पारंपारिक) शिक्षण हे व्यक्तिगत व समोरा-समोर दिले जाणारे शिक्षण आहे. हे शिक्षण विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अध्ययन सामुग्री, ज्ञान, माहिती देण्याची एक प्रभावी पध्दती आहे. आणि विशेष म्हणजे सर्वांना एकावेळी. एकच माहिती मिळू शकते.

**डिजिटल शिक्षणाचे तोटे :-**

डिजिटल शिक्षणाचे जसे फायदे आहेत तसे नुकसान, तोटे सुध्दा दिसून येतात. पारंपारिक शिक्षण व डिजिटल शिक्षणाचा तुलनात्मकदृष्टया विचार करताना त्यांचे तोटे सुध्दा लक्षात घेणे तेवढेच अपरिहार्य ठरते.

- डिजिटल शिक्षण हे अतिशय महागडे ठरते. आणि याच कारणामळे जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांमधून दिले जाणारे शिक्षण हे डिजिटल शिक्षण असते. मात्र नियमित शघाळेंच्या तुलनेत ते अत्याधिक महागडे असते.
- डिजिटल शिक्षणासाठी सुयोग्य व्यवस्थापन, प्रशासन आणि कठोर काटेकोर योजनांची आवश्यकता असते. तर पारंपारिक शिक्षणात सर्व एका निश्चित वेळेतच वेळापत्रकानुसार अध्ययन कार्य चालते.

- इंटरनेटवर कोणत्याही प्रश्नाचे उत्तर सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांची रचनात्मक क्षमता, सृजनशीलता, विचारक्षमतेला मर्यादा पडतात.
- विद्यार्थी आळशी बनतात. शिकण्याच्या वाईट सवयी मुलांमध्ये निर्माण होतात. अभ्यासाचे मूलभूत मार्ग विद्यार्थी विसरायला लागतात. एढेच नव्हे तर सर्वसाधारण समस्या आणि गृहकार्य (होमवर्क) सुध्दा विद्यार्थी नेट च्या मदतीने करू लागले आहेत.
- ऑनलाईन शिक्षणाचा अर्थ हा नव्हे की, आपले मूल केवळ अध्ययनासाठी नेट वर अवलंबून राहावे याअंतर्गत ब-याचशा गोष्टी अशा असतात ज्या मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने, वर्तनाच्या दृष्टीने योग्य नसतात. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचे फायदे व नुकसान दोन्ही दिसून येते. म्हणूनच विद्यार्थी जेंव्हा केंव्हा ऑनलाईन तंत्रज्ञानाचा वापर, उपयोग करीत असेल त्या त्या वेळी त्याच्या शिक्षक, पालकांनी त्यांना योग्य मार्गदर्शन, निर्देशन करणे अपेक्षित असते.

**शिक्षककेंद्रीत शिक्षणाचा विचार केल्यास याचेही काही तोटे दिसून येतात. जसे -**

- कधी-कधी विद्यार्थी-शिक्षक यांच्यात संवाद साधण्यात अडचणी निर्माण होऊ घकतात.
- व्याख्यानाची यशस्विता ही शिक्षकाच्या एकंदर व्यक्तिमत्व व त्याच्या प्रभावावर निर्भर करीत असते.
- विद्यार्थी तांत्रिक कौशल्य, क्षमता वाढविण्याऐवजी केवळ पाठांतर व स्मरण यावरच जास्त लक्ष केंद्रीत करतात.

- त्यामुळे वेळेचा अतिशय अपव्यय होतो.

डिजिटल शिक्षण व पारंपारिक शिक्षणात उपरोक्त फायदे व तोटे यांच्या अनुषंगाने मूलभूत फरक दिसून येत असला तरी आज सद्यस्थितीत अनेक शाळा, महाविद्यालयातून डिजिटल शिक्षणावर भर देतांना दिसून येतो. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, मुख्याध्यापक शिक्षक आणि तंत्रज्ञानातील विशेषज्ञ यांना शैक्षणिक आणि मूलभूत आवश्यकतांचा विचार करून निर्णय घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण डिजिटल शिक्षण हे विविध देशांना आपापसात जोडणा-या उपग्रहांपासून ते वर्गातील विद्यार्थ्यांकडून वापरण्यात येणा-या विविध साधने, उपकरणे यांची पडताळणी करीत असतो. तसेच त्याप्रकारचे शिक्षण शिक्षक, निर्माते, योजना राबविणारे, अभ्यासक्रम तयार करणारे तज्ज्ञ यांना विविध प्रणालीच्या भ्रामक कल्पनेतून, मुक्त करण्यास मदत करतात.

डिजिटल शिक्षणाला समर्पित करणारे शिक्षण हे अध्ययन, परीक्षा, मूल्यमापन यांच्या विश्लेषण करणा-या विविध तंत्राला प्रेरित करीत असते. ज्यामुळे विद्यार्थ्यांना आपले प्रश्न मांडण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ प्राप्त होते. जेव्हा विद्यार्थी जीवनातील वास्तविक समस्यांना तोंड देणे शिकतात त्यावेळी शिक्षण प्रक्रिया अमूर्त कमी व मूर्त स्वरूपात जास्त घडत असते. आणि प्रत्यक्ष जीवन परिस्थितीशी प्रासंगिक बनत जाते. याप्रकारे पाठांतर व स्मरण यावर आधारित शिक्षणाच्या विपरीत ही शिक्षण पध्दती असल्याचे दिसुन येते. तसेच डिजिटल शिक्षण हे सहअध्ययन पध्दतीने होते. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणातून यांमधील संवाद, सहयोग वाढवित असते. जरी ते एकमेकांपासून दूर असले तरी. म्हणूनच डिजिटल शिक्षण हे निरंतर, आजीवन शिक्षणाचे एक मॉडेल आहे. जे शिक्षणाच्या विविधांगी मार्गांना प्रशस्त करीत असते.

याचाच अर्थ विद्यार्थी, शिक्षक, तज्ज्ञ, विचारवंत यांच्यावर प्रभाव टाकण्याची क्षमता डिजिटल शिक्षणात असते. आणि ते देशातील शैक्षणिक व्यवस्थेसमोर येणारी आव्हाने काही प्रमाणात तरी कमी करण्यासाठी अधिक प्रभावी असे मार्ग उपलब्ध करून देण्यास समर्थ ठरते.

डिजिटल शिक्षणांतर्गत विविध उपकरणांची एक मोठी श्रृंखलाच समाविष्ट झालेली असते. जसे, डेस्कटॉप, कॉम्प्युटर्स, लॅपटॉप, मोबाईल फोन, स्मार्टफोन, टॅबलेट्स, प्रोजेक्टर्स, प्रिंटर्स, स्कॅनर्स, डिजिटल कॅमेरे आणि याप्रकारचे इतर उपकरणे. याविषयीची जागरूकता वाढविण्यासाठी आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी, अध्ययनातील रूची वृध्दिंगत करण्यासाठी या सर्व डिजिटल उपकरणांचा वापर कशा प्रकारे केला जाऊ शकतो याविषयी शिक्षक-विद्यार्थी यांमध्ये जागरूकता वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने न्छम्ब्व् ने सुध्दा शिक्षकांसाठी एक आईसीटी क्षमता विकसन कार्यक्रम तयार केलेला आहे.

डिजिटल शिक्षा सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक समर्थित शिक्षण व अध्यापनाच्या रूपाने परिभाषित केली जाते. जी स्वाभाविकरित्या क्रियात्मक असते. आणि जिचा मुख्य उद्‌देश विद्यार्थ्यांचे व्यक्तिगत अनुभव, अभ्यास आणि ज्ञानाच्या संदर्भात ज्ञाननिर्मित घटकांना प्रभावित करणे व विशेष माध्यमाच्या रूपाने त्यांना सेवा प्रदान करणे हे असते.

डिजिटल प्रशिक्षण ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यात इतरांना केवळ प्रशिक्षित करणे एवढेच पर्याप्त नसून त्यासोबतच नवनवीन माहिती अद्ययावत करणे तसेच नवीन विचारांशी परिचित असणे आवश्क ठरते.

अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने अध्यापन करते वेळी शिक्षक ज्या ज्या साधनसामुग्रीचा उपयोग करतात. ती सर्व अध्यापन साहित्य समजले जाते.

परंतु आधुनिक शिक्षण प्रणालीत डिजिटल शिक्षणासंदर्भात विचार केल्यास डिजिटायझेशन मुळे अनेक नवनवीन तंत्रज्ञान निर्माण झाले. ज्याच्या सहाय्याने अध्ययन-अध्यापन अधिक रोचक आणि प्रभावशाली बनविता येऊ लागले. डिजिटल शिक्षणाने घेतलेले ज्ञान केवळ विद्यार्थ्यांमध्ये उत्साहच निर्माण करतो असे नव्हे तर आत्मसात केलेले ज्ञान अनंत काळापर्यंत आपल्या स्मरणात ठेऊ शकतो. शिवाय शिक्षक सुध्दा आपल्या अध्ययनाप्रति अतिशय उत्साही असतो. परिणामस्वरूप पारंपारिक शिक्षणाच्या तुलनेत डिजिटल वर्गातील वातावरण सदैव सकारात्मक दिसून येते. आज जे शिक्षक डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून अध्यापन करतात. ते विद्यार्थ्यांसाठी आदर्श बनतात. व त्यांचेच शिक्षण हे आदर्श शिक्षण समजले जाते, की जे शिक्षक डीजिटल अशैक्षणिक साहित्याच्या व्दारे अध्यापन करतात.

पारंपारिक शिक्षणापेक्षा डिजिटल शिक्षण हे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रीत करते. तसेच विद्यार्थ्यांना उचित प्रेरणा निर्माण करते. म्हणूनच वर्तमान शिक्षणांतर्गत अध्यापनात नाविन्यता आणण्यासाठी डिजिटल शिक्षणाचा प्रयोग करणे शिक्षकांसाठी अनिवार्य ठरते.

**तात्पर्य :-**

निःसंदेह पारंपरिक शिक्षणाच्या तुलनेत डिजीटल शिक्षण हे अध्ययन, अध्यापनास एक नवीन दिशा देण्याचे काम करते. कोणत्याही

- विषयाला मूळ रूपात शिकणे व तो विषय समजणे यासाठी सहाय्यक ठरते.
- प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांना ज्ञान प्राप्त करता येते.
- शिक्षकांचा वेळ आणि ऊर्जा या दोहोंची बचत होते.
- भाषा विषयक समस्या दूर करण्यास मदत होते.

- अध्यापनात रूची निर्माण झाल्याने विद्यार्थी अधिक सक्रीय बनतात.
- संशोधन, विविध उपक्रम यात उस्फूर्तपणे विद्यार्थी सहभागी होतात.
- विद्यार्थी नैसर्गिक आणि कृत्रिम वस्तुंमधील तुलनात्मक फरक समजू घकतात.

याचाच अर्थ पारंपारिक शिक्षणाच्या तुलनेत डिजिटल शिक्षण हे एक प्रेरणादायी शिक्षणपध्दती आणि अनुभवयुक्त शिक्षणपध्दती आहे. ज्याव्दारे विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीत वाढ होवून विद्यार्थी शिक्षणाच्या माध्यमातून विविध जीवनकौशल्ये प्राप्त करू शकतो.

❖ ❖ ❖

# ११. ज्ञानरचनावाद : अध्ययन, अध्यापन व शिक्षकाची भूमिका

सक्रिय अनुभव घेणा-या प्रक्रियेतून नवीन ज्ञाननिर्मिती करतात, यावर ज्ञानरचनावादाचा विश्वास आहे, शिक्षक, शैक्षणिक साहित्य, स्वानुभव यातून विद्यार्थ्यांना ज्ञाननिर्मितीसाठी आधारभूत माहिती प्राप्त होत असते. त्यातून विद्यार्थी रचना, ज्ञाननिर्मिती आणि अर्थनिर्वचन करतात.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मध्ये ज्ञानरचनावादी भूमिका मांडण्यात आली. सॉक्रेटिस व त्यांचे शिष्य यांच्या वैचारिक चर्चेत ज्ञानरचनावादाची बीजे आढळतात. प्रश्नोत्तरातून नवज्ञानाची निर्मिती हे सॉक्रेटिक पध्दतीचे वैशिष्टये आहे. "गिम्बाटिस्का विको" यांना ज्ञानरचनावादी तत्वज्ञ म्हणून ओळखले जाते. ज्ञानरचनावादाच्या विकासात डयुई, पिआजे, ब्रुनर, आसुबेल, विगोत्सकी, ग्लेसरफेल्ड यांचे योगदान महत्वाचे आहे.

**कोणत्याही दडपणाशिवाय विद्यार्थी कसे अध्ययन करतील हे** पाहणे हा ज्ञानरचनावादाचा मूळ गाभा आहे. ज्ञानरचनावादासाठी लॅटीन शब्द (Construct) हे तत्सम क्रियापद असून त्याचा अर्थ मांडणे. (to arrange) रचना करणे. असा आहे. यापासून ज्ञानाची रचना प्रक्रिया म्हणजे ज्ञानरचनावाद. (Construtivism) होय. ज्ञानाची रचना करण्यासाठी प्रक्रिया कार्यान्वित ठेवणे हा ज्ञानरचनावादाचा पाया आहे.

एकाधिकारशाहीला किंवा शिक्षक केंद्रित अध्यापन पध्दतीला विरोध म्हणून ज्ञानरचनावादाचा उगम झाला. वर्तनवादातील चेतक -

प्रामुख्याने S R theory ला कडाडून विरोध करणारा ज्ञानरचनावाद ३ ज्ञानाच्या स्थानांतरणावर आणि ज्ञानाच्या संरचनेवर भर देतो.

**ज्ञानरचनावादाचे प्रकार**

- १ बोधात्मक ज्ञानरचनावाद
- २ समूळ ज्ञानरचनावाद
- ३ सामाजिक ज्ञानरचनावाद

**१) बोधात्मक ज्ञानरचनावाद :-**

प्राप्त माहितीवर प्रक्रिया करणे एवढीच बोधात्मक ज्ञानरचनावाद होय. फक्त माहिती मिळविणे एवढीच बाब यात अंतर्भूत नाही तर प्राप्त माहितीवर स्वत:च्या पूर्वानुभवाच्या आधारावर विशिष्ट प्रक्रिया करणे ही बाब यात अंतर्भूत आहे. ब्रुनरने मांडलेली माहिती प्रक्रिया उपत्ती हे बोधात्मक ज्ञानरचनावादाचे उत्तम उदाहरण आहे.

**२) सामाजिक ज्ञानरचनावाद :-**

या प्रकारामध्ये सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक आंतरक्रिया हा माहितीचा स्त्रोत असतो. प्रत्येक व्यक्ती अवगत असलेल्या भाषा आणि सामाजिक स्थिती यांच्यातील आंतरक्रियांच्या माध्यमातून ज्ञानरचना करीत असतो.

**३) समूळ ज्ञानरचनावाद :-**

ज्ञानरचनावादाच्या या प्रकारात ग्लेसरुफेल्ड यांचे कार्य महत्त्वपूर्ण असून त्यांच्या मते बोधात्मक रचनावाद एका टोकास मांडला तर विरुध्द टोकास समूळ रचनावाद व मध्यभागी सामाजिक रचनावादाचे स्थान आहे.

१) ज्ञानाची रचना म्हणजे अध्ययनप्रक्रिया होय.

२) विद्यार्थी स्वत : ज्ञानाची रचना करतो.

३) पूर्वानुभवाचा अर्थ लावणे म्हणजे अध्ययन.

४) पूर्वानुभवाद्वारे विद्यार्थी ज्ञानरचना करतात.

५) वातावरणाशी होणाऱ्या आंतरप्रक्रियांमधून विद्यार्थी ज्ञानरचना करतात.

जेव्हा विद्यार्थ्यांना जीवनाशी निगडीत प्रसंग, प्रक्रिया, व्यवहार यांवर आधारित संधी मिळतील तेव्हा त्या आधारावर विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने ज्ञाननिर्मिती करुन घेतील. वरील गृहीतकांव्यतिरिक्त मोरेल यांनी खालील गृहीतके सांगितलेली आहेत.

१) अनुभवातून ज्ञानरचना होते.

२) अध्ययनात बाहय जगाचे वैयक्तिक पातळीवर अर्थनिर्वचन केले जाते.

३) अनुभवास अर्थ देण्याच्या सक्रिय प्रक्रियेतून संकल्पना अथवा संबोध निर्मिती होय.

४) सहभागी अध्ययनात प्रत्येकाने लावलेल्या अर्थाबाबत चर्चा घडून येते. विविध दृष्टिकोनांची देवाणघेवाण होते. त्यातून आंतरिक भूमिका बदलता येतात. त्याचवेळी संकल्पना स्पष्ट बनतात.

**ज्ञानरचनावादी अध्ययनाची वैशिष्टये :-**

१) अध्ययन ही स्वीकारण्याची निष्क्रिय प्रक्रिया नसुन अर्थपूर्ण समस्याविमोचन व नवीन अर्थनिर्मितीची सक्रिय अर्थप्रक्रिया आहे.

२) नवीन ज्ञाननिर्मिती पूर्वज्ञानावर अवलंबून असते.

३) कधी-कधी नवीन माहितीचा अर्थ समजण्यास पूर्वज्ञानाचा अडथळा येतो.

४) अध्ययन म्हणजे पूर्वप्रस्थापित संबोध आणि संकल्पनांची पुनर्मांडणी होय.

५) आंतरक्रियेमुळे ज्ञाननिर्मितीस फायदा होतो.

६) नियोजनपूर्वक निश्चित केलेल्या अध्ययनपूर्तीच्या संदर्भ चौकटीत अर्थपूर्ण, अध्यापन घडून येते.

७) ज्ञाननिर्मितीसाठी अध्ययन वातावरण आधारदायी असावी लागते.

**ज्ञानरचनावादामुळे वर्ग प्रक्रियेतून खालील अध्ययन घडून येते.**

१) **समृध्दी आंतरक्रिया** : दिलेल्या संदर्भ चौकटीच्या अधीन राहून विविधांगी माहितीतून सामाजिक अर्थ शोधणे.

२) **कल्पनांची पुर्नमांडणी** : अनेकजण आपापल्या दृष्टिकोनातून विचार करतात. त्यामुळे साहजिकच अनेक विश्वकल्पनांची निर्मिती होते, कल्पनानिर्मितीत व्यक्तीनिष्ठता आढळते. या सर्व कल्पनांची जुळणी करणे या त महत्वाचे ठरते.

३) **बुध्दिमंथन** : विद्यार्थ्यांच्या बुध्दीस जास्तीत जास्त चालना देण्याचे कार्य केले जाते.

४) **सामाजिक समन्वय** : शिक्षक आणि विद्यार्थी, विद्यार्थी आणि विद्यार्थी यांच्या परस्परसंबंधातून अध्ययन निर्मिती होते. विद्यार्थ्यांकडे हेतूशिवाय खूप ज्ञान असतो ते इतरांना देण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो.

**ज्ञानेंद्रियापासून होणारे ज्ञान : -**

१) **सर्वकषता :-** जे काही सांगितले त्याचा भाषिक आशय व भाषा समजणे.

२) **संदर्भ :-** संज्ञा अथवा संकल्पना कशाशी संबंधित आहेत हे लक्षात घेणे.

३) **ज्ञानेंद्रियांपासून होणारे ज्ञान :-** कशाला विधान समजावे, विधान कशाचे ठरवावे, सत्य छाननी कशी करावी यांचे ज्ञान.

४) **संबंध व महत्व :-** विविध वस्तू अथवा संकल्पना यात परस्पसंबंधातून ज्ञानाचे जाळे विणणे या संकल्पनेतून विविध बाबींच्या संदर्भीय संबंधाचे काय महत्त्व आहे यांचे आकलन करुन घेणे.

वरीलप्रमाणे अध्यासक्रम ते वर्गाध्यापन या सर्वांत ज्ञानरचनावादाचा अवलंब केल्याने मूल्यमापनातही बदल अपेक्षित आहेत. त्या बदलांनुसार विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी व सुविधा तसेच साहित्य पुरविल्यास विद्यार्थी स्वत : ज्ञाननिर्मिती करु शकतात.

**अध्ययन - अध्यापन**

शैक्षणिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील अध्यापन पध्दती तंत्रे, उपक्रम, शैक्षणिक साधने, यांचा एकत्रित स्वरुपात परिणामकारक वापर करण्याचे शिक्षकांचे कौशल्य म्हणजे अध्ययन - अध्यापन कृती होय. **शाळेत आणि परिसरात ज्या ज्या**

**विविध घटकांशी विद्यार्थ्यांची आंतरक्रिया घडून त्यांचे शिक्षण होते त्या सर्व संबंधित घटकांना आणि त्या सर्व आंतरक्रियांना अध्ययन - अध्यापन कृती म्हणता येईल.** या सर्व अध्ययन-अध्यापन कृती पार पाडण्यासाठी शिक्षक हा उत्तम अध्ययन-अध्यापन कृति - व्यवस्थापक असला पाहिजे. त्यासाठी त्याच्यामध्ये पाठयांशाचे संपूर्ण ज्ञान, योग्य अध्यापन पध्दतीची जाण, सुस्पष्टता, प्रश्नांचा संग्रह, विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग घेण्याची क्षमता, सुयोग्य शैक्षणिक साधनांची निवड, अनुरुप मूल्यमापन तंत्राची निवड अशा अनेकविध बाबी असणे अपेक्षित आहेत.

शिक्षण प्रक्रियेचा अनिवार्य व अपरिहार्य घटक असणारा शिक्षक हा साहजिकच प्रगत शैक्षणिक उपक्रमांसाठी अत्यंत महत्वाचा दुवा ठरणार आहे. पूर्वी शिक्षक स्वत :च सर्व काही शिकवून मोकळे होता, आज मात्र शिक्षकाने विद्यार्थ्यांना सर्व काही आयतेच न सांगता त्यांना विचार करावयास लावावा व स्वयंशिक्षणास प्रवृत्त करावे असे मानले जाते. आजच्या शिक्षकांची जबाबदारी वाढलेली आहे, विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी प्रोत्साहन देत, त्यात अवाजवी हस्तक्षेप न करता योग्य ते मार्गदर्शन करणे, शिक्षकांकडून अपेक्षित आहे. त्यामुळे आजच्या शिक्षकांसाठी शिक्षणविषयक नवा दृष्टिकोन व नवीन पध्दती हे एक नवे आव्हान आहे. विद्यार्थ्यांचे अध्ययन यशस्वीरितीने घडून येण्यासाठी शिक्षकांमध्ये सखोल आशयज्ञान, उत्तम अध्यापन कौशल्य, योजकता, उपक्रमशीलता, प्रायोगिक दृष्टी अशा अनेक गुणांची खूप आवश्यकता आहे.

**ज्ञानरचनावादी शिक्षकांची वैशिष्टये : -**

१) **व्यक्तिभेदाचा आदर** : प्रत्येक मूल हे इतरांपेक्षा वेगळे आहे. त्याची स्वत: ची वेगळी ओळख आहे, त्याची आकलन-शक्ती, अध्ययनास लागणारा वेळ, सामाजिक स्थिती ही इतरांपेक्षा भिन्न आहे, हे ज्ञानरचनावादी शिक्षकांने जाणून घेणे आवश्यक आहे. ही भावना विद्यार्थ्यांच्या संदर्भात शिक्षकाने जोपासल्यास त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होणार नाही, तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.

२) **बहुविध बुध्दिमत्तेचा आदर** : परीक्षेतील यश-अपयश आणि त्यास दिले गेलेले अवास्तव महत्त्व हे विद्यार्थी ताणतणावास बळी पडण्यामागचे प्रमुख कारण आहे. प्रथम क्रमांक मिळविलेला विद्यार्थीच बुध्दिमान हा समज अत्यंत चुकीचा आहे. परीक्षेत यश मिळविणारा विद्यार्थी तशीच यशस्वी चमक मैदानावर दाखवेलच हे निश्चितपणे सांगता येत नाही. कारण प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये काही ना काही गुणवैशिष्टये असतातच. त्यामुळे हॉवर्ड गार्डनर यांनी मांडलेल्या बहुविध बुध्दिमत्तेच्या संकल्पनेची जाणीव ज्ञानरचनावादी शिक्षकाने ठेवली पाहिजे तसेच विद्यार्थ्यांच्या आवडीच्या क्षेत्रात तो अव्वलच असेल ही भावना विद्यार्थ्यांमध्ये वाढीस लावली पाहिजे.

३) **सकारात्मक प्रबलन** : वर्ग अध्यापनाच्या वेळी विद्यार्थ्यांच्या चुकीच्या उत्तरास शिक्षकाकडून नकारात्मक प्रतिसाद दिला जातो. त्यामुळे पुढच्या वेळी उत्तर देण्यास विद्यार्थी धजवत नाही. आपल्याला काहीच येत नाही ही भावना त्याच्यामध्ये दृढ होते आणि ताणतनावास सुरुवात होते.त्याउलट शिक्षकांने सकारात्मक

प्रबलन देत विद्यार्थ्यांच्या नकळत चूक दुरुस्त करुन घेणे अपेक्षित आहे.

४) **मानसिक आधार** : कॉरेन हॉर्ने, यांच्या मते व्यक्ती असाहायतेतून मनाने खचते आणि निराधाराच्या भावनेतून आत्महत्येकडे वळते ही बाब लक्षात घेऊ कुटूंबानंतर जास्तीत जास्त वेळ शाळेत घालविणा-या विद्यार्थ्यांना त्यातल्या त्याल अपयशी ठरविलेल्या विद्यार्थ्यांना मानसिक आधाराची गरज असते. ज्ञानरचनावादी शिक्षक हा विद्यार्थ्यांचा पालक असतो असा पालक जो त्यांना मार्ग दाखवितो, मार्गावर चालण्यासाठी प्रेरणा देतो, विद्यार्थी अपयशी ठरला तर त्याला मानसिक आधार देउन पुन्हा चालण्यास प्रेरित करतो.

५) **परीक्षा पध्दती** : पारंपारिक परीक्षा पध्दती ही स्पर्धा, तणाव, चिंता, नैराश्य इत्यांदिशी जोडली गेली आहे. प्रथम क्रमांक मिळविलाच पाहिजे ही पालकांची आणि शिक्षकांची भूमिका विद्यार्थ्यास जीवघेण्या स्पर्धेत जीव देण्यास भाग पाडते. मात्र ज्ञानरचनावादापासून परीक्षा म्हणजे बालकाचा निकाल नव्हे, तर प्रत्येक बालकाची ओळख आहे. यांत स्मरणाची क्षमता न तपासता अर्जित ज्ञानाच्या उपाययोजनांची क्षमता तपासली जाणार आहे.

## ज्ञानरचनावादी अध्यापन पध्दती व तंत्रे :

१) अधिकृत व वास्तव वातावरणात अध्ययन

२) अध्ययनात वैचारिक समझोता व मध्यस्थी यांचा समावेश.

३) आशय व कौशल्य अध्ययनकर्त्यांशी संबंधित असावे.

४) साहित्य निवड करताना अध्ययनकर्त्यांच्या पूर्वज्ञानाचा विचार आवश्यक

५) मूल्यमापनाच्या विविध टप्प्यांवर प्रत्याभरणाचा उपयोग पुढील अध्ययनास होणे आवश्यक

६) अध्ययनकर्त्यांस स्वयंनियंत्रित, स्वमध्यस्थ व स्वयंजागृत होण्यास प्रोत्साहन आवश्यक.

७) शिक्षकांची भूमिका मार्गदर्शक समुपदेशकाची असावी.

८) आशयाची मांडणी विविध प्रकारे होणे आवश्यक.

**स्व - संकल्पना आणि ज्ञानरचनावाद :**

ज्ञानरचनावादामध्ये विद्यार्थ्यांस प्रमुख आणि मध्यवर्ती स्थान आहे. विद्यार्थी स्वतः अध्ययनाची जबाबदारी स्वत : स्वीकारतात. अध्ययनात नावीन्य असल्याने स्वतः हिरिरीने सहभागी होतात. त्यामुळे नकळत अध्ययनात विद्यार्थ्यांचा स्व गुंतला जातो आणि त्या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांची स्व - संक ल्पना विकसित होते. मी स्वत :अध्ययन करु शकतो, माझ्यावर माझ्या अध्ययनाची जबाबदारी आहे. माझ्या यशात इतरांचेही यश आहे, माझा निर्णय येण्यास मी सक्षम आहे. या भावनेतून स्वत : बाबत प्रयत्नशील आत्मविश्वासू अशी स्व-संकल्पना तयार होण्यास ज्ञानरचनावाद उपयोगी ठरते.

**आनंददायी शिक्षणप्रक्रिया :**

विद्यार्थी स्वतः अध्ययन - अनुभवांना अर्थ देतात. विद्यार्थी स्वतःकडून तर शिकतातच पण सहमित्रांकडूनही शिकतात. यातूनच अध्ययन आणि अध्यापन या दोन्ही प्रक्रिया विद्यार्थीच करतात आणि या प्रक्रियेचा आनंद देखील घेतात.

शिक्षण ही एक आंनददायी प्रक्रिया आहे. हाच ज्ञानरचनावादाचा पाया आहे. ज्ञानरचनावादानुसार ज्ञानाची साधना सर्वांनी मिळून करावयाची आहे. ही साधना करताना विद्यार्थी स्वत :च, स्वतःला मदत करेल, त्याचवेळी इतरांनाही मदत करेल आणि प्रसंगी इतरांची मदत घेईल आणि हे करीत असताना देण्या-घेण्यातून अध्ययनप्रक्रियेचा मनमुराद आनंद घेईल.

**शिक्षकांची भूमिका :-**

पारंपारिक शिक्षणपध्दतीत शिक्षकांची एकाधिकारशाही जाणवते. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार मांडणे, अनुभव सांगणे, कृती करणे इत्यादी बाबीस मज्जाव केला जातो. त्यातून विद्यार्थ्यांमध्ये ताणतणाव निर्माण होतात व अध्ययनास अडथळा निर्माण होतो. मात्र ज्ञानरचनावादाने असा शिक्षक नाकारला आहे. ज्ञानरचनावादातील शिक्षक हा मार्गदर्शक, सुविधादाता आणि संघटकाची भूमिका पार पाडणारा असावा.

शिक्षक जेव्हा सर्जनशील व्हायला सुरवात होईल तेव्हा खरोखरच सर्वांचेच शिक्षणावर प्रेम जडू लागेल. शिक्षण ही प्रेम करण्यासारखी गोष्ट बनेल. सर्जनशीलतेच्या स्त्रोतातून निर्माण होणारे शिक्षण धाराप्रवाही होईल. चैतन्याने वाहते होईल. जीवनाच्या प्रत्येक आव्हानाला तोंड देत नव्या क्षितिजाकडे धाव घेत राहील. नवी स्वप्ने पाहायला व ती प्रत्यक्षात उतरवायला भाग पाडील. म्हणून तर प्रत्येकाला सर्जनशीलतेची कास धरणे आवश्यक आहे. तिची दखल घेणे भाग आहे. शिक्षकांनी वर्गामध्ये सर्जनशीलतेच्या संवर्धनास प्रोत्साहन देण्याची नितांत गरज आहे. दैनंदिन तासिकांच्या कालावधीत सर्जनशीलतेसाठी पोषक वातावरण निर्माण करणे हे शिक्षकांसाठी अत्यंत आव्हानात्मक असे काम आहे.

आजच्या शिक्षण प्रक्रियेतील शिक्षक हा केवळ Teacher नसून Educator आहे, कारण तो फक्त शिकवित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. तो आता सर्वार्थाने विद्यार्थ्यांचा मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक बनला आहे.

शिक्षक हा राष्ट्राच्या मानवी संसाधनातील खूप महत्त्वाचा भाग आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय हितासाठी योग्य दृष्टी आणि क्षमता असलेले शिक्षक ही राष्ट्राची महत्त्वपूर्ण संपत्ती आहे. शिक्षणाची सर्व उद्दिष्टे चांगल्या रितीने सफल होण्यासाठी शिक्षण प्रक्रियेत अशा प्रगत व सक्षम शिक्षकांचा समावेश असणे अत्यंत गरजेचे आहे. अशा शिक्षकांचा समाजावरील प्रभाव दीर्घकालीन स्वरुपाचा असतो, म्हणूनच हेनरी ॲड्म्सने म्हटले आहे. A teacher affects eternity, no one can tell where his influence stops.

एकंदरीत पाहता शिक्षण प्रक्रिया जितकी चांगली व्यापक स्वरुपाची होत चालली आहे तितकी तिची उद्दिष्टे सर्वसमावेशक व विस्तृत होत आहेत. ही उद्दिष्टे फक्त शाळेपुरती मर्यादित न राहता ती सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय जीवनाशीही जोडली जात आहेत. या सर्व उद्दिष्टांसाठी कार्यरत असणारा प्रगत शिक्षक आजच्या प्रगत शिक्षण प्रक्रियेची गरज बनला आहे.

❖ ❖ ❖

# १२. प.पू. स्वामी चिन्मयानंदांचा बालशिक्षण व बालकांप्रतीचा दृष्टिकोन

बालक केंद्रित शिक्षणाबाबत भारतात पूर्वी अनेक प्रयोग झालेत व आजही होत आहेत. अनेक आयोगांच्या माध्यमातून बालकांकरिता विविध शिफारशी सुचविण्यात आल्यात. शिक्षण आनंददायी व्हावे म्हणून योजना आखण्यात आल्यात. सर्व शिक्षा अभिनयाच्या माध्यमातून सर्व बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला. बालकांचे स्वास्थ्य चांगले राहावे याकरिता अनेक योजनाही राबविण्यात आल्यात. बालकांचा नवीन जगाशी संबंध यावा म्हणून त्यांना प्राथमिक स्तरापासून शिक्षण देण्याचीही तरतूद झाली. संगणकाच्या माध्यमातून अनेक Self Learning Packages तयार झाले. हे सर्व बालककेंद्री शिक्षणाला अनुसरुनच करण्यात आले. बालवयात बालकांमध्ये संस्कार रुजतात व त्यातून उद्याचा सुसंस्कारित नागरिक तयार होतात. हा दृष्टिकोन अतिशय उदात्त आहे. त्याकरिता योजनाही चांगल्या आहेत हयातून बालक शिक्षणाचा प्रसार व प्रचार व्हायला सुरूवात झाली. अनेक बालके शिक्षणाच्या प्रवाहात आली. शिक्षण घेऊ लागली. केंद्रित शिक्षण व शिक्षणात बालकांचा विचार हया बाबींवर प्रभावीपणे विचार सुरु आहे. बालकांच्या विकासाचा विचार आमच्या शिक्षण प्रणालीने केला. पण हया सर्वांमध्ये बालवयात असणा-या त्यांच्या सुंदर मनाचा आम्ही कितपत विचार केला? हया शिक्षणप्रणालीतून सुंदर मनाची निर्मिती झाली का ? सुंदर स्वभावाची निर्मिती झाली आहे का? आज शिक्षणातून योग्य विचार करण्याची क्षमता विकसित होते आहे का ? विद्यार्थ्यांना निषेधात्मक विचारापासून आपण परावृत्त करु शकतो का ? आज समाजात जे गुन्हेगार आहे त्यांचे मन

त्यांच्या बालवयात निश्चित दुर्लक्षित झाले, हे दुर्लक्षित का झाले? कोणी केले ? का केले ? हा खरंच संशोधनाचा विषय आहे.

### गुरुदेवांचा बालशिक्षण विषयक दृष्टिकोन

बालक शिक्षणावर विचार करतांना सुंदर मनाची निर्मिती हया शिक्षण विषयक ध्येयाला प्राधान्य मिळायला हवे. सुंदर मनाची निर्मिती करुन चांगला विचार या बालकांमध्ये रुजवायला हवा. तरच तो चांगला शास्त्रज्ञ, चांगला वैज्ञानिक, चांगला नागरिक घडू शकले कारण आजचा बालक हा उद्याचे भविष्य आहे. अनेक विषय बालकांना एकदम शिकवून चालणार नाही. कारण प्रत्येकाची कुवत क्षमता हया निरनिराळया असतात. प्रत्येकाच्या क्षमतांचा विचार शिक्षणात होणे आवश्यक आहे. ज्ञानदेवांनी आपल्या पसायदानात म्हटले आहे "जो जे वांछिल, तो ते लाहो" हया उक्तीनुसार प्रत्येक बालकाला त्यांच्या क्षमतेनुसार, अभिरुचीनुसार, त्यांच्यातील कौशल्यानुसार त्या त्या क्षेत्रात सुरवातीपासून योग्य शिक्षण दिले तर निश्चितच तो उत्कृष्ट शास्त्रज्ञ, उत्कृष्ट वैज्ञानिक, उत्कृष्ट गायक बनू शकेल.

स्वामी चिन्मयानंद शिक्षणाच्या बाबतीत म्हणतात की, " शिक्षण ही अंतरंगातून प्रस्फुटित होणारी, गुरुच्या हातून संरक्षित असणारी भक्ती आहे. " मग बाहेरून लादण्यात येणारे शिक्षणाने खरच विद्यार्थ्यांच्या सुप्त व्यक्तिमत्वाचा विकास होणार आहे का ? विद्यार्थ्यांमध्ये बुध्दिमत्ता आहे, भक्ती आहे, पण बुध्दिमत्ता भक्तिहीन होत आहे, विवेकहीन होते आहे, कारण हया बुध्दिमत्तेला अभिव्यक्ती होणा-या वाटाही अनेक आहेत.

बालशिक्षण, बालकेंद्री शिक्षण अर्थात बालकांच्या शिक्षणाचा विचार करतांना शाळा पाठयपुस्तके, अभ्यासक्रम, हयांचाच विचार करुन

चालणार नाही तर सर्व स्तरावर कौटुंबिक, सामाजिक, राजकिय, आर्थिक, सर्व क्षेत्रातील पावित्र्य राखायला हवे. त्यासाठी पालक, शिक्षक, नेतृत्व प्रशिक्षक इ. अनेक स्तरावर एक आदर्श योजना आखावी लागेल. जोवर कौटुंबिक, आर्थिक, राजकिय क्षेत्रात हे पावित्र्य निर्माण होत नाही व त्याकरिता काही विशेष उपाययोजना होत नाही तो पर्यंत केवळ बालकांना दिलेले बालककेंद्रिय शिक्षण हा विचार एकांगी ठरेल, ह्याच अनुषंगाने बालकाचे मन विकसित करायला हवे.

स्वामी चिन्मयानंद यांनी अतिशय सुरेख शब्दात बालकांप्रतीचा दृष्टिकोण व्यक्त केला आहे. 'Future of our country' ह्या पुस्तकात ते म्हणतात पाश्चात्य राष्ट्रात विविध समस्यांवर लोक एकत्रित येतात. Because every man in the street is consious that he is the child of a great warrior great soldiers of the past आज भारतात ही भावना निर्माण झाली आहे का ? मी भारतीय संस्कृतीचा बालक आहे ही भावना किती लोकांमध्ये आहे त्यापुढे जाऊन गुरुदेव म्हणतात For developement of our country our culture and human personality it is necessary that we must come more and more conscious of our past culture. हा सगळा विचार आम्ही, आमच्या शिक्षणतज्ञांनी, आमच्या शासनकर्त्यांनी करायला हवा हे ध्येय आमचे आहे कारण Our Child is our Future हा आदर्श असेल तर ते राष्ट्र प्रगति पथावर जाईल.

**गुरुदेवांचा बालकांबाबत दृष्टिकोण :-**

प.पू.गुरुदेवांचा बालकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण अतिशय सकारात्मक आहे. "आजचे जग हे उद्याचे जग होणार आहे" असे जेव्हा

आपण म्हणतो तेव्हा त्यांचा ध्वन्यर्थ असा असतो की, आजचे लोक आणि त्यांचे कार्य जगाला आकार देणार आहेत, त्यांचा जीवनमार्ग ठरविणार आहेत. सहाजिकच आजच्या मुलांचे दृष्टिकोण, जीवनमूल्ये, त्यांच्या कल्पना, ध्येयकेंद्र आणि आदर्श यांना उत्तम आकार व घडण दिली तर आपल्या सध्याच्या अपेक्षेनुसार जग अधिक चांगले, सुसंघटित व आदर्श असे निर्माण होइल. जीवन घडविणे म्हणजे अचूक विचार करणे, उत्तम निर्णय घेणे आणि घेतलेले निर्णय धीरोदात्तपणे जीवनात उतरवणे होय, यासाठी मुलांना योग्य बनविले पाहिजे. स्वामी चिन्मयानंदांच्या मते, "आजच्या जगातील प्रगत राष्ट्रांच्या उज्वलतेचे कारण पाहता, वर्तमान पिढीतील बुध्दिमतांनी विचारपूर्वक योजना आखून राष्ट्राला उत्तम दिग्दर्शन करुन त्यांची प्रगती घडवून आणली आहे. आपल्या देशात मला जिकडे तिकडे पशुमानवच दिसत आहे."

इतके अध:पतन कसे काय झाले आहे ? आजच्या पिढीच्या बाल्यावस्थेत संस्कार करण्याच्या दृष्टीने आपण दुर्लक्ष केले हेच त्याचे कारण नाही काय ? देशाची संस्कृती, सामाजिक प्रगती, प्रजेचे वैयक्तिक चारित्र्य यांच्या उत्क्रांतीचा तो विचार आहे की, ही संथपणे घडणारी प्रक्रिया आहे, म्हणून भवितव्य उज्ज्वल होण्यासाठी आपण आपल्या मुलांना विचारी बनवले पाहिजे विनाशगर्तेत लोटणारी आपली विचारपध्दती त्यांना न शिकविता नवउत्साहाने निराळया दृष्टिकोनातून त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करुन त्यांच्यात मत जागरुकता निर्माण केली पाहिजे.

Catch them young हा त्यांच्या बालकविषयक दृष्टिकोनाचा गाभा आहे. आजची मुले चुणचुणीत असतात. त्यांची आकलन शक्ती अधिक असते. वर्तमान युगातील गतिमान जीवनाशी लढा देण्यासाठी त्यांनी स्वत:मध्ये खूप वैशिष्टये विकसित केली आहेत. साधारण आवाका

असलेल्या त्यांच्या पालकांपेक्षा त्यांना माहितीही खुप असते. त्यांना खुप समजते. विज्ञान व तत्वज्ञान हया क्षेत्राचा झालेला विकास व त्याचा प्रभाव हयामुळे पूर्णपणे बदलेल्या वातावरणात हया मुलांना जीवनाशी संघर्ष करावा लागतो. मुलेही या नवीन परिस्थितीत घडत आहेत. सभोवतालच्या या नवीन जगाशी जुळवून घेता यावे म्हणून निसर्गानेच प्रामाणिकपणे त्यांच्यात एकप्रकारची क्षमता विकसित केली. त्यांच्या या मानसिक घडणीमुळे व बौध्दिक क्षमतेमुळे ती काहीशी वेगळी वाटतात. आजच्या बालकांबद्दल वास्तविकता अशी आहे की त्यांच्या पालकांचे लक्ष हे जसे हवे तसे नसते ही खंत त्यांनी व्यक्त केली आहे. मागील शतकात त्यांच्यावर लादल्या गेलेल्या शिक्षणपध्दती त्यांना हळूहळू चिरडून टाकू लागल्या आहेत आणि त्यातूनच निर्माण होत आहेत कुरण विचित्र व्यंगचित्रे हयामुलांना राहण्यासाठी त्यांची वाढ होण्यासाठी आणि जगण्यासाठी आपण एक विकृत जग निर्माण करुन ठेवले आहे. याविरुध्द जाण्यासाठी शिक्षणाच्या काही नवीन पध्दती निर्माण करण्याची आज गरज आहे. शिक्षणाबाबतचा प्रगतिशील दृष्टिकोन मांडण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळातील मुले हुशार आहेत. त्यांचा बुध्यांक उत्तम प्रतीचा आहे. सभोवतालच्या वस्तूंचे आणि प्राणिमात्रांचे पृथक्करण करुन त्यांना जाणून घेण्यासाठी निर्णय घेण्याची जी एक क्षमता लागते ती त्यांच्याजवळ पन्नास वर्षापूर्वीच्या मुलांजवळ जेवढी होती त्यापेक्षा अधिक आहे ही त्यांना निसर्गाने जगण्यासाठी दिलेली एक जादा देणगी आहे.

गुरुदेव खंत व्यक्त करतात की, "समोर समस्या मोठी आहे. जी कामगिरी समोर आहे तिच्यासाठी खूप परिश्रम करावे लागणार आहेत त्यासाठी बुध्दिवंतांनी आणि समजूतदार लोकांनी यात तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे." गुरुदेव म्हणतात, "सभोवतालच्या जगात

जीवनमूल्यांची घसरण होत असलेली आपण पाहतो. पण हयातून मार्ग काढण्यासाठी काही आशेचे किरण मात्र निसटलेलेच असतात. हयावर त्यांचा दृढ विश्वास आहे हे निसटलेले किरण म्हणजेच देशप्रेम, सामाजिक, आर्थिक व्यवस्थांवरचा विश्वास आणि प्रचलित यंत्रणेविरुध्द उठाव करावा ही जाणीव"

बालकांच्या उज्ज्वल भवितव्याबाबत भाष्य करताना "Brighter world for our children" हया लेखात Chinmaya Mission News Bulletin Nov.२०१७ प.पू. गुरुदेव म्हणतात "If the future is to be bright we have to mould our children to think in a new patterns and with a new vision. It is not revolution but it is evolution of each individual character. " ही भूमिका आपल्याला पाठयपुस्तकातून समजून घेता येणार नाही , हयासाठी पालकांनी बदलण्याची आवश्यकता आहे. मुले आपल्या पालकांचे अनुकरण करतात. हया कार्यात आईची भूमिका गुरुदेवांनी अत्यंत महत्वाची मानली आहे. आईच आपल्या मुलांमध्ये उच्च आदर्श व मूल्य रुजविण्यास समर्थ असते. वय वर्ष ६ ते १२ हया काळात आपण बालकांना योग्य मूल्य संस्कार देऊ शकतो. त्यानंतर मात्र देऊ शकत नाही. त्यानंतर त्यांच्या विचारांना आपण बदलवू शकत नाही आणि म्हणूनच बाल्यावस्था ही संस्काराकरिता महत्वाची अवस्था आहे व हयाकरिता आईच जबाबदार आहे माता ही सेवेचा आदर्श आहे. Mother lives the ideals of charity, goodness, tenderness, affection and forgiveness म्हणूनच मातेने देशाची सांस्कृतिक मूल्ये शिकायला हवी. बालकांना राष्ट्रनिष्ठा, मूल्यनिष्ठा शिकवायलाच हवी. आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी मुलांमध्ये मूल्यनिष्ठा रुजवायला हवी. गुरुदेवांनी खंत व्यक्त केली आहे की, आपण आपल्या बालकांकडे दुर्लक्ष करत आहोत आणि आपण बालके घडविणारे केवळ यंत्र बनलो आहोत.

ह्याकरिता गुरूदेव म्हणतात "We have to take responsibility for moulding and beutifying our children, prepare them to face the wolrd tomorrow and to lead and guide the world of the future." आपण आपल्या बालकांकडे दुर्लक्ष करतो पण ह्यावरील उपायही आपल्याजवळच आहे, आपण आपल्या बालकांना आदर आणि प्रेम द्यायला हवे. We must teach the children not to have right values and convictions of their own but also to have the heroism to live up them बालक शिक्षणाचे अनन्य साधारण महत्त्व स्पष्ट करतांना गुरुदेवांनी ही जबाबदारी माता पालकांकडे दिली आहे.

'Our Children, our future' ह्या पुस्तकात गुरुदेवांनी बालकांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी बालकांच्या वर्तमान कामाला आधी महत्व दिले आहे कारण बालकांचा वर्तमानकाळ + पुढे येणारा काळ = भविष्यकाळ असे भविष्यकाळाबाबतचे समीकरण त्यांनी मांडले आहे. ह्या वर्तमानकाळातच बालकांच्या सुंदर स्वभावाची निर्मिती करण्यात यावी असे ते म्हणतात. बालकांना ख-या मूल्यांचा आदर करावयास शिकवावे. वर्तमानात मुलाचे विचार महान असतील तर आपण सुंदर भविष्याची निर्मिती करु शकू आणि म्हणूनच बालकांना खरा विचार करावयास शिकवायला हवे. योग्य निर्णय घेण्यास शिकवायला हवे. ह्या निर्णयानुसार जीवन जगण्याचे साहस त्यांच्यात निर्माण करायला हवे.

"Kids are not pets" ह्या लेखात गुरुदेवांनी शिशुंबद्दल आपली भूमिका व्यक्त केली आहे. बालके ही पाळीव जनावरे नाहीत की ज्यांना केवळ निवारा आणि अन्न लागते. माणसाला त्याच्या शिशुअवस्थेत विशेष देखरेखीची आवश्यकता असते. "All delinquents are without exception created by negligent parents. " पालकांनी आपला जास्तीत जास्त वेळ बालकांना देणे आवश्यक आहे. शिशू जेव्हा

बाल्यावस्थेत येतो तेव्हा पालक त्याला अतिशय छोटे छोटे आदेश देतात त्यापुढे आपणच नकळत आपल्या मुलांची संवेदनशीलता मारत असतो. हयाबाबत ते अर्भाभज्ञ असतात.

त्यांनी बालकांच्या वर्तमानावर विशेष भर दिला आहे. वर्तमानात आणखी काळ मिसळला की भविष्यकाळ बनतो म्हणजेच वर्तमान+काळ = भविष्यकाळ आहे.

गुरुदेवांनी जन्मपूर्व शिक्षणाचीही उद्घोषणा केली आहे. भक्त प्रल्हादाने जन्मानंतर पाहिजे तसे शिक्षण प्राप्त केले नाही, पण तो उच्च मूल्यांच्या प्रती समर्पित होता. हयाचे कारण त्याने जन्मपूर्व अध्यात्मिक शिक्षण घेतले होते. परिणामी हया बालकाने भौतिकवादाचा विरोध करुन आपल्या देशाला पुन्हा आध्यात्मिक सौंदर्य प्राप्त करुन दिले शाश्वत मूल्ये प्राप्त करुन दिलीत. पण आजकाल माता आपल्या बालकाला जन्मपूर्व जे शिक्षण देत आहेत त्याबाबत गुरुदेवांनी विलक्षण खंत व्यक्त केली आहे. बालकांना जन्मपूर्व अवस्थेत हया मातांनी सिनेमा, उपन्यास, हॉटेलिंग इत्यादिंचे संस्कार आपल्या बालकांना देणे व भविष्यात आपला बालक बिघडला ही तक्रार करणे वास्तविक हा विरोधाभास आहे. हया ठिकाणी गुरुदेवांनी स्त्री शिक्षणाच्या संदर्भात मातापालक शिक्षणाचा पाया रोवला आहे.

बालकांच्या व्यक्तिमत्वाचा समन्वयात्मक विकास झाला तरच त्याचे भविष्य उज्ज्वल बनेल तेच उद्याचा नेता बनतील म्हणून आज आपल्याला त्यांच्या हृदयात उदात्त विचार भरावे लागतील. पण आई - वडीलच जर बालकांची उपेक्ष करतील तर ही बाब साध्य होणार नाही. १८ वर्षापर्यंत बालकांना योग्य शिक्षण देता येईल त्यानंतर मात्र त्यांच्या

दृष्टिकोनात परिवर्तन आणणे, त्यांच्या विचारांना योग्य दिशा देणे शक्य होणार नाही.

बालकांच्या संस्कृती शिक्षणावर गुरुदेवांनी भर दिला आहे. त्यासाठी युवतींची आवश्यकता आहे कारण युवती आपल्या मातृत्व भावनेतून बालकांना शिक्षण देवू शकतील. हयासाठी शाळेमध्ये काही कार्यक्रम घ्यावे लागतील. हयासाठी शाळेतील शिक्षक शिक्षिकांना आठवडयातून किमान एक वेळ संस्कृती शिक्षणाचे पाठ द्यावे लागतील. बालकांमध्ये केवळ उच्च मूल्यांचे बीजारोपण महत्वाचे नाही तर हया जीवनमूल्यांना धारण करण्याचे साहस त्यांच्यात निर्माण करावे लागेल. आपल्य बालकांना जीवन जगण्याचे शिक्षण द्यायला हवे.

"Planet in Crisis" हया पुस्तकातील Mental Renaissance हया लेखात बालकांच्या सुदृढ विकासासाठी पर्यावरणाची आवश्यकता विषद केली आहे व हयात त्यांनी बालक शिक्षणाच्या दिग्दर्शन पध्दतीवरही भाष्य केले आहे. बालक शिक्षणात दिग्दर्शनाला प्राधान्य आहे. "Rewakening the human spirit" हया लेखात The education system needs change पण केवळ पाठ्यपुस्तकातील बदल त्यांना अपेक्षित नाही, तर पर्यावरणातील बदल त्यांना अपेक्षित आहे. It must be an atmosphere of serenity and beauty विद्यार्थ्यांना सौदर्यांचा आस्वाद देणारे शिक्षण. आज बालकांना सौदर्यांची संकल्पना शिकवायला हवी. पालकांनी प्रेम अभिव्यक्त करायला हवे व वातावरण निर्मिती करायला हवी. असे केल्यास बालक स्वत :ची मूल्ये व मूल्य प्रणाली विकसित करु शकतो. बालकांसाठी Spiritual Education ची एक Informal योजना गुरुदेवांनी आपल्या Advice to householder हया पुस्तकात दिली आहे. Spiritual education देता येईल का ? हया

प्रश्नाचे अतिशय सुंदर उत्तर गुरुदेवांनी दिले आहे. बालकांच्या आध्यात्मिक शिक्षणाचे बीज त्यांनी रोवले आहे. ते म्हणतात बालक हा निष्क्रियपणे आपल्या पालकांचे निरीक्षण करीत नाही तर आपण जेव्हा मोठे होतो तेव्हा आपण Art of Passive हस्तगत करतो. कारण जर बालक हा Passive observor असेल तर त्याने भाषा कशी हस्तगत केली असती. ज्ञानग्रहणाची त्याची क्षमता ह्या वयात अत्यंत आश्चर्यकारक असते आणि म्हणूनच ह्या वयात त्यांच्या समोर आध्यात्मिक वातावरण असणे अत्यंत गरजेचे आहे. ह्यामुळे बालकांच्या मानसिक आयुष्याला वळण लागेल.

आपल्या बालकाचे भविष्य आपणास उज्ज्वल हवे असेल तर त्याला योग्य दिशेला वळवावे लागेल. त्याला नवीन दृष्टिकोन नवीन पध्दतीचे विचार करायला शिकवावे लागेल. ही अत्यंत हळू चालणारी प्रक्रिया आहे हे परिवर्तन नाही हा प्रत्येक व्यक्तीच्या चारित्र्याचा विस्तार आहे. ही बाब पाठयपुस्तकातून साध्य होणार नाही. ह्यासाठी पालकांनीच बदलायला हवे. हे मूल्य संस्कार शाळेतून, संस्थेतून, समाजातून होणार नाही तर मूल आपल्या पालकांचे अनुकरण करीत असते. म्हणून लहान वयातच बालकांना मूल्यांचे प्रशिक्षण द्यायला हवे. आईने बालकांना केवळ मूल्यच शिकवू नये, केवळ निष्ठाच शिकवू नये तर त्यांचे आदर्श निश्चित करण्याची व त्या आदर्शानुसार जीवन जगण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करावी.

❖ ❖ ❖

# १३. जागतिक तापमान वाढ व शिक्षण

आज विश्वाला अनेक समस्या भेडसावत असतानाच अत्यंत महत्त्वाची ज्वलंत समस्या विश्वासमोर निर्माण झालेली आहे, ती म्हणजे जागतिक तापमानवाढ. या समस्याकडे प्राधान्याने व तातडीने लक्ष पुरविणे आवश्यक आहे त्यासाठी केवळ शैक्षणिक संस्थांमधून उद्‌बोधन होणे एवढयापुरते मर्यादित नसून त्या दृष्टीने जनमानसात जाणीव जागृती होणे व त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रत्येकाने पाउल उचलणे गरजेचे आहे. जागतिक तापमान वाढ ही पर्यावरणाशी संबंधित बाब आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखणे, पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे आज आवश्यक आहे.

पुरातन काळापासून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्व दिलेले आहे. ऋषिमुनींनी निसर्गाचे संवर्धन, संतुलन, संरक्षण यावर सातत्याने भर दिला. एवढेच नव्हे तर, भारतीय संस्कृतीत निसर्गाचे दैववत पूजन केले जाते पण मानवी मनावरील हे संस्कार, ही जीवनमूल्ये हळूहळू लोप पावली असेच म्हणावे लागेल कारण वैज्ञानिक शोधाच्या अतिरेकी वापराने व भौतिक सुखाच्या अतिरेकी हव्यासामुळे निसर्गचक्रात बिघाड निर्माण होऊन वातावरणातील पर्यावरणाच्या विविध घटकांचे संतुलन बिघडले आहे. भूरचना, प्राणी, वनस्पती, वातावरणअशा विविध नैसर्गिक घटकांवर सुखाच्या भौतिक आणि आधुनिकतेच्या हव्यासापोटी माणसाने आपली अधिसत्ता निर्माण केली आहे. परिणामी वातावरणातील घटकांचे संतुलन बिघडून जागतिक तापमानात वाढ होते आहे. गेल्या दोन तीन दशकांपासून शास्त्रज्ञांनी तापमानवाढीसंबंधी अनेक भाकिते केली पण दुर्दैवाने आपण आजही

जागतिक तापमानवाढीसंबंधी व पर्यावरणाच्या असंतुलनाविषयी उदासीन आहोत.

पृथ्वीवर अस्तित्वात असलेले वातावरण अनेक सजीवांचा जीवनाधार आहे. अनेक प्रकारे हे वातावरण सजीवांना आधारभूत ठरते. वातावरणामुळे सूर्याकडून येणारी उष्णता अडवून ठेऊन ते पृथ्वीचे तापमान स्थिर राखण्यास मदत करते. सूर्याचे अतिनील किरण पृथ्वीपर्यंत पोचण्यापूर्वी वातावरणामुळे अडविले जातात व सजीवांचे रक्षण होते. पशु, पक्षी, प्राणी, वनस्पती यांना प्राणवायू पुरविला जातो. मात्र वातावरणावर विविध घटकांचे परिणाम होऊन प्रदूषण घडून येते व परिणामी तापमानात वाढ होते. तापमान वाढ होण्यास कारणी पृथ्वीच्या तापमानाघटक भूत वाढ घडवून आणणारे, तापमानवाढीस जबाबदार असणारे वायू हरितवायू म्हणून ओळखले जातात. कार्बनडाय ऑक्साईड, मिथेन, ओझोन कार्बन क्लोरोफ्लुरो यांसारखे वायू तापमानवाढीस जबाबदार असतात. पृथ्वीचे तापमान कायम राखण्यासाठी पृथ्वी उबदार ठेवण्यासाठी हे वायू काही प्रमाणात आवश्यक असतात. मात्र या वायूचे प्रमाण वाढल्यास पृथ्वीचे तापमान वाढून वैश्विक तापमानवाढीची समस्या निर्माण होते. पृथ्वीतलावर लोकसंख्या वाढली की, त्याच्य श्वासोच्छवासातून बाहेर पडणारा कार्बनडाय ऑक्साईड बायूचे प्रमाण वाढणार. लोकसंख्या वाढली की पृथ्वीवरील वापरण्यास योग्य जमिनीचे प्रमाण कमी होते. परिणामी जंगलतोड केली जाते. वृक्षतोडीमुळे जंगलाचे क्षेत्र कमी झाले म्हणजे प्रकाश संश्लेषणक्रिया कमी होवून त्यासाठी शोषून घेतल्या जाणा-या कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी होते. परिणामी यावायूचे हवेतील प्रमाण वाढून ते तापमानवाढीस कारणीभूत ठरते. गेल्या काही दशकात

प्रचंड लोकसंख्या वाढ व अमर्याद जंगलतोड यांच्या परिणामाने जागतिक तापमानात सरासरी वाढ होत आहे.

औद्योगिक प्रगतीमुळे जास्तीत जास्त उद्योगधंदे, वाहनांचा वापर यासाठी वापरण्यात येणा-या इंधनाच्या ज्वलनामधून बाहेर पडणारे विविध घटक उदा. मिथेन, इथेन, कार्बन यांचे वाढते प्रमाण तापमान वाढीस कारणीभूत ठरते. तसेच औद्यागिक स्त्रोतांपासून निघालेला धूर वातावरणात पसरतो. या धुरामध्ये असलेले डाय सल्फर ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड व ओझोन सारखे धोकादायक घटक तापमानवाढीस कारणीभूत ठरतात.

हरितगृहाचा परिणाम तापमानावर होतो. कारण सूर्यप्रकाश पृथ्वीच्या वातावरणात कमी तरंग लांबीच्या प्रारणाच्या रुपात प्रवेश करतो. तेव्हा ही प्रारणे वातावरणातून पृथ्वीच्या पृष्ठभागापर्यंत सहज पोहचतात. या ऊर्जेपैकी २५ टक्के ऊर्जा अवकाशात ५ टक्के ऊर्जा पृथ्वी तर ५टक्के ऊर्जा वातावरणात शोषली जाते. उर्वरित ४५ टक्के ऊर्जा पृथ्वीचे तापमान वाढण्यास कारणीभूत ठरते. सरासरी ०.१ डिग्री सेंटीग्रेड एवढा तापमान वाढसुध्दा हानिकारक ठरु शकते. वातावरणाच्या तापमानात वाढ झ ाल्यामुळे ध्रुवीय प्रदेशातील तसेच हिमाच्छादित प्रदेशातील बर्फ वितळून नद्या-महानद्यांना महापूराचा धोका संभवतो. समुद्राची पातळी वाढून समुद्रालगतचा प्रदेश जलमय होवू शकतो. कारण जगातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ४० टक्के लोकसंख्या समुद्रकिनारी बसलेली आहे.

तसेच मानवी जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे क्षेत्र असलेल्या शेतीसही तापमानवाढीस धोका निर्माण होऊ शकतो. कारण काही ठिकाणी पावसाचे प्रमाण वाढेल तर कुठे कमी होईल, महापूरीपुढे

अन्नधान्याच्या पिकांवर परिणाम होवून दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता. नाकारत्ता येत नाही, वृक्ष, सजीव, पशू, पक्षी, प्राणी यांच्या जीवनावर विपरीत परिणाम घडून येईल. तापमान वाढीने लोकांचे आरोग्य, धोक्यात येईल. त्याशिवाय वेगवेगळया रोगांच्या साथी, पिकांवरील रोग, नैसर्गिक आपत्ती यामध्ये मोठया प्रमाणात वाढ होऊ शकेल. तात्पर्य पर्यावरणाचे प्रदूषण, वातावरणाचे असंतुलन, नैसर्गिक साधनसंपदेवरील ताण, वन्य जीवनाचा ज्हास, त्यांचा परिणाम म्हणून, पर्यावरणाची गुणवत्ता ढासळण्यात होवू शकेल.

विज्ञान - तंत्रज्ञानामुळे मानव प्रगतीची उंच शिखरे गाठू शकेल पण प्रगतीकडे वळणा-या प्रत्येक क्षणाचा विचार केल्यास हया प्रत्येक क्षणाला पर्यावरणाच्या -हासाला, तापमान वाढण्याला कारणीभूत ठरु शकेल. जल, वायू, भूमी, ध्वनी हयांच्या प्रदूषणाने दिवसेंदिवस जागतिक तापमानात होत असलेली वाढ रोखण्याच्या दृष्टीने शासनसंस्था, खाजगी संघटना विविधांगी मार्गाने प्रयत्नशील आहेत. पर्यावरण प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने लोकजागृती करणे व पर्यावरणतज्ञ, पर्यावरण मंडळे यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने अनेक कायदे निर्माण केलेत.

उपाचारापेक्षा प्रतिबंध कधीही श्रेयस्कर ठरतो, हा दृष्टीकोन समोर ठेवून पर्यावरण प्रदूषण, नियंत्रणाच्या दृष्टीने लोकजागृती करणे व पर्यावरणतज्ञ, पर्यावरण मंडळ यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने अनेक कायदे निर्माण केलेत. कलम २५३ द्वारा लोकसभेला पर्यावरणीय कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला, तर १९७६ मध्ये ४२व्या घटनादुरुस्ती द्वारे प्रथमच पर्यावरण रक्षण मुद्दा संविधानात समविष्ट केला. उदा. १९३९ चा मोटार वाहन कायदा, हवेच्या प्रदूषणाचे नियंत्रण व

प्रतिबंध म्हणून १९८१ चा वाहनविषयक कायदा २७ जुलै १९९८ पासून पर्यावरण संरक्षण कायदा अंमलात आणला गेला तर १९६० ते ७० च्या दशकात घरगुती कारणाने होणारे प्रदूषण (उदा. चुलींचा वापर, बंब, शेगडया थांबविण्यासाठी भारत सरकारने कायदा अंमलात आणला)

याशिवाय अनेक उपचारात्मक उपायायोजनांद्वारा सुध्दा प्रदूषणाला प्रतिबंध करता येतो. जसे उपयोगात आणली जाणारी वस्तू टाकून देण्यापेक्षा ती दुरुस्त करुन वापरल्यास नैसर्गिक स्त्रोतांवरील ताण कमी होवून प्रदूषणास आळा बसू शकेल, पर्यावरणाविषयी स्नेह म्हणजेच जागतिक समस्यांना मिळालेलं उत्तर म्हणून मानवाने आपल्या सवयी, आचारविचार, एकुण जीवन शैलीत बदल करुन, साधी राहणी व उच्च विचारसरणी चा अवलंब केल्यास पर्यावरणास अनुकूल बदल करणे सोपे जाईल.

पर्यावरण विषयाचा हा सांगोपांग विचार करता शिक्षण व पर्यावरणाचा किती जवळचा संबंध आहे हे लक्षात येते. कारण शिक्षण म्हणजे संपूर्ण जीवनाचा विकास मानवी जीवन संपूर्णतः पर्यावरणावर म्हणजेच सभोवतालच्या वातावरणाशी निगडीत असतो. कारण विज्ञान, सामाजिक शास्त्रे, गणित, मानवविद्या, भूगोल,यासारख्या विषयांचा संबंध शेवटी पर्यावरणाशी असतो. पर्यावरणीय समस्यांचे आकलन होण्यासाठी पुरसे ज्ञान शिक्षणाने प्राप्त होवू शकते. पर्यावरण संरक्षण, निसर्ग आणि मानव यांच्यातील परस्परांवलबित्व समजून घेण्यासाठी तसेच पर्यावरणविषयक सकारात्मक अभिवृत्ती व जीवनमूल्ये रुजविण्यासाठी शिक्षण फार मोलाची मदत करते.

व्यक्तीने स्वतःच्या परिसराशी सर्वतोपरी आंतरक्रिया साधणे व त्याच वेळेस स्वत : ची पर्यावरणाविषयीची मानसिक जडणघडण तयार करणे हया गोष्टी शिक्षणाने साध्य करता येतात. म्हणूनच समाजाच्या

कल्याणासाठी पर्यावरणासंबंधी ज्ञान प्राप्त करणे, पर्यावरणात सुधारणा करणे, त्यात बदल करणे, हे शिक्षणाचे उद्दिष्टच असले पाहिजे असे आफ्रिकन अहवालातच म्हटलेले आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरणाच्या आंतरक्रियेतून निर्माण झालेल्या समस्या ओळखण्यास, समजण्यास व सोडविण्यासाठी आवश्यक अशा बौध्दिक, नैतिक व तांत्रिक क्षमता विकसित होण्यासाठी पुरेसे ज्ञान शिक्षणानेच प्राप्त होत असते. (लॅटीन अमेरिकन अहवाल)

**तात्पर्य :-** शिक्षण आणि पर्यावरण, पर्यावरणाचे विविध घटक यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. शिक्षणाने पर्यावरणीय समस्या दूर करून "जागतिक तापमानातील वाढ आपण रोखू शकतो."

मात्र दुर्दैवाने आजही आपण जागतिक तापमान वाढीसंबंधी म्हणावे तसे जागरूक झालेलो नाही. आपली निसर्गसृष्टी व स्वत : चे अस्तित्व सुरक्षित राखायचे असेल तर त्यासाठी जागतिक तापमान वाढीची वेळीच दखल घेवून ती समस्या सोडविण्यासाठी पर्यावरण विचार हा आजच्या शिक्षणातील प्रमुख विचारप्रवाह असावा. ज्ञानेश्वरांनी ७०० वर्षापूर्वी हया पर्यावरण संकल्पनेचा विचार ज्ञानेश्वरीत केलेला आपणास आढळतो. पर्यावरणाचे रक्षण म्हणजे मानवी अस्तित्वाचे रक्षण यांची जाणीव तीव्रतेने झालेली आहे. म्हणूनच पर्यावरण ही स्वतंत्र ज्ञानशाखा निर्माण झालेली आहे.

पर्यावरण ही संकल्पना आपल्याला केवळ नैसर्गिक पर्यावरण, जैविक पर्यावरण यात बंदिस्त करता येणार नाही. पर्यावरण संकल्पनेतबाबत सर्वकष दृष्टिकोन आपणास ठेवावा लागेल. कारण मानवी जीवनाच्या संपूर्ण विकासाशी, प्रक्रियेशी पर्यावरणातील सर्व घटकांचा अत्यंत निकटचा, जवळचा संबंध असलेला दिसतो.

आपल्या सभोवताली असणा-या परिसराचा, वातावरणाचा, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम व्यक्तीच्या शारीरिक तसेच मानसिक स्वास्थावर पडत असतो. निसर्गातील नद्या, नाले पर्वत, वृक्ष, वल्लरी, सरोवरे, हवा, पाणी, जमीन या सर्व घटकांचा मानवी जीवनावर परिणाम होतो. हे घटक एकमेकांवर अवलंबून असतात. मानव हा पर्यावरणातील अत्यंत महत्वाचा घटक होय, म्हणून पर्यावरणाच्या समतोलाशी, संतुलनाशी, त्याचा अत्यंत जवळचा संबंध आहे. हाच दृष्टिकोन समोर ठेऊ न "पर्यावरण शिक्षण" हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला. मानवालाच नव्हे तर चराचर सृष्टीला, मानवी कृत्यांमुळे निर्माण झ ालेले धोके आणि संकटे निवारण्यासाठी या विषयाची निर्मिती झाली. प्रत्येक प्राणीमात्राच्या एवढेच नव्हे तर नैसर्गिक गोष्टींच्या (जसे - माती, हवा, पाणी) अस्तित्वावर संकटे कोसळल्याने निर्माण झालेला हा विषय आहे, म्हणून पर्यावरणाविषयी सर्वांना माहिती असणे गरजेचे आहे.

त्यादृष्टीने शिक्षण प्रक्रियेंतर्गत खालील मुदयांचा विचार करावा लागेल.

१) पर्यावरणासंबंधी व आरोग्यविषयक चांगल्या/उपयुक्त सवयी विकसित करणे.
२) पर्यावरण हाच खरा मित्र ही भावना वृध्दिंगत करणे.
३) पर्यावरण निरीक्षण क्षमता व चिकित्सक दृष्टीकोनाचा विकास करणे.
४) नैसर्गिक परिसराची जपवणूक करणे.
५) वृक्षारोपण, संवर्धन, संगोपन व वन्यजीव जोपासनेचे महत्व.
६) प्रदूषण उपचार, उपाय याविषयी जाणीव जागृती
७) नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण.

८) पर्यावरणाविषयी कर्तव्य, हक्क व सामाजिक बांधिलकी.

वरील मुद्दयांचा विचार शिक्षण प्रक्रियेतून करुन विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी ज्ञान देणे व त्यांच्या अंगी पर्यावरण संवर्धनाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केल्यास राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेली जागतिक तापमानवाढ रोखण्यास निश्चितच मदत होवू शकेल.

❖ ❖ ❖

# १४. मानवाधिकाराची अभिनव व अभिजात विचारधारा

**सारांश :-**

मानवाधिकार हे एक सार्वभौम मूल्य आहे. हे सर्वमान्य होवून १९४८ साली मानवाधिकारात्मक घोषणा करण्यात आली. सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता जागतिक स्तरावर निर्माण करणे हे मानवाधिकाराचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीनेच १० डिसेंबर हा दिवस युनोने जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून घोषित केला. मानवाधिकार हे संस्कृती संक्रमण व संवर्धनाचे महत्वाचे साधन आहे. मात्र आजही मानवाधिकाराच्या जागृतीबाबत पाहिजे तितकी जागृती दिसून येत नाही. याचे कारण म्हणजे समाजाची बदललेली मानसिकता. दारिदय व अज्ञान यात पिंजल्यामुळे बालकांना, स्त्रियांना ही अधिकार, कर्तव्ये असतात याविषयी आजही सर्वत्र अज्ञान दिसून येते. यावर उपाययोजना म्हणून "मानवाधिकाराचे शिक्षण" ही आधुनिक अभिजात अशी संकल्पना समोर आली. त्याप्रमाणे बालकांचे हक्क, बालकामगार विरोधी कायदे, महिला सबलीकरण हया अभिनव, अभिजात संकल्पना मानवाधिकारातून समोर आल्या.

मानवाधिकाराच्या याच अभिजात संकल्पनेविषयी प्रस्तूत लेखात चर्चा केली आहे.

एकविसाव्या शतकाची सुरवात झाली नवीन युगाची पहाट झाली. आजचे युग प्रत्येक क्षेत्रात प्रभावी प्रगती गाठणारे आहे. ज्ञानाचा, विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा झालेला प्रचंड स्फोट, अत्यंत गुंतागुंतीचे मानवी संबंध, प्रत्येक क्षेत्रात एक जीवघेणी स्पर्धा, अणुयुध्दाचा धोका, सर्वत्र अराजकता हिंसाचार, भ्रष्टाचार, अंतर्गत कलह अशा अनेक समस्यांना आज आम्ही

तोंड देत आहोत. परिणामी आधुनिक युगात "मानवाधिकार" हया संकल्पनेस अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

भूतकाळाचा विचार केल्यास एक बाब सिध्द होते की, मानवाला अधिकाराबाबत जाणीव होती. वेद, वेदांत वाङःमयात याविषयी बराच उहापेह झालेला दिसून येतो. त्यामुळे काही तज्ज्ञांच्या मते, "मानवाधिकार" ही पाश्चात्य संकल्पना आहे हे चुकीचे ठरते कारण मानव प्राचीन काळी जेवढा अधिकासोबत जागृत होता तेवढाच तो कर्तत्वाबाबतसुध्दा जागृत होता.

आजच्या समाजाचे चित्र बदलले आहे. लोकशाही पध्दतीने जीवन जगत असतांना त्याचा जीवन जगण्याचा स्तर निश्चितपणे उंचावला. Standard of Living वाढले. पण Standard of Life मात्र वेगाने घटत आहे. मानवाधिकार हे एक सार्वभौम मूल्य आहे. १९४८ साली मानवाधिकारात्मक घोषणा करण्यास आली. त्याची महत्वाची बाब होती सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता जागतिक स्तरावर निर्माण करणे. या दृष्टीनेच १० डिसेंबर हा युनोने जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून घोषीत केला. त्यात मानवाच्या विविध भूमिका आणि त्यातील विविध अधिकारांबाबत भाष्य करण्यात आले.

आदर्श समाज स्थापनेकरीता मानवाधिकारास अत्युच्च स्थान असावे ही आधुनिक व अभिजात संकल्पना हळूहळू पुढे आली. मात्र मानवाधिकाराच्या जागृतीबाबत पाहिजे तितकी जागृती दिसत नाही. कारण ग्रामीण भागातील बालकांना दारिद्रय व अज्ञानामुळे स्वतःचे काही अधिकार असू शकतात याची जाणीव नाही समाजाची मानसिकता बदललेली नाही समाजाची मानसिकता बदलावयाची असेलतर उगवत्या पिढीवरच संस्कार करावे लागतील अर्थात बालवयातच हे संस्कार करावे

लागतील. व संस्कार करण्याचे उत्कृष्ट साधन आहे शिक्षण. शिक्षण हे संस्कार संक्रमणचे व संस्कृती संवर्धनाचे साधन आहे.

आजचे विज्ञान-तंत्रज्ञान जेवढे झपाटयाने आकाशाकडे झेपावत आहे, तेवढयाच वेगाने भारतीय मूल्यांचा ऱ्हासाचा गहन प्रश्न समोर येत आहे. मानव आपल्यातील मानवत्व हरवून बसला आहे. हे मानवत्व परत मिळविण्यासाठी मानवाधिकार मूल्यांबाबत जाणिव जागृती व त्यासाठी "मानवाधिकाराचे शिक्षण" ही अीानव, अीाजात अशी आधुनिक संकलपना उदयास आली.


आज जग जवळ येत चाललेले असतांना जागतिकीकरणाच्या युगामध्ये प्रत्येकाला स्वतःच्या अधिकारांची जाणीव निर्माण करून देणे, त्याविषयी आस्था निर्माण होणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची दखल घेऊन अभिजात अशा नवीनतम कल्पना समोर आल्यात. त्यापैकी काही महत्वपूर्ण अभिजात संकल्पना पुढीलप्रमाणे.

त्यामध्ये १) मानवी अधिकाराचे शिक्षण २) बालकांचे हक्क ३) महिला सक्षमीकरण या नवीन अभिजात कल्पनांचा समावेश होतो.


**१) मानवी अधिकाराचे शिक्षण :-** प्रत्येक बालकास मानवी हक्काचे शिक्षण मिळावे ही नवीन अभिजात कल्पना समोर आली कारण. मानवाधिकाराच्या जागृतीबाबत पाहिजे तितकी जागृती दिसून येत नव्हती. कारण ग्रामीण भागातील बालकांना दारिद्रय व अज्ञान यात पिंजल्यामुळे स्वतःचे काही अधिकार असू शकतात, याची त्याला जाणीवही नव्हती. सार्वजनिक व सक्तीचा शिक्षणाचा कायदा, बालकामगारविरोधी कायदे झाले पण त्यासोबत विरोधाभासात्मक परिस्थिती निर्माण झाली. परिणामी समाजाच्या मानसिकतेमध्ये कोणताही फरक पडला नाही. समाजाची मानसिकता बदलावयाची असेलतर उगवत्या पिढीवर संस्कार करावे

लागतील, अर्थात बालवयातच हे संस्कार करावे लागतील संस्कार करण्याचे उत्कृष्ट साधन आहे शिक्षण. मानविधकाराविषयक शिक्षणाचा विचार मूल्यांना सोडून करता येणार नाही, मानवातील हरविंत चाललेले मानवत्व 'स्वत्व' अबाधित ठेवायचे असेलतर मानवीमूल्य व मानवाधिकारात्मक मूल्यांचे संस्कार प्रत्येक बालकावर होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी शिक्षण ही महत्वपूर्ण माध्यम ठरू शकते. शिक्षणातूनच सहनशीलता, आदर, एकात्मता, सहभावना इ. गुण मुलांमध्ये विकसित करणे शक्य होते.

मानवी संबंधांचा गुंता सोडविण्यास शिक्षणाची आज गरज आहे. म्हणून त्याचा गाभा मानवाधिकारात्मक मूल्य हा असावा. "Know your rights" हा युनोचा नारा आहे. पण हे राईटस् समजण्यासाठी संपूर्ण शिक्षण प्रणालीच व्यापून जावी यासाठी Four Pillers of Education ही संकल्पना सर्वांना आधार म्हणून स्विकारावी लागेल.



**Learnoing to know :-** व्यक्ती म्हणून कोणकोणते अधिकार आहेत हे कळल्याशिवाय व्यक्ती योग्य कृती करू शकत नाही. म्हणून खालील अधिकार माहित असणे आवश्यक आहे.




## Learning to be :-

बालकांमध्ये विविध मूल्यांची जोपासना व संवर्धन व्हायला पाहिजे.

उदा. क्रियात्मक, भावनात्मक, सौंदर्यात्मक, नैतिक, आध्यात्मिक इ. माझे अधिकार म्हणजे इतरांची कर्तव्ये असतात. व इतरांचा अधिकार म्हणजे माझे कर्तव्य असतात. ही जाणीव मुलांमध्ये निर्माण व्हावी.

## Learning to do :-

आजूबाजूचे विश्व परिवर्तनीय असते. या परिवर्तनात अनेक घटक समाविष्ट असतात.

उदा. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, कौटुंबिक यासारखे त्या अनुषंगाने मुलांची क्षमता विकसित करायची म्हणजे बदलत्या काळात इतरांशी व्यवहार करण्याविषयीचे योग्य भान बालकांच्या अंगी येईल.

**Learning loive together :-**

समाजात जीवन जगत असतांना एक संघर्षविरहीत, सहनशील उदारमतवादी वृत्तीने जीवन जगण्याची पात्रता बालकाच्या अंगी यावयास हवी. त्याचप्रमाणे व्देषरहित प्रेम, सहकार्य, आपुलकी, त्याग इ. गुण सहजीवन सुसहय करतील.

एकंदरीत "मानवाधिकार" हे स्वतंत्र, सार्वभौम मूल्य असून त्याचे अधिष्ठान "शिक्षणाला" द्यायला हवे. मानवाधिकाराचे शिक्षण देतांना अभ्यासक्रम तीन घटकांशी निगडीत असावा.




शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील महत्वाचा दुवा आहे. विद्यार्थी अनुकरण व निरिक्षणातुन शिकत असतो. म्हणून-




विविध पालक सभांच्या आयोजनातून पालकांमध्ये खालील गुणांच्या बाबतीत जाणीव जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.




वरीलप्रमाणे योजना राबविल्यास निर्माण होणारा समाज हा मानवाधिकारावर विश्वास ठेवणारा असेल. सर्व प्राचीन आध्यात्मिक व शाश्वत मूल्यांवर विश्वास ठेवणरा असेल अर्थातच त्याचा परिणाम म्हणजे समाजात शांतता, सुव्यवस्था व एकात्मता नांदेल व त्यायोगे राष्ट्रात, जगात शांतता निर्माण करणारी पिढी निर्माण होईल ही अभिजात कल्पना समोर आली.

**त्यानंतरची उल्लेखनीय अशी अभिजात कल्पना म्हणजे "महिला सक्षमीकरण"**

महिला सक्षमीकरण ही अभिनव कल्पना समानतेचा हक्क या तत्वावर आधारित आहे. समानता म्हणजे समाजातील कोणत्याही व्यक्तीला सामाजिक किंवा आर्थिक घटकांच्या आधारावर विशेष अधिकार

न देता सर्वांना समानतेची वागणूक देणे. उदा. :- स्त्री-पुरुष समानता, सामाजिक उपक्रमांच्या दृष्टीने स्त्रीला समानतेने वागविणे, स्त्री व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी तिला समानसंधी मिळणे हे महिला सक्षमीकरणांतर्गत अभिप्रेत आहे.

भारतीय समाजातील विषमता नाहिशी होवून तो एकसंध समाज व्हावा म्हणून आपण गेली कित्येक वर्षे प्रयत्न करीत आहोत. पण अजूनही आपणाला हवं तसं यश मिळालं नाही. म्हणून महिला सक्षमीकरण आवश्यक आहे. या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने जून १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्याला खऱ्या अर्थाने २००१ मध्ये चालना मिळून दि. ३ मार्च २००१ रोजी सुधारीत महिला धोरण जाहीर झाले. या धोरणात महिलांचा नियोजनात सहभाग त्यांची आर्थिक प्रगती करणे, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन व संरक्षण करणे यासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करण्यावर अधिक भर देण्यात आला. ०३ ऑक्टोबर २००१ रोजी महिला सनद तयार करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने काही कायदे करण्यात आले. जसे-

१) पोटगीचा कायदा - कलम १८(२) व कलम १८(३)प्रमाणे
२) मुलं, म्हाताऱ्या आईवडिलांना हक्क मागण्याचा अधिकार
३) विधवेला खर्च मिळविण्याचा अधिकार
४) हिंदू दत्तक तसेच भरणपोषण कायदा

महिला विकासाच्यादृष्टिने काही विकासात्मक योजना राबविण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची पुनर्रचना करण्यात आली. महिलांचे स्वयंसहाय्यता गट तयार करणे, त्यांना कौशल्यपर व

व्यावसायिक प्रशिक्षण देणे, बालगृहे उपलब्ध करून देणे अशा प्रमुख [illegible] बाबींचा विचार करण्यात आला.

महिला सक्षमीकरण धोरणाखाली महिलांसाठीच्या कार्यक्रमावर नियंत्रण ठेवण्यासाठी महिला घटक योजना तयार करण्यात आली. महिलांचे कार्यक्रम तळागाळापर्यंत पोहचविण्यावर भर देण्यात आला.

**मानवी हक्कासंबंधीच्या आधुनिक व अभिजात विचारसरणी म्हणजे बालकांचे हक्क.** कारण देशातील प्रत्येक बालक हा देशाचा भावी आधारस्तंभ असतो. आदर्श भावी पिढी, भावी नागरिक निर्माण करण्यासाठी त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येऊन चालणार नाही. १८ वर्षाखालील कोणतीही व्यक्ती ही 'बालक' या संज्ञेत मोडते.

लोकशाहीप्रधान समाजात नैतिकतेचे, सामाजिक व्यवस्थेचे आणि सर्वांच्या कल्याणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक बालकास आपल्या हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा वापर करता यावा ही आधुनिक, अभिजात अशी विचारसरणी सर्व जगभर समोर आली आहे.

सद्य परिस्थितीचे अवलोकन केल्यास निदर्शनास येते की, सध्या कामगारातून बालकांचे शोषण सर्वाधिक होते आहे. बालकांच्या शोषणाचे काही प्रकार आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **बालकामगार :-** आजच्या समाजातील अतिशय ज्वलंत व भयावह अशी समस्या म्हणजे बालकामगार होय. ज्या वयात मुलांनी शिकायला पाहिजे, त्या वयात त्यांच्यावर कामाचे ओझे निर्दयपणे लादले जाते. मुलांना भीक मागायला लावणे, मुलांची विक्री करणे यातून मुलांचे शोषण केले जात आहे.

देशातील सामान्य नागरिकांच्या जीवनाचा मोठा भाग बालकामगारांच्या श्रमाशी निगडीत असतो. अन्न, वस्त्र, निवारा या

आपल्या मुलभूत गरजांच्या पूर्ततेमध्ये बालमजुरांच्या श्रमांचा भाग असतोच. कारण लहान मुले शेतात राबणे, गुरं राखणे, मासेमारी, दूध काढणे, कुक्कुटपालन यासारख्या व्यवसायात सहभागी असतात. प्रत्येकाच्या कपडयांना, अन्नाला बालमजुरीचा स्पर्श असतो. रेशमी किडयांच्या पैदाशीपासून ते रेशमी वस्त्र विणण्यापर्यंत संपूर्ण प्रक्रियेत बालकामगारांचा मोठया प्रमाणात सहभाग असतो. यामागचे कारणे जाणून घेतल्यास निदर्शनास येते की, "बालकांच्या शिक्षणाच्या हक्कासंदर्भात असलेला सामाजिक निकष किंवा सामाजिक जाणिवेचा अभाव".

हा अभाव दुर सारण्यासाठी आवश्यक आहे बालकांचे शिक्षण बालकांना शिक्षण घेण्याचा हक्क बजावता यावा यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणे आणि शिक्षण पूर्ण करण्याच्या प्रक्रियेतील सर्व अडथळे दूर करणे ही आवश्यक बाब आहे. नव्हेतर ती शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. कारण बालकामगारासारख्या भीषण समस्येमूळे लक्षावधी बालक शिक्षणापासून वंचित राहत आहे. त्याचा दुरोगामी परिणाम त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनावर मोठया प्रमाणात होतांना दिसून येतो.

**वैयक्तिक परिणाम :-** बालकांनाा आचार, विचार, संचार व संस्काराचे अजिबात ज्ञान नसते. जीवन कसे जगावे, याचा विचार करण्याची क्षमताही नसते. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून वीटभट्टी, कारखाने, विडीकामगार म्हणून काम करवून घेणे हे धोकादायक ठरू शकते. लहानपणाच्या सततच्या कामामुळे त्यांना फुफ्फुसाचे आजार, हृदयाचे आजार, पोटाचे आजार असे व्याधीग्रस्त जीवन वाटयाला येऊ शकते भांडवलदार मालक, यांच्या जाचक वृत्तीमुळे बालकांचे वैयक्तिक जीवन फक्त आज्ञा पाळणे व गुराढोरांसारखे कामे करणे एवढेच मर्यादित राहते. बालकांचा उत्साह, आनंद यांच्यातील निरागसता हिरावून घेतली जाते. स्वातंत्र्य

उपभोगण्याऐवजी त्याला दुसऱ्याचे ताबेदार, गुलाम व्हावे लागते हे सर्व कुठेतरी थांबवावे व मुलांना आनंदाने, उत्साहाने आपले स्वातंत्र्य उपभोगता यावे ही अभिनव, आधुनिक विचारसरणी उदयास आली आणि त्यातूनच "बालकांचे हक्क" मानवाधिकाराने स्पष्ट केले. प्रत्येक बालकास शिक्षणाचा, वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क बहाल करण्यात आला.

प्रत्येक बालकाची विशेष काळजी घेणे व त्याला योग्य ती मदत मिळणे, आवश्यकतेनुसार संरक्षण मिळणे हे बालपणीचे हक्क प्रत्येक कुटुंबाने आपल्या बालकास दिले पाहिजेत.
शांतता, मानमान्यता, सहिष्णूता, स्वातंत्र्य, समता व एकता या मूल्यांनी भारलेल्या वातावरणात मुले वाढली पाहिजेत.

बालकांच्या संदर्भातील सर्वात महत्वाचा ठराव म्हणजे सन १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने मूजूर केलेली "बालकांच्या हक्कांची सनद" "बालहक्क संहिता"।

या संहितेतील कलम क्र. ३२, ३३, ३४ व ३५, ३६ नुसार "आर्थिक शोषणापासून आणि कुठल्याही धोकादायक, शिक्षणाच्या, शारिरीक व मानसिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कामापासून संरक्षण मिळण्याचा हक्क मान्य केला. त्यासाठी

- वयोमर्यादा निश्चित करणे
- योग्य ते कायदे बनविणे
- कायद्याच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणा उभी करणे
- योग्य ते दंड, शिक्षा इ.तरतूद करणे सदस्य राष्ट्राला बंधनकारक केले.

आधुनिक काळातील बालकांच्या संदर्भातील महत्वाची समस्या म्हणजे "बालकामगार" यावर प्रकाश टाकतांना काही बाबी मुलभूतरित्या स्पष्ट केल्या त्यानुसार

१) कुठल्याही बालकाचे अंतीम सरकार पालक आहे.

२) धोकादायक उद्योगातील बालकामगारांना त्वरित मुक्त करावे

३) बालकामगार बाळगणाऱ्या मालकास रू. २०,०००/- दंड व शिक्षेची तरतुद

४) केंद्रसरकार १९८१ या खटल्यात एखाद्या उद्योगातील मुख्य नियुक्त्या शोधण्यासाठी ज्या कामात बालकामगार काम करीत असेल त्याचा अंतिम लाभ कोणाला होणार आहे यावर ते निश्चित करावे हे सांगितले आहे.

५) वरील निर्णयाच्या अंमलबजावणीसठी जिल्हाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर दक्ष समित्या नेमण्याची तरतुद आहे.

आधुनिक काळात बालकामगार प्रथा निर्मूलनासाठी अनेक कायदे अस्तित्वात आले. आद्योगीक क्रांतीनंतर अभिजात असे बदल सर्वत्र दिसू लागले. कामगारांच्या हक्कांचा आणि कायदेशीर वेतनाचा विचार पुढे आला.

भारतात सर्वप्रथम १८८१ मध्ये फॅक्टरी ॲक्ट आला. त्यानंतर १९३१ साली रॉयल कमिशन ऑन लेबर स्थापन झाले व त्यांनी सर्वप्रथम कारखान्यांमध्ये धुराडी साफ करण्याच्या कामासाठी चिमण्यांमध्ये मुलांना वापरण्यात येत होते, तयावर नाराजी व्यक्त करून सुधारणा करण्याची शिफारस केली. त्यानुसार १९३४ मध्ये फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा करण्यात आल्या. १९५४ ते अद्यावतपर्यंत अनेक सुधारणांमधून १५ वर्ष वयापर्यंत मुलांना बालकागार प्रश्नाच्या संदर्भात महत्वाचा मानला जातो. यानुसार - विशिष्ट प्रक्रियेत व व्यवसायात १४ वर्षखालील बालकांना कामगार ठेवण्यास प्रतिबंध केलेला आहे. - अशा प्रतिबंधित व्यवसायाची

आणि प्रक्रियेची अनुसूची निश्चित करण्याची प्रक्रिया या कायद्यान्वये निर्धारित केली जाते.

ज्या व्यवसायात व प्रक्रियेत मुलांना कामावर ठेवण्याची मुभा आहे त्यासाठी नियम बनविले आहे. एकूणच बालकांच्या प्रश्नांकडे बघण्याच्या दृष्टिकोणात बदल झालेला आहे.

काळ हा परिवर्तनशील असतो परिवर्तनशीलता हा काळाचा अपरिवर्तनीय गुण आहे. आज सर्वत्र आधूनिकीकरण, विज्ञान-तंत्रज्ञनाचा पभाव समाजावर दिसून येतो. भौतिकतेने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आक्रमण केलेले आहे. परंतु आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्यीकरण नव्हे. आज समाजात अनेक ठिकाणी धार्मिक आध्यात्मिक मूल्यांची पायमल्ली होतांना आढळते. हिंसाचार, अनैतिकता, सांप्रदायिकता, धर्मवेड, भ्रष्टाचार या सर्व घटनांवरून हे सत्य प्रकर्षाने जाणवते की, समाजातील घटकात विविध स्तरावर हक्काची, अधिकाराची जाणिव प्रत्येकास आहे. पण त्यामानाने कर्तव्यपालनाबाबत कमालीचे औदासिन्य आढळते. मानवाच्या अधिकारांच्या मुळाशी असलेला मुलभूत अधिकारांविषयीची जाणिव प्रत्येकास ठेवावीच लागेल. अधिकार व मूल्य यात सामंजस्य प्रस्थापित करावे लागेल आणि त्यासाठी "मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मानवाधिकाराची निश्चिती करून तद्नुसार प्रत्येक टप्प्यावर स्वतःचा क्रमविकास साधण्यासाठी व्यक्तीचे कर्तव्य, अधिकारांची जाणीव प्रत्येक स्त्री-पुरूष, बालक, युवक यांना करून देणे हीच खरी मानवाधिकाराची आधुनिक व अभिजात संकल्पना म्हणता येईल."

❖ ❖ ❖

# १५. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य

**प्रास्ताविक :**

शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांना वेगवेगळया विषयाची केवळ माहिती देणे नव्हे तर तो विद्यार्थी स्वतः शिकण्यास समर्थ होईल अशा प्रकारची कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाच्या माध्यमातून विकसित करणे अपेक्षित आहे.

भारतताला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाही युगात लोकांच्या आशा आकांक्षा शिक्षणात प्रतिबिंबीत होवू लागल्या शिक्षण हा महत्त्वपुर्ण असा विषय असून त्याच्या अनेक पार्श्वभूमी आपल्यासमोर दिसून येतात. राजकीय.सामाजिक आर्थिक व वैज्ञानिक पार्श्वभूमी ठळकपणे दिसून येते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. अश्या सर्वांगिण विकासाच्या संकल्पनेत शारीरीक, बौध्दिक मानसिक विकास अपेक्षित आहे. या तिन्ही स्तरावरिल विकासात मुलांचे आरोग्य ही बाब अत्यंत महत्वाची आहे. शिक्षण व आरोग्य यांचा संबंध अन्यन्यसाधारण आहे. तरी सर्वसाधारणपणे शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक सोयीसुविधांकडे मात्र तितकेसे लक्ष दिले जात नाही. आजही ग्रामीण भागात शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक अनेक समस्या दिसून येतात.

**आरोग्य शिक्षणाचा इतिहास :**

भारतात १९०९ साली बडोद्याला आरोग्यसेवेची सुरूवात झाली अशी नोद आहे. परंतु १९४६ साली भोरे आयोगाने आपल्या अहवालात भारतात कोठेही शालेय आरोग्य सेवा जवळजवळ अस्तित्वात नाही, असा स्पष्ट उल्लेख केला आहे. इ.स. १९६० मध्ये भारत सरकारने शालेय

विद्यार्थ्यांचा आरोग्यविषयक आढावा घेवून त्यावर उपाय सुचविण्यासाठी शालेय आरोग्यसमितीची स्थापना केली. ह्या समितीने अत्यंत उपयुक्त शिफारसी केल्या. परंतु आवश्यक त्या साधनसामुग्रीच्या उणिवा, दूरदृष्टीचा अभाव व सार्वजनिक कार्याबद्दल असलेली अनास्था ह्यामुळे आजही अनेक भाग आरोग्यविषयक समस्यांच्या विळख्यात अडकून आहे. त्यामुळे आरोग्याविषयीच्या समस्या टाळण्याकरीता दूर करण्याकरीता "आरोग्यविषय" ही आजच्या काळाची गरज आहे.

आरोग्य शिक्षण हे मानवाच्या गरजांमधुन निर्माण झालेले असून ते अत्याधुनिक जीवनाचा पाया आहे.

**आरोग्य म्हणजे काय?**

आरोग्य म्हणजे नुसताच आजारांचा अभाव नव्हे. या शब्दात 'रोग' हा शब्द असल्यामुळे बऱ्याचदा आरोग्य शब्दाचा अर्थाचा विपर्यास होतो. आरोग्य या शब्दाला इंग्रजीत Health हा पर्यायी शब्द आहे. Health हा शब्द ग्रीक भाषेतून उदयास आला. संस्कृत व मराठीमध्ये "स्वास्थ्य" हा शब्द आरोग्याला पर्यायी शब्द म्हणून वापरतात. वस्तुतः स्वास्थ हा शब्द अधिक मुलगामी व अर्थाच्या दृष्टीने परिपक्व आहे.

"औस'स्व' मध्ये स्थित आहे अशा स्वस्थ माणसाच्या अवस्थेला स्वास्थ असे म्हणता येईल.

संपूर्ण शारीरिक, मानसिक स्वस्थता हाच स्वास्थाचा खरा आधार आहे. कुठल्याही प्रकारची अस्वस्थता ही भविष्य, भुत किंवा वर्तमानातल्या व्याधीचे निदर्शक आहे. म्हणुनच उत्तम स्वास्थ टिकविण्यसाठी प्रत्येकाला आरोग्यशिक्षण (Health Education) मनाचे संतुलन राखण्यासाठी दिले जाणारे शिक्षण म्हणजे आरोग्य शिक्षण अशी व्याख्या करता येईल.

**आरोग्य शिक्षणाची उद्दिष्टे :**

१. व्यक्तीचे शारीरीक-मानसिक संतुलन राखणे.
२. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.
३. विद्यार्थ्यांच्या व समाजाचा आरोग्यविषयक दर्जा सुधारणे.
४. आरोग्यविषयक सोयीसुविधांची माहिती करून देणे.
५. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास करणे
६. विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक कार्यक्रम सुचविणे
७. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणे.

वरील उद्दिष्टे साध्य करायची असतील तर शारीरीक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याचाही विचार करणे आवश्यक ठरेल.

**मानसिक आरोग्य :**

मानसिक आरोग्य हे व्यक्तीगत बाब म्हणुन जितके महत्वाचे आहे. तितकेच ते सामाजिक स्वास्थाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. मानसिक तोल बिघडू न देता मानसशास्त्रीय तत्वांचा उपयोग करून मानसिक आरोग्य जोपासण्यास मदत करण हे मानसिक आरोग्यशास्त्राचे मुख्य उद्दिष्टे आहे.

आज वैज्ञानिक, गतिमान युगात आपण अवतीभोवती इतर व्यक्तींच्या समस्या पाहतो, काही समस्या स्वतः अनुभवतो. वैयक्तिक कौटुंबिक, आंतरव्यक्ती समस्यांकडे ताण वाढत जातो हा मानसिक ताण वाजवीपेक्षा जास्त कसा वाढू देवू नये व असलेला ताण कसा नाहीसा करावा जीवनविषयक समस्यांना यशस्वीरित्या तोंड देण्यासाठी आपले मानसिक बल कसे वाढविता येईल याचा विचार मानसिक आरोग्यात केला जातो.

**आरोग्याच्या व्याख्या :**

जागतिक आरोग्य संघटनेने केलेली व्याख्या:

"मानसिक आरोग्य, असे आम्हांला समजले त्याप्रमाणे ते जैविक व सामाजिक पैलूंवर अवलंबून असते ते सतत प्रवाही असते. स्थिर नसते."

मानसिक आरोग्यात पुढील गोष्टी येतात.

१. व्यक्तीची दुसऱ्या व्यक्ती व समाजाशी सुसंगत नाते प्रस्थापित करण्याची क्षमता.

२. बाहय समाज व बाहय वातावरण यात योग्य तो बद्दल घडवून आणण्यात व्यक्तीने समर्थपणे व समंजसपणे केलेले योगदान.

३. व्यक्तींच्या अनेकविध उर्मींची, इतरांना हानी न पोहोचवता पण त्याचवेळी त्या संबंधीत व्यक्तीचे समाधान होईल. अशी व्यक्तीने केलेली हाताळणी.

**मानसिक आरोग्याचे प्रकार :**

मानसिक आरोग्याचे दोन प्रकार आहेत.

मानसिक आरोग्याचे प्रकार

| निवाराणात्मक (Preventive) | सुधारणात्मक (Meliorative) |
|---|---|
| काय करावे | कसे करावे |
| उदा. मानसिक बल कायम राहण्यासाठी काय करावे. | उदा. वाईट परिस्थितीत मानसिक तोल कसा संभाळावा. |

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सर्वांगीण प्रगतीकरीता स्वतःच्या शारिरीक आरोग्यासोबतच मानसिक आरोग्याकडेही लक्ष देणे महत्वाचे ठरते. उत्तम

समायोजन असलेलया व्यक्तीचे मानसिक आरोग्य ही उत्तम असते अशा व्यक्तीला इतरांपेक्षा वेगळी अशी स्वत:ची ध्येय, व मूल्ये, असतात. तात्पर्य अशी व्यक्ती स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी धडपडते.

## चांगल्या मानसिक आरोग्याची गुण वैशिष्टये




### १. निरामय व्यक्तिमत्व विकास :

मानसिक आरोग्याच्या दृष्टीने काही मुलभूत गरजांची पूर्तता होणे. उदा. योग्य आणि प्रोत्साहनपर प्रतिसाद देणारे आई वडील असणे, अवास्त व शिस्त नसणे, आवश्यक ती मोकळीक असणे.

### २. आवश्यक विकासात्मक क्षमता :

मुलांमध्ये आवश्यक क्षमता निर्माण केल्या पाहिजेत ज्या मानसिक आरोग्यास पोषक ठरतील. उदा.

१. मुलांमध्ये चांगल्या भावनांची जोपासना करणे जसे प्रेम, विनोद, भावनांची वृध्दी कशी करावी आणि राग, व्देष, मत्सर, या भावनांचा त्याग करण्यास शिकविते.

२. स्वत:च्या भावनांच्या योग्य प्रकारे अविष्कार करणे.

३. इतर व्यक्तीबरोबर चांगले संबंध निर्माण करण्यासाठी स्वत:च्या मर्यादेची जबाबदारीची व भूमिकेची जाणीव असणे.

**ब) समायाजेन :**

मानसिक आरोग्य वृध्दिंगत होण्यासाठी समायोजनाची नितांत आवश्यकता असते. उदा. परस्परांमधील विश्वास, एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती.

**४. जीवनाविषयक मुल्यांचा विकास :**

स्वत:च्या समाधानी आणि यशस्वी जीवनाकरीता काही मूल्ये अंगीकारली पाहिजेत. उदा.

१) वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारणे

२) विरोधापेक्षा सहकार्यावर भर द्यावा.

३) चांगले सामाजिक संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

४) समाजातील इतर व्यक्तींच्या बाबतीत माझी काही कर्तव्ये आहेत याची जाणीव असणे.

**मानसिक आरोग्याची मुलतत्वे :**

विद्यार्थ्यांनी आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी काही मूलभुत तत्वांचा अवलंब केल्यास उत्तम मानसिक आरोग्यसोबतच सुदृढ

शारिरिक आरोग्यसुध्दा लाभते. कारण सुदृढ आरोशरीरात निरोगी मन वास करते.

मुलतत्वे

एकंदरित व्यक्तीच्या सर्वांगीण स्वास्थात मानसिक स्वास्थ अंतर्भूत असते आणि मानसिक आरोग्य हे शारीरीक, सामाजिक व मानसिक अशा तिन्ही घटकांवर अवलंबून असते. म्हणून विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य निरोगी, निरामय ठेवण्याच्या दृष्टीने आरोग्य शिक्षण अतिशय महत्वपुर्ण असुन आरोग्य शिक्षण ही काळाची गरज ठरली आहे.

**नवनवीन गोष्टी शिकण्याची धडपड :**

ज्ञान वाढविण्याकरीता व अंतर्दृष्टी निर्मितीसाठी १) नवनवीन कल्पना, विचारांची जोपासना करावी. लहान मुले अनेक प्रश्न विचारतात तेंव्हा त्यांचे नीट ऐकून त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत उत्तरे दिली पाहिजेत. उत्तरे देण्याचे टाळणे म्हणजे त्यांची उत्सुकता कमी करणे त्यांच्या मानसिक आरोग्याला बाधा आणणे होय.

**आई वडिलांनी मुलांपासून वास्तविक अपेक्षा करणे :**

मुलाने मोठे व्हावे, नाव कमवावे असे वाटणे साहजिकच आहे. मुलांच्या इच्छा-आकांक्षा, त्यांची गुणवत्ता, सामाजिक.प्रतिष्ठा या सर्व बाबींची घराण्याच्या प्रतिष्ठेशी सांगड घातल्यास त्या घरातील मुले सतत मानसिक ताणाखाली काम करतात. आईवडिलांना काय वाटेल हा विचार सतत त्यांच्या मनात येतो त्यांच्या अपेक्षेनुरूप कार्य करण्यासाठी मुले धडपडतात जर अपयश आले तर एकदम खचतात.

**आत्मनियंत्रण करणे :-**

तुझ्या बोलण्याने मला राग आला. किंवा मी दुःखी झालो असे आपण बऱ्याचदा म्हणतो वस्तुतः राग व्देष, खिन्नता निर्माण करणारी बटणे काही आपल्या अंगावर नाहीत. की ते दाबली की आपण रागावणार.

वस्तुतः आपण त्या वाक्यांना प्रतिक्रिया देत असतो. वस्तुला व्यक्तीला त्यांच्या बोलण्याला प्रतिक्रिया द्यावी की नाही हे आपल्यावर अवलंबून असते. अशा गोष्टींकडे तटस्थपणे पाहण्यास शिकणे म्हणजे भावनांवर नियंत्रण ठेवणे असते.

❖ ❖ ❖

# - संदर्भ ग्रंथ सुची -


१) कवकड, गुरूप्रसाद, गायकवाड शशी २००८:शिक्षण व अध्यापक शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे

२) कप्तान, संजय सोमवंशी अनिल. १९९७. स्वामी विवेकानंद, शिक्षणविषयक विचार.

३) करंदीकर, सुरेश. २०००. मराठी अध्यापन पध्दती. फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) कीर, धनंजय. १९९६. डॉ. बाबासाहेबआंबेडकर. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

५) कुलकर्णी, अरविंद :मराठी भाषेच्या समृध्दीचे विचार.

६) कृष्णकुमार, राधिका २००९ चिरंतर गुरू. सी.सी.एम.टी.स्वांमी, मुंबई

७) गवळी, अनिल मोरे, भाषा संवाद

८) गोडबोले, अच्युत. :मनात-मनोविकास प्रकाशन, पुणे

९) गांधी, मो.क. मेरे सपनोंका भारत. राजपाल ॲन्ड सन्स, कश्मिरी गेट, दिल्ली

१०) गांधी.मो.क. नई तालीम. नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

११) ग्रामोपाध्ये, सुरेंद्र २००६. भाषा व्यवहार व भाषाशिक्षण. कासेगाव एज्युकेशन सोसायटी, कासेगाव.

१२) चिन्मयानंद, २००५. यत्न तो देव जाणावा. सी.सी.एम.टी. मुंबई

१३) जोशी, शारदा स. डॉ. बाबासाहेबआंबेडकर:संक्षिप्त चरित्र व विचारधन. विदयाभारती प्रकाशन, लातूर

१४) जोशी, गजानन नारायण. १९९४. भारतीय-तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास-खंड १०व११. शुभदा-सारस्वत प्रकाशन, पुणे

१५) दाभोळकर, दत्ताप्रसाद. शोध स्वामी विवेकानंदांचा. मनोविकास प्रकाशन, पुणे

१६) देव वसुधा विनोद. २००९. शिक्षणोपनिषद्. श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

१७) देव, वसुधा विनोद. २००६. शैक्षणिक चिंतन. व्हीसा बुक्स्

१८) देशमुख अरूण. २०१०. मानव हक्क आयोग. मनोरमा प्रकाशन, मुंबई

१९) देशपांडे के.ना., माळी आ.ल., पाटील, वा.रं. १९९९. भारतीय शिक्षणाचा इतिहास. निराली प्रकाशन, पुणे.

२०) नाडकर्णी, आनंद. मनोविकास. अक्षर प्रकाशन,

२१) दिक्षित, श्रीनिवास. २००२. भारतीय तत्त्वज्ञान. फडके प्रकाशन, कोल्हापूर

२२) पवार, निंबाजी. २०१३. युगप्रवर्तक नामदार गोखले. गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक.

२३) पवार, ना.ग. २००६. उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ज्ञ.

२४) पवार, ना.ग. २००६. मूल्यशिक्षण: आजच्या संदर्भात. नूतन प्रकाशन, पुणे

२५) पानसे, रमेश. २००८. शिक्षण विचारमंथन. डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे

२६) पानसे, रमेश. २०१५. भाषागहण व भाषा शिक्षण. ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

२७) पारसनीस, न.रा. १९९०. प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. नूतन प्रकाशन, पुणे.
२८) फडके, य.दि. १९७७. शोध :बाळ-गोपालांचा. श्रीविदया प्रकाशन, पुणे.
२९) भिंताडे, वि.रा. १९९४. शैक्षणिक संशोधन पध्दती. नूतन प्रकाशन, पुणे.
३०) मुळावकर, संतोष मोतराम. २००५. मूल्यशिक्षण सुसंवाद विदया प्रकाशन नागपूर
३१) मेहत्रे, मिता-भारतीय स्त्री आणि मानवाधिकार. साईनाथ प्रकाशन, पुणे.
३२) मंगल, एस.के. २०११. शिक्षा मनोविज्ञान. पी.एच.आय. लर्निग प्रकाशन नई दिल्ली
३३) य.च.म.मु.विदयापीठ :मूल्यशिक्षण. यशंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
३४) यशवंतराव, चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ:मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना. य.च.म.मु.विदयापीठ, नाशिक
३५) शहा, मु.ब. गाधी बिचार दर्शन
३६) सामुद्रे, एस.यु.:उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
३७) जरारे, बी.एल. २००३ रिसर्च मैथडोलॉजी. ए बी डी पब्लिशर्स, जयपूर
३८) जोशी, एवं लाल. २०१. शिक्षा मनोविज्ञान एवं प्रारभिक सांख्यिकी. आर.लाल-बुक डिपो, मेरठ

३९) सिंह रामपाल, कुमार धर्मेंद्र. २०११. इतिहास शिक्षण. आर.लाल बुक डिपो, मेरठ

४०) शर्मा, आर.ए. २०११. सामाजिक विज्ञान शिक्षण. आर.लाल बुक डिपो, मेरठ

४१) Singh, R.P. २०११. Teaching of History. R.Lall Book DePot. Meerut)




# डॉ. आशु आल्हाद भावसार

## (डॉ. आशा मधुकरराव धारस्कर)

साहाय्यक प्राध्यापक,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला


अध्यापन अनुभव : १८ वर्षे

पदव्युत्तर अध्यापनाचा अनुभव : १२ वर्षे

- **शिक्षण :** M.A. (History, Sociology, Subject Communication-Edu.) M.Ed. M/Phil, Ph.D (Educaton ) D.B.C.M
- महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत शिक्षणशास्त्र विद्याशाखा (प्रशिक्षण शाखा) गट (अ) वर्ग -१ राजपत्रित अधिकारी या पदावर नियुक्त
- विविध शासकीय समित्यांवर शासनाचे प्रतिनिधित्व
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक द्वारा संचालित शालेय व्यवस्थापन पदविका, बी.एड. व एम.एड. अभ्यासक्रमाच्या समंत्रक व समन्वयक
- विविध मान्यताप्राप्त मासिके नियतकालिके व वृत्तपत्रांतून अनेक शैक्षणिक, वैचारिक व संशोधनात्मक लेख प्रकाशित
- आकाशवाणी व दूरदर्शनवरील कार्यक्रमांत मुलाखत व सहभाग
- विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विभागीय स्तरांवरील चर्चासत्रे व परिषदांमध्ये सक्रिय सहभाग
- शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विविध राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत पीएच. डी. (शिक्षणशास्त्र) साठी मार्गदर्शक
- प्रकाशित पुस्तके १) छात्रसेवाकाळ २) परिघापलीकडचे शिक्षण


Ave Maria
PUBLICATIONS

**अवे मारिया पब्लिकेशन्स**

१० मिताली, ४५/९८, मुसारी कॉलनी, पौड रोड, पुणे ४११ ०३८

१३८४, शुक्रवार पेठ, बदामी हौदाजवळ, बाजीराव रोड, पुणे ४११ ००२

दूरध्वनी : ०२०-२२४५२५४०, २४४७३२२५

ISBN No. 97889387816-05-3